या पुस्तकास ड. व्ह. ट्रा. सोसायटीनें बक्षीस दिलें आहे.

मार्टिन ल्यूथर

अथवा

युरोपांतील धर्मक्रान्तीचा इतिहास.

लेखकः

कै. बळवंत अनंत देव,

वरिष्ठ कोर्ट जज्ज, बडोदें.

प्रकाशकः

गंगाबाई देव, बुधवार पेठ, पुणें.

पुणे येथें

'आर्यभूषण' छापखान्यांत **नटेश अप्पाजी द्रविड**, यांनीं छापिलें.

१९१९.

किंमत ८ आणे.

प्रस्तावना.

प्रस्तुत ग्रंथाची कहाणी दुःखमय आहे. कै. रा. सा. बळवंतराव देव ह्यांचें नांव गेल्या पिढींत तर सर्वविश्रुत होतेंच; पण अद्यापिही तें नांव देवांच्या अपूर्व-लेखनकौशल्यानें महाराष्ट्रवाङ्मयांत स्वतेजानें चमकत आहे. रा. देव हे आस्थेवाईक सुधारक असून पुनः खऱ्या कळकळीचे देशाभिमानी असत. धर्माच्या दृष्टीनें आपला देश फार खालावला आहे, उपनयनादि संस्कारांच्या व संध्या, ब्रह्मयज्ञादि कर्मांच्या अर्थज्ञानशून्य तांत्रिक कवायतीमुळें धर्माचा प्राण जी चित्तशुद्धि ती अस्तंगत झाली आहे, उपासनापंथही संप्रदायाच्या अभेद्य आवरणानें पंगु झाला आहे, ज्ञानमार्ग म्हणजे ' शुद्ध घटपटादि वावदूकत्वाची खटपट तोंडीं सांगे ब्रह्मज्ञान अशी मात्र ' राहिली आहे, इत्यादि प्रकारची हीन व दीन अवस्था पाहून त्यांचा जीव तिळतिळ तुटत असे. असो; धार्मिक ग्लानीला कांहीं तरी आळा पडून महाराष्ट्रांत खऱ्या धार्मिक तत्त्वांचा उत्साहकारी अवतार व्हावा, या हेतूनें रा. देव यांनीं ' युरोपियन धर्मक्रांति व मार्टिन ल्यूथर ' हा निबंध लिहिला आहे. या निबंधांतील विचारसरणी, यांत स्पष्टतेनें प्रतीतीस येणारा बहुश्रुतपणा, त्यांत दिसणारी कळकळ इत्यादि मंगळ वस्तु पाहून रा. देव यांचें कौतुक वाटूं लागतें. पण आपणां सर्वांचें दुर्दैव कीं, ह्या ग्रंथाची आंखणी करून त्याचा कच्चा खर्डा लिहून झाल्यानंतर त्याच्यावर हात फिरवून त्याला पक्कें स्वरूप देण्यापूर्वींच निर्घृण काळानें रा० देव यांस ओढून न्यावें ! या ग्रंथावर रा० देव यांनीं आपली अखेरची परिपक्व दृष्टि टाकिली असती, तर प्रस्तुत ग्रंथास कोणतें अभिनव स्वरूप प्राप्त झालें असतें, ग्रंथस्वरूप समजण्यासाठीं किती माहिती दिली असती, हें त्यांच्या इतर अभियुक्त ग्रंथांवरून स्पष्ट दिसणार आहे. असो; झाली ती गोष्ट झाली ! वाचकांस इतकीच विनंति आहे कीं, त्यांनीं रा० देव यांनीं लिहिलेला हा ग्रंथ आहे हें लक्षांत ठेवून व त्यांतील मुख्य रहस्य ध्यानीं बाळगून हा ग्रंथ वाचावा.

हा ग्रंथ संपादण्याचें अवघड काम मजकडे आलें आहे. पण रा. देव यांचें ऐतिहासिक ज्ञान मला नाहीं ह्मणून ग्रंथांत पुष्कळ गोष्टी अपूर्ण राहिल्या आहेत. तसेंच कोठें शब्दांत, कोठें वाक्यांत व कोठें घटनेंत मीं कांहीं फेरबदल केला आहे, तो रा० देव यांचा अभिप्राय लक्षांत ठेवून केला आहे, तथापि चुकी होण्याचा संभव आहे. असो; रा० देव यांचें स्मारक म्हणून हा ग्रंथ वाचावा अशी सप्रेम विनंति करून ही दुःखःकारक प्रस्तावना आटोपतों.

चिं. गं. भानु.



पारत्रिक कारभार करितात.

असो; ख्रिस्ती शकाच्या आठव्या शतकांत यूरपखंडावर आणीबा... संग
आला होता. पूर्वेकडून व पश्चिमेकडून मुसलमानांनीं हल्ला करून सर्वत्र ... शाही

धर्मसंस्कृति आणि राजकीय संस्कृति.

सामान्य विचार.

मानवी समाज एकत्र होतो, तो सामान्यतः कोणत्या तरी एका मानसिक-वृत्तीचा परिपोष करण्यासाठीं होत असतो. कुटुंब–समाज असो, ग्राम-समाज किंवा राष्ट्र–समाज असो, येथें अनेक मानव एकत्र होतात, ते स्वतःचा योगक्षेम निर्वेध चालण्यासाठीं समाजाच्या योगक्षेमाची काळजी घेतात, किंवा समाजाचा योगक्षेम चालावा एतदर्थ स्वतःचा योगक्षेम वृद्धिंगत करितात. स्वतःच्या कल्याणासाठीं सामाजिक कल्याण किंवा सामाजिक कल्याणासाठीं स्वतःचें कल्याण करणें, या हेतूनें प्रेरित झालेले प्राणी–विशेषतः मानवी प्राणी एकत्र जमत असतात. कल्याण म्हणजे सुस्थिति. ही सुस्थिति ज्ञानविषयक किंवा प्रेमविषयक असते. असो; कल्याण करणें किंवा करून घेणें हें अवश्य आहे. कल्याणवृत्ति नसेल, तर कोणत्याही प्रतीचा समाज जिवंत राहणार नाहीं. जिवंत राहिलेल्या व राहूं इच्छिणाऱ्या समाजांत कल्याणाच्या योगक्षेमासाठीं प्रत्येक ठिकाणीं विशेष विधि, विशेष संप्रदाय व विशेष संस्था उत्पन्न होतात. हा राजकीय अथवा ऐहिक संस्थेविषयीं विचार झाला. धर्माची गोष्ट तशी नाहीं. कोणताही धर्म घ्या, तो ऐहिक व पारत्रिक योगक्षेमाचें स्वरूप ठरवून ऐहिक संस्थांसही पारत्रिक संस्थेचे अनुषंगानें चालविण्याचा प्रयत्न करितो. धर्माच्या साम्राज्यांतही विधिसंप्रदाय व संस्था उत्पन्न होतात. आणि यांच्या साहाय्यानें धार्मिक अधिपति समाजाच्या ऐहिक अधिपतीस स्ववश करण्याचा प्रयत्न करितात. अर्थातच येथें राजकीय व धार्मिक संस्थांत कलह उत्पन्न होतो, व देशकालानुसार राजकीय व्यवस्थेंत धर्माचें प्राबल्य किंवा धार्मिक संस्थांत राजकीय प्राबल्य, त्या त्या संस्थांच्या बलाबलावर अवलंबून राहतें. या कलहाच्या द्वारें असें एक फल निर्माण होतें कीं, त्यामुळें राज्याधिकारी पारत्रिक संबंध लक्षांत ठेवून ऐहिक व्यवहार चालवितात. आणि धार्मिक अधिकारी ऐहिक संबंध ध्यानांत धरून पारत्रिक कारभार करितात.

असो; ख्रिस्ती शकाच्या आठव्या शतकांत यूरपखंडावर आणीबाणीचा प्रसंग आला होता. पूर्वेकडून व पश्चिमेकडून मुसलमानांनीं हल्ला करून सर्वत्र इमामशाही

करण्याचा घाट घातला, तर उत्तरेकडून सॅक्सन लोकांच्या टोळ्या येऊन त्यांनीं तरवारीच्या जोरावर आपला धर्म प्रसृत करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला होता. परमेश्वराची ख्रिस्ती राष्ट्रावर कृपा म्हणून याच प्रसंगीं त्यास शार्लमेनसारखा पाठिराखा मिळून त्यानें मुसलमान लोकांची लाट मागें ढकलली व सॅक्सन लोकांवर जय मिळवून त्यांस ख्रिस्ती धर्माच्या कक्षेंत आणिलें. ह्या त्याचा पराक्रम पाहून ख्रिस्ती लोकांच्या रोमन पीठावरील धर्माध्यक्षानें (पोपानें) शार्लमेन यांस ' धर्म–संरक्षक ' अशी बहुमताची पदवी दिली. आणि त्याकडून ख्रिस्ती धर्माचा प्रसार करविला. तदनंतर पोपनें शार्लमेन राजास ' राज–राजेश्वर ' असा किताब देऊन सर्व युरपियन राज्यांवर त्याची हुकमत चालेल, अशी व्यवस्था केली. शार्लमेननें ही धर्मवृद्धि करण्याचें आश्वासन दिलें याप्रमाणें राजसंस्था व धर्मसंस्था यांचा मिलाफ होऊन राजानें व त्याच्या प्रांतोप्रांतींच्या अधिकाऱ्यांनीं व जहागिरदारांनीं धर्माची पाठ राखावी व धर्माध्यक्षानें व त्याच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांनीं राजास दुवा देऊन प्रजा राजसत्तेस एकनिष्ठ राहील, असें करावें, असा उभयतांमध्यें संकल्प ठरला.

पण संकटाच्या वेळीं झालेले ठराव सर्व प्रसंगांस थोडेच कायम राहणार ? शिवाय सत्तेची हांव, श्रीमंतीची इच्छा, कीर्तीची चाड, बरोबरीच्याचा मत्सर, वरिष्ठाचा द्वेष व कनिष्ठाविषयीं तिरस्कार इत्यादि मानसिक प्रेरणा जोंपर्यंत मानवी मनाला कर्माकर्म करण्यास प्रवृत्त करितात, तोंपर्यंत वाटेल त्या शपथा घेऊन सिद्ध झालेलीं वचनें, ठराव व कबुलायती जागच्या जागीं राहून केव्हां राजनीति व केव्हां धर्मनीति, केव्हां राजे व केव्हां धर्माध्यक्ष जोराजोरानें पुढें येतात. आणि आपलाच शक सुरू करितात. ह्या सार्वत्रिक नियमाचा अंमल कार्लोव्हीजियन बादशाहीवर (शार्लमेनच्या बादशाहीवर) होऊन प्रथमतः धर्माध्यक्षांची सरशी झाली व ' धर्माच्या प्रत्यक्ष आज्ञेशिवाय राज्यांत एकही पान हलूं नये ' असा प्रकार घडून आला. पण बादशाहीचे निवडणुकींत सुद्धां जेव्हां धर्माध्यक्षाचें प्राबल्य स्पष्ट दिसूं लागलें, तेव्हां जर्मनींतील समंजस लोक संतापले, जर्मनींत दोन पक्ष झाले आणि शेवटीं लोकपक्षाचा जय होऊन कांहीं काल तरी जर्मन राष्ट्रें पोपच्या सत्तेंतून सुटलीं. पण फ्रान्स व इटली इत्यादि राष्ट्रें मात्र पोपच्या हातांत सर्वस्वी गेलीं. याचा असा मात्र अर्थ नव्हे कीं, फ्रान्सादि लॅटिन राष्ट्रें धार्मिक होतीं व जर्मन राष्ट्रांनीं धर्माचें प्रावर्ण झुगारून दिलें होतें. ओथो नामक जर्मन बादशाहानें तर ख्रिस्ती धर्माचा विशेषच प्रसार केला. जर्मन लोकांनीं पोपाला राजकीय कारभारांत ढवळाढवळ करूं दिली नाहीं. हें काय तें तात्पर्य आहे. त्यांनीं कित्येक वेळां पोपाची निवडणूक केली व आपल्या राष्ट्रांतील सर्व धर्माध्यक्षांच्या नेमणुकीही तेच करीत असत. असो; या वेळीं असा रंग दिसूं लागला कीं, जर्मन राष्ट्र हें राजसत्तेनें व धर्मसत्तेनें सर्वश्रेष्ठ होणार ! पण देवाचें करणें ? जर्मन राष्ट्रांत यादवी सुरू झाली. आणि जर्मन सत्तेचा संकोच होऊन

रोमचे पोपची गादी जर्मनीच्या दास्यांतून अकराव्या शतकांत मुक्त झाली. मुसलमानांविरुद्ध व पालेस्ताईन सोडविण्यासाठीं जीं ' धर्मयुद्धें ' झालीं, त्यांस आरंभ अकराव्या शतकाच्या शेवटीं झाला. या युद्धाचा एक परिणाम 'धर्माध्यक्षांचें वर्चस्व' वाढण्यांत होऊन सर्व लॅटिन राष्ट्रें पोपच्या ताब्यांत आलीं आणि जर्मन लोकांनीं पोपच्या कामांत हात घालूं नये असें ठरलें. सारांश, धर्मसत्ता स्वतंत्र झाली. कांहीं दिवसांनीं तर बादशाहाची निवडणूक पोपच्या संमतीशिवाय होऊं नये, असें ठरलें. असो; पण बादशाहाच्या व धर्माध्यक्षाच्या या चढाओढींत जर्मनींतील जे जहागिरदार व दरकदार होते त्यांचें महत्व मात्र अतोनात वाढलें, त्यांची बुद्धि कुशाग्र व चौकस झाली आणि धर्मशास्त्राच्या सांप्रदायिक बंधनांनीं गुदमरून न जातां नवीन शोध, नवीन उपभोग्य वस्तु, नवीन धर्मकल्पना अस्तित्वांत आणण्याची त्यांची तयारी झाली.

१४ व्या शतकांत जेव्हां पोपनें करावर कर बसविण्याचा सपाटा सुरू केला, जर्मनींत धर्माधिकारी नेमतांना हवे तसे पैसे उकळले, बादशहा कोणास करावें याविषयीं तो जर्मन लोकांस हुकूम करूं लागला, तेव्हां जर्मन लोकांच्या मनानें उलट खाल्ली आणि बादशहाच्या निवडणुकींत पोपचा कांहीं एक संबंध नसावा असा त्यांनीं एकमतानें ठरा केला.

या वेळींच पोपांच्या धार्मिक राजवटींत अनेक दोष शिरले होते; तथापि राजाराजांमधील भांडणें हीच पोपची सत्ता अप्रतिहत ठेवण्यास कारणीभूत झाली. शिवाय, कुलीन व धनिक लोकांनीं व विशेषतः बादशहाची निवडणूक करणाऱ्या सभासदांनीं बादशाही सत्ता संपुष्टांत आणिली. निवडलेले बादशहा सामान्य प्रतीचे निघाले, या कारणांनीं अर्थात् बादशाही सत्ता नामधारी झाली. पूर्वीं दिलेल्या सनदा कायम करणें, न्याय देणें, मुसलमानांविरुद्ध लढाई करण्याचा प्रसंग आला असतां लढाऊ सैन्य तयारींत ठेवणें, हीं काय तीं महत्वाचीं कामें बादशहाकडे होतीं. तो केवळ खिस्ती धर्माचा व धर्माध्यक्षाचा सांगकाम्या 'सेनापति' होता असें म्हटलें तरी चालेल. या त्याच्या हीनत्वानें पोपांचें प्रस्थ जास्तच वाढलें. पण हें पाहून जर्मन लोकांचें चित्त स्वातंत्र्य मिळविण्याकडे जोरानें लागलें. राजसत्ता नामशेष करण्याच्या हेतूनें बादशहाच्या विरुद्ध व धार्मिक मागण्या कमी करण्याच्या हेतूनें पोपाविरुद्ध ते लोक खटपटी करूं लागले. या लोकांत तीन चार उपपक्ष होते. बादशहाची निवडणूक करण्याचा हक्क असणारे मतदार राजे, (Electors), धर्मप्रतिनिधी, जहागीरदार आणि कित्येक नांवारूपास आलेल्या श्रीमंत शहरांचे नागरिक अशा चार कक्षा असत. मतदार राजांमध्यें सॅक्सनीचा **फ्रेड्रिक** हा मुत्सद्दी व **मार्कग्रेव्ह** शूर धारकरी, असे प्रसिद्ध पुरुष होते. याच वेळीं यूरोपखंडांत सर्वत्र ' राज्यें संघटित करावीं ' अशी चळवळ सुरू होऊन फ्रान्स, स्पेन, इंग्लंड येथील राज्यव्यवस्था सुयंत्रित झाली.

१४८६ मध्यें–ल्यूथरचा जन्म झाल्यावर तीन वर्षांनीं–मॅक्सिमिलियन (फेड्रिक बादशहाचा मुलगा) याला मताधिक्यानें रोमचें राज्य मिळालें. व लागलीच त्यानें आस्ट्रियावर स्वारी करून तेथें बादशहाचा अंमल चालता केला. पण हें कृत्य पोपास आवडलें नाहीं. तथापि ही नावड बादशाहीच्या संघटनास कारण झाली. १४८९ मध्यें मतदार राजे, जहागिरदार व नागरिक यांची सभा भरली. बादशाहींत शांतता असावी, न्यायाची एक वरिष्ठ सभा सर्वथा स्वतंत्र असावी, सर्वसाधारण खर्चासाठीं एक गंगाजळी आणि युद्धासाठीं खड्या सैन्याची योजना असावी, असें सभेंत ठरलें. पण फेड्रिकला या सूचना मानवल्या नाहींत. तेव्हां त्याच्या मुलाच्या अमदानींत आपले हेतु पूर्ण होतील, अशा आशेनें सभेच्या तिन्ही कक्षा स्तब्ध राहिल्या. सन १४९३ मध्यें फेड्रिक मरण पावला. पुढें लवकरच जर्मन बादशहानें ‘ शांततेचा ’ जाहीरनामा प्रसिद्ध केला, न्यायसभा स्वतंत्र केली, कराच्या वसुलाची व्यवस्था लावली व गंगाजळीची स्थापना केली. सारांश जर्मन बादशाहीला संघटित स्वरूप आलें; मात्र या सर्वांची अंमलबजावणी कशी करावयाची हा प्रश्न तसाच राहिला. याच्या निकालासाठीं पुढें पुष्कळ वर्षें खटपट करावी लागली. त्याचा परिणाम हा झाला कीं, बादशाहाची सत्ता पुष्कळच कमी झाली आणि बादशाहींत पुनः बेबंदशाही सुरू झाली. या धक्काबुक्कींत मतदार राजांस, जहागिरदारांस व नागरिकांस आपलें सामर्थ्य काय आहे, हें कळून आलें.

तात्पर्य, पोपची अनियंत्रित सत्ता, पोपचें अनावर लोभित्व, त्याचा दाहिजा ($\frac{1}{10}$ कर पोपला लोकांनीं देणेचा) कर, धर्माची अव्यवस्थित वहिवाट, धर्माच्या बादशाहानें व जर्मन लोकांनीं केलेला प्रतिरोध, मतदार राजांचा व इतर कक्षांचा उदय, जर्मन लोकांचें एकीकरण, इतक्या गोष्टी लक्षांत ठेवल्या असतां पुढील धर्मक्रांतीचा त्रोटक इतिहास ठीक समजेल असा भरवंसा आहे. धर्मसत्तेच्या अतिरेकानें श्रद्धाळू पण जिज्ञासु जर्मन लोक पोपविरुद्ध चवताळले. सरस्वतीसंजीवनानें ज्ञानप्रसार केला, व जर्मन लोकांचा स्वाभिमान व स्वदेशाभिमान वाढविला. व येणेंप्रमाणें शुद्ध ख्रिती मताच्या स्वीकाराला ते अनुकूल झाले; पण याच अमदानींमध्यें राजकीय सत्तेच्या चढाओढींत जर्मन राष्ट्र सांपडलें होतें, म्हणून बादशाही सत्ता कमी झाली व जर्मन लोकांची स्थानिक सत्ता यद्यपि वाढली, तरी स्वतः बादशाहा व पुराणमतवादी हे जुन्या पद्धतीचे अभिमानी व लोकसत्ता वाढविणाऱ्या शुद्ध धर्माचे द्वेष्टे असल्यामुळें जर्मनींत नवीन पंथाचा प्रसार होण्यास कष्ट पडले. पण शेवटीं सत्याचा जय होऊन धर्मप्रवर्तकांच्या पापी मगरमिठींतून शुद्ध धर्माची सुटका झाली, श्रद्धा व विचार यांचा समेट झाला आणि शुद्ध मताची सरशी झाली.

विषय-प्रवेश.

खिस्ती शकाचे पूर्वी सुमारें सातशें वर्षापासून तों त्याच शकानंतरच्या सातशें वर्षांपर्यंत रोमन लोकांनीं आपली सत्ता त्रिखंड स्थापिली होती, हें सर्व इतिहासज्ञांस विदित आहे. या वेळीं एकछत्री बादशाही सर्वत्र गाजत असल्यामुळें जिकडेतिकडे शांतता सुखानें नांदत असे. परस्परदळणवळणाचें सौकर्य, व्यापाराची वृद्धि, एक भाषा, एक राजपद्धति, वर्णभेदाची शिथिलता, गुणकर्मानुरूप अधिकारप्राप्ति, विद्या, कलाकौशल्य यांची भरभराट इत्यादि अनेक मूर्त व अमूर्त कारणांनीं सर्व रोमन लोक व त्यांची प्रजा एकवट होऊन सर्वत्र रामराज्य झालें होतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि या सर्व शांति-ब्रह्माचा कल वैषयिक उपभोगांकडे मात्र समर्पित झाला असल्यामुळें नीति, धर्म, तत्वज्ञानाचा विचार व तदनुरूप आचरण इत्यादि गोष्टीं चा अभाव जसजसा प्रकट होऊं लागला व मानवी-कक्षेचा व्यास वाढत जाऊन तो उत्तर भूमिकेवर जावा, ही मानवी आशा व हें दैवी धोरण जसजसें नामशेष होऊं लागलें, तसतसा ' असंतोष व असमाधान ' ह्यांचा प्रादुर्भाव होऊं लागला. कामक्रोधादिकांच्या व्यापारास नियंत्रित करणारी रोमन दंडनीति समदृष्टीची आहे, तशीच स्वैर मनोव्यापारांचें नियमन करणारी ' धर्मनीति ' ही एक प्रकारची असावी, अशी आकांक्षा उत्पन्न झाली. रोमन बादशाहीनें ज्या गोष्टी अमलांत आणून सर्वत्र एकतानता उत्पन्न केली, तिचाच आणखी एक परिणाम हा झाला कीं, सर्वत्र धर्मैक्य असावें. असें लहानापासून थोरास व गरीबापासून श्रीमंतास वाटूं लागलें.

(२) रोमन लोकांनीं इतर राष्ट्रांबरोबरच ग्रीस देशाचाही पाडाव केला होता, पण तेथील अभियुक्त वाङ्मय, तेथील कलाकौशल्य, तेथील लालित्य, तेथील शिष्टाचार व तेथील तत्वज्ञान इत्यादि संग्रहणीय वस्तूंनीं रोमन लोकांस वश करून घेतलें. ग्रीस देशांतील संस्कृति विजयी लोकांनीं आपल्या इकडे आणण्याचा प्रयत्न केला व तो सफलही झाला. पण सामान्य जनांचें समाधान या संस्कृतीनें होईना, कारण ग्रीक तत्वज्ञानाचा भर श्रद्धेचें साम्राज्य कमी करण्याकडे होता. अर्थात् श्रद्धालु लोकांस ग्रीक तर्कपद्धति पसंत पडली नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्यांच्या नेत्यांनीं लोकरंजनार्थ ग्रीक पद्धतीचा तिरस्कार करून संसारदुःखविमोचक श्रद्धेला अनेक पद्धतींनीं अवतीर्ण केलें. यांतील कांहीं प्रकार प्रामाणिक व कांहीं अप्रामाणिक होते. असो; अप्रामाणिक श्रद्धेला लवकरच ऊत येऊन तिचा अतिरेक झाला, तेव्हां ' त्या महानियोजक जगन्नियंत्यास दया येऊन लोकोद्धारार्थ जीजस ख्राइस्टचा अवतार होईल, ' अशी त्यानें योजना केली.

(३) ख्राइस्टचें जीवनचरित्र किंवा अवतारकथानक सांगण्याचें हें स्थळ नव्हे. फक्त इतकेंच सांगितलें म्हणजे पुरें आहे कीं, एशिआ खंडातील पालेस्टाईनमध्यें जन्मलेल्या ख्राइस्टचा सर्व कटाक्ष शुद्ध आचरण, परोपकार, ईश्वराची सर्वात्मना भक्ति, इत्यादि महत्वाच्या गोष्टींचा प्रसार करण्याकडे होता. ख्राइस्ट बोले, तसें त्याचें आचरण असे. यामुळें या महात्म्यावर प्रथमतःच सामान्य लोकांची श्रद्धा बसली व त्याचें आचरण हेंच दैवी आचरण असें समजून लोकांनीं ख्राइस्टचे आचरणाचा कित्ता गिरविला. मूर्तिपूजा बंद झाली. वर्णभेद किंवा जातिभेद संपला. श्रद्धेच्या जोरावर दिसलेले चमत्कार वास्तविकतः अति मानवी आहेत, असा विश्वास दृढमूल झाला, आणि ख्राइस्टचें महात्म्य अतोनात वाढलें. ही नवीन गोष्ट ज्यू लोकांच्या पौराणिक संप्रदायास विरुद्ध होती, म्हणून ज्यूधर्मप्रवर्तकांनीं ख्राइस्टचा छल केला व कांहीं वगवशीला बांधून त्यांनीं ख्राइस्टला रोमन अमलदाराकरवीं सुळावर चढवून ठार मारिलें. या वेळीं ख्राइस्टनें केलेला उपदेश (Sermon on the Mount) सर्वांनीं वाचून मनन करण्यासारखा आहे. असो; पण या भयंकर छलानें ख्राइस्ट पंथाची पीछेहाट झाली नाहीं, इतकेंच नव्हे तर " तो तीन दिवसांनीं दिव्य शरीरांत प्रकट झाला व ' मानवी संतारणाचें ओझें मी आपल्या शिरावर घेतों, तुम्ही माझ्यावर पूर्णश्रद्धा ठेवाल, तर मुक्त व्हाल ' हा ख्राइस्टनें साश्वासनपूर्वक आशीर्वाद दिला. " अशी लोकवार्ता जघन्य झाली. अर्थात् खिस्ती धर्माचा प्रसार जोरानें होऊं लागला. पुढेंही रोमन लोकांनीं व ज्यूंनीं खिस्ती लोकांचा मन मानेल तसा छल केला. पण जितका छल जास्ती, तितका छळलेल्या धर्माचा प्रसार जास्ती होतो असा रोमन लोकांस अनुभव येऊं लागला. पुढें पॉल या नांवाच्या बुद्धिवान् पुरुषानें खिस्ती मताची व्यवस्थित संघटना केली व हजारों लोकांस खिस्ती केलें. शेवटीं तर खिस्ती धर्म हा बादशाहीचा धर्म होऊन सर्व रोमन बादशाही खिस्ती झाली ! तसेंच, अरिस्टॉटल या नांवाचा सर्वज्ञकल्प तत्त्ववेत्ता ग्रीस देशांत होऊन गेला होता; त्याच्या तर्कपद्धतीनें खिस्ती धर्माला शास्त्रीय स्वरूप आलें व रोम शहर हेंच खिस्ती धर्माचें व खिस्ती धर्मशास्त्राचें आदिपीठ झालें.

(४) याप्रमाणें बादशाही नगरींत, प्रत्यक्ष बादशहाच्या सिंहासनाशीं सिंहासन स्थापण्याचा व बादशाही आश्रयाचा मान खिस्तिधर्मप्रवर्तकांस मिळाला, तेव्हां धर्माधिपति, धर्ममंडल, धर्मसंप्रदाय इत्यादि संस्था निर्माण झाल्या आणि दंडनीतीच्या बरोबरीनें धर्मनीतीची सत्ताही अप्रतिहत झाली. पुढें पुढें तर रोमन बादशाहीवर खिस्ततुल्य झालेल्या पोपांचें इतकें वर्चस्व वाढलें कीं, बादशहानें आपली राजधानी (रोम) सोडून देऊन कॉन्स्टँटिनोपल ही राजधानी केली. नंतर थोड्याच वर्षांत एका बादशाहीच्या दोन होण्याचा प्रसंग उत्तरेकडील अडाणी लोकांनीं स्वाऱ्या करून आणिला व रोम येथें रानटी लोकांवर रोमन बादशाही स्थापित केली. तरी पण

खिस्तीधर्माची बलायदूर! देवाचें करणें! मग काय? खिस्त धर्मानें त्या रानटी लोकांस वश करून घेतलें. आणि याप्रमाणें रानटी व सुधारलेल्या देशांतही खिस्ती धर्माचें, त्याच्या आचार्यांचें, आचार्यांनीं नेमलेल्या धर्माध्यक्षाचें वर्चस्व अतोनात वाढलें. या सत्तावृद्धीबरोबरच संपत्तीचीही वृद्धि झाल्यामुळें धर्माध्यक्ष, धर्माचार्य व इतर लोक यांत उपभोगांची लालसा जास्त वाढली आणि पुनः धर्मग्लानीस आरंभ झाला. मिळालेल्या किंवा मिळविलेल्या संपत्तीचा व ऐश्वर्याचा विनियोग ईश्वरभजनीं व मानवी प्रगतींत व्हावा, हा जो ईश्वरी संकल्प, त्याचें विस्मरण होऊन ऐश्वर्याचा विनियोग देहादिकांचे उपभोग वाढण्याचे कारणीं लागतो. देवभजन सुटून देहभजन बद्धमूल होतें, हा नित्य प्रकट होणारा मायेचा एक विलास आहे. मायेचें साम्राज्य सर्वगामी आहे, म्हणून प्रगामी मुमुक्षूंनीं नित्य जागृत राहिलें पाहिजे. असो; इसवी शकाच्या नऊ दहा शतकांत जाणत्या लोकांनींही खबरदारी घेतली नाहीं. म्हणून जाणत्या व अजाणत्या लोकांत धर्मश्रद्धेचा मात्र अतिरेक होऊन ‘ धर्मखुळें ’ वाढलीं, आचारविचारांस तांत्रिक स्वरूप आलें, धर्मरहस्य समजेनासें झाल्यामुळें मनोवृत्ति मलीन झाली आणि बाहेरून धष्टपुष्ट दिसणारें भुतांचें शरीर अंतर्यामीं पोकळ असतें तशी या सर्वांगसुंदर द्वैतात्मक खिस्ती धर्मशास्त्राची स्थिति झाली.

(५) याचवेळीं निरनिराळ्या संस्कृतीचे गॉल्स, सॅक्सन्स, स्लाव्ह्ज, फिन्स, नॉर्मन्स इत्यादि लोकांनीं जीर्ण झालेल्या रोमन बादशाहींत शिरून तिचे तुकडे तुकडे केले व ठिकठिकाणीं भिन्न राष्ट्रें निर्माण केलीं. यांच्या भाषा भिन्न, आचार–विचार भिन्न, आनुवंशिक संस्कृति भिन्न असा प्रकार होता. मात्र सर्वांनीं खिस्ती धर्माचा स्वीकार केला होता. पण या आंतून पोखरलेल्या धर्मतरूच्या बुंध्यांतच प्राण नसल्यामुळें नित्य नवी पालवी फुटणाऱ्या अनेक आचार–विचारात्मक रोपड्यांत मनःशुद्धीला अंतर्भूत करितां येईना; म्हणून खिस्ती धर्मासंबंधानें विचारी लोक साशंक होऊं लागले. या शंकेचें निवारण करण्यासाठीं अनेक धर्मपंडितांनीं खिस्ती धर्माचा मुख्य आधार–स्तंभ जें बायबल व विशेषतः ‘नवा करार’ (New Testament) त्याचा अर्थ विशद करणारीं भाष्यें निर्माण केलीं; पण यांचाही फारसा उपयोग झाला नाहीं. खरेंच आहे, देशकालवर्तमान नित्य फिरतें म्हणून तदनुसार नव्या नव्या कर्मांचा, विधींचा, सिद्धांतांचा व उपासनांचा वास्तविक उदय होत असतो. ह्या भूतार्थक गोष्टींस जुन्या तात्विक सिद्धांतांमध्यें अंतर्भूत करण्याची खटपट करावयाची म्हणजे एकोणिसाव्या शतकांत उत्पन्न झालेल्या वाजविण्याच्या विलायती पेटीस सतराव्या अठराव्या शतकांतील हिंदी सतारीच्या गवाण्णींत खुपसून घातल्यासारखें हास्यास्पद होय.

(६) असो; या प्रमाणें धर्मांतील पोकळपणा, धर्मश्रद्धेचा अतिरेक, धार्मिक अज्ञान, खिस्ती राष्ट्रांतील परस्पर–वैमनस्य, उपभोग–लालसा, धर्मभंग, नीतिभंग

इत्यादि अनेक कारणांनीं खिस्ती राष्ट्रें दुर्बल झालीं. एशियामध्यें मुसलमान प्रबल झाले व त्यांनीं खिस्ती धर्माचें आदिपीठ जरुशलेम हें शहर बळकाविलें. खिस्तीलोकांस जरुशलेम नामक पुण्य क्षेत्रांत जातां येईना; हें क्षेत्र सोडविण्यासाठीं जीं दहा बारा धर्मयुद्धें खिस्ती व मुसलमानांत दोन तीन शतकें चाललीं होतीं, त्यांत यश येईना. तुर्क लोकांनीं तरवारीच्या जोरावर प्रतिदिवशीं पुढें पाऊल टाकण्याचा जो धुमधडाका चालविला होता, त्याचा प्रतिरोध करितां येईना, आणि रोमन बादशाहीचें मुख्य ठिकाण जें कॉन्स्टान्टिनोपल, त्याचाही बचाव करितां येईना. सारांश, खिस्ती राष्ट्रांचा सर्वथा पराभव होऊन त्यांस पळून जावें लागलें. तुर्कप्रतिकार होण्याचें एकीकडे राहून उलट कॉन्स्टान्टिनोपल येथें तुर्कांनीं आपली बादशाही स्थापन केली. ही तुर्क बादशाही चार-पांचशें वर्षे कशी बशी राहिली होती; पण आज मात्र ही युरोपियन तुर्क बादशाही निर्वाण समयास येऊन पोंहचली आहे ! गाड्यावर नांव व नावेवर गाडा हा प्रकार चालावयाचाच ! असो; सांगावयाचें तात्पर्य हें कीं, धर्मांत सांगितलेलें जीर्ण आचारविधीचें तंत्र यथास्थित चालत असतांही आंतील प्राण जर कायम नसले, देवभक्ति सुटून देहभक्ति लागेल, तर धर्मच काय पण मोठमोठालीं शक्तिवंत राष्ट्रेंही काळाच्या भक्षस्थानीं पडून नामशेष होतात. यासाठीं धर्मप्रवर्तक व आचारप्रवर्तक लोकांनीं धर्मतत्वाविषयीं नित्य बुद्धिपूर्वक विचारणा केली पाहिजे. व जसजसे कालस्थित्यनुसार आचार बदलतील तसतसे धार्मिक संस्कार व धर्मविधि बदलून धर्माच्या प्राणाचें संरक्षण केलें पाहिजे. केवळ शब्दच्छल करण्यानें हें संरक्षण होत नाहीं. शब्दच्छलानें प्रतिपक्षी निरुत्तर होईल पण निःशंक होणार नाहीं. असो. तेव्हां पोप काय, मुल्ला काय किंवा शंकराचार्य काय या सर्वांनीं धर्मजागृतीचा ध्यास ठेवून वेळोवेळीं धर्माचरणाच्या तंत्रांत वस्तुस्थिति पाहून फरक केला पाहिजे व ज्या तत्वज्ञानाच्या अभंग, अभेद्य पायावर धर्माची, ज्ञानाची, कला कौशल्याची, व्यवहाराची व नीतीची इमारत बांधली आहे, किंवा बांधावयाची आहे त्या मूळ पायांस धक्का न लागेल अशी त्या त्या इमारतीची घडण नवी जुनी केली पाहिजे.

(७) इ. स. १४५३ सालीं तुर्क लोकांनीं रोमन बादशाहीचें मुख्य नगर जें कॉन्स्टान्टिनोपल तें काबीज केलें. ही गोष्ट फार मोठी झाली. ह्या गोष्टीमुळें यूरोपखंडांत एक विलक्षण विचारक्रांति झाली. खिस्ती धर्मपंथांत अनेक कारणांनीं घाण होण्यास आरंभ झालाच होता. सरस्वतीदेवीची अविद्यमानता, विषयसुख भोगून मोक्ष मिळविण्याची हांव, नागरिक संस्कृतीचा अभाव इत्यादि कारणांनीं नामधारी धर्मप्रवर्तकांचें चांगलेंच फावलें होतें. सत्य, दया, परोपकार, पापशून्यता, ईश्वरीनिष्ठा प्रभृति अनेक सात्विक सद्गुणांच्या आश्रयानें सिद्ध झालेला खिस्ती धर्म अथवा त्याचे प्रवर्तक हळुहळू आपलें आश्रयस्थान सोडून देऊं लागले होते. खिस्ती लोकांत हेच धर्मप्रवर्तक लोक काय ते विभूषित असल्यामुळें त्यांचें वर्चस्व उत्तम तऱ्हेनें प्रतिष्ठापित

झालें होतें. सत्ता, संपत्ति, सन्मान हीं सर्व ह्या धर्म-प्रवर्तकांपुढें हात जोडून उभीं राहातं. मग काय विचारावें ? या सकारत्रयीच्या वारुणीनें उन्मत्त होऊन त्यांनीं आपल्या आधारदेवतांचे, दयाधर्म इत्यादि दैवी सद्गुणांचे बंध तोडण्यास आरंभ केला. आपली सत्ता, संपत्ति व सन्मान स्थिर करण्यासाठीं त्यांनीं श्रद्धालु पापमग्न लोकांचीं व विशेषतः भोळ्या बायाबापड्यांचीं पापें दूर करणारीं पण कमीं अधिक कठीं असणारीं प्रायश्चित्तें शोधून काढलीं. प्रायश्चित्ताचे दर ठरविले. लोकांचा भाव बसावा एतदर्थ ' चमत्कार ' उत्पन्न केले, जे काय लहान मोठे राजे होते त्यांचें राजकीय कल्याण करण्याचा आव घालून त्यांची भक्ति संपादन केली. व अनेक सूक्तासूक्त कृत्यापकृत्यें करून आपलें वर्चस्व स्थापित केलें; पण या संस्कृत अनाचारानें धर्माचें मात्र मातेरें झालें. धर्मरहस्याला ग्रहण लागून धर्मतंत्राचें बंड वाढलें. मधून मधून कांहीं सत्पुरुष रोम येथील धर्मपीठावर येत व ते या अनाचाराला आळा घालण्याचा प्रयत्न करीत; पण व्यर्थ सहजासहजीं उदरपोषणाचीं साधनें उपलब्ध होत असतां तीं सोडून देऊन अदृश्य सुखांसाठीं विद्यमान, वैषयिक सुखें कोणता शहाणा संसारी सोडून देईल ?

असो, ही धर्मग्लानीची बंडाळी कित्येक शतकें यूरोपखंडांत धुमाकूळ घालीत होती. तथापि लोकलज्जेस्तव म्हणा अथवा मनोलज्जेस्तव म्हणा कित्येक पापभीरू महंतांनीं वैराग्यसंवर्धक मठांची स्थापना करून खाइस्टचे हेतु फलद्रूप करण्याचा प्रयत्न केला. असे चार पंथ प्रमुख असत; डामिनिशिअन, फ्रान्सिस्कन, आगस्टिनियन, बेनिडिक्टाइन व हे ते प्रमुख पंथ होत. तसेंच कित्येक विद्वानांनीं **ऑरिस्टाटल नामक** तत्त्ववेत्त्याचे ग्रंथ अधीत करून त्याचें तर्कशास्त्र स्वीकृत केलें आणि खिस्तीधर्मास सुघटित स्वरूप दिलें. हा सर्व प्रकार झाला हें ठीक; पण त्यानें सामान्य लोकांवर यत्किंचितही परिणाम झाला नाहीं. सांप्रदायिक धर्मपद्धति, धर्मसंस्कार, धर्मतंत्रें आपापल्या पूर्ण जोरांत होतीं. धार्मिक अज्ञान, धार्मिक अंधश्रद्धा, धार्मिक अंधकार सर्वत्र स्वैरसंचार करीत होता. तथापि लोकांच्या अंतःकरणमूलांत धर्मबुद्धि, आस्तिकता, भक्ति हीं अद्यापि जीव धरून होतीं.

ज्या राष्ट्रांत प्राणज्योति प्रदीप्त असून सत्कर्म करण्याची धमक जिवंत असते, त्या राष्ट्रावर राजकीय आपत्ति कितीही आल्या, धर्मग्लानीला केवढें उग्र स्वरूप आलेलें असलें, तरी त्या राष्ट्राचा पुनः उदय होणें स्तब्ध होत नाहीं; हा ईश्वरी नेमानेम आहे. आंतून सुधारणा होणें शक्य नसेल, तर कांहीं अपूर्व बाह्यप्रसंग निर्माण करून परमेश्वर रक्षागृहांतील अग्नीप्रमाणें जिवंत असलेल्या त्या राष्ट्राला संजीवनी मात्रा देतो आणि त्या त्या राष्ट्राचें नियतकर्म त्याकडून करवितो. यूरोपखंडाचाच वृत्तांत पहाना ! कोणीकडे १४५३ मधील तुर्क लोकांचा विजय आणि कोणीकडे युरोपियन राष्ट्रांची पुनर्घटना ! कांहीं संबंध नाहीं. तथापि तृणानेंही कार्य संपादणाऱ्या परमेश्व-

रानें असा कांहीं चमत्कार केला कीं, एका अपमानकारी क्षुल्लक पराभवानें सर्व खिस्ती राष्ट्रांचा पुनर्जन्म झाला ! तुर्क लोकांनीं 'इस्तंबोल'– (Constantinople) शहर काबीज केलें काय, तेथील ग्रीक पंडित सर्व युरोपभर पसरले काय, त्यांनीं ग्रीक आर्यांच्या सर्वांगसुंदर संस्कृतीचें अंजनरूपी उद्दीपक बीज पेरलें काय आणि सर्व राष्ट्रें खडबडून जागीं झालीं काय, सर्वच चमत्कार ! पण हा चमत्कार घडून आला हें खास.

ग्रीक पंडितांनीं आपल्याबरोबर प्राचीन ग्रीक सारस्वत नेलें व त्याचा प्रसार करण्यास आरंभ केला. परमेश्वर सर्वज्ञ आहे, तसाच अंतर्बाह्य सर्वांगसुंदर असून आपल्या भक्तांनीं सर्वज्ञत्व संपादावें, सृष्टिसौंदर्य समजून घेऊन उपभोगावें आणि सुंदर व्हावें, स्वतंत्र असावें, ज्ञानाचा व सौंदर्याचा परिपोष करावा ! हा या प्राचीन ग्रीक संस्कृतीचा प्राण होय. डान्टी (Dante) नामक प्रसिद्ध कवीनें गाइलेलें मानवी बुद्धीचें व मानवी कर्तृत्वाचें निःसीम महत्व, अमेरिका–खंडांचा नवीन शोध, छापण्याची कला, दुर्बिणीचें आगमन इत्यादि नवीन गोष्टींनीं ग्रीक संस्कृतीनें उत्पन्न केलेल्या 'महत्वाकांक्षेंत' भर पडली आणि धर्म–ग्रंथांत सांगितलेलें ज्ञान संपादन करणें ही काय ती ज्ञानाची सीमा नसून नवीन ज्ञान व नवीन तत्त्वें शोधून काढण्याला मानवी बुद्धीस लागेल तेवढें विस्तीर्ण व प्रकट करण्याचें सामर्थ्य आहे असा समज प्रचलित झाला. प्राचीन काव्य–नाटकादि मनोरम ग्रंथांचें अध्ययन करून नवीन काव्यें निर्माण करणें, गायन, वादन, चित्रलेखन, मूर्तिकरणें, स्थापत्य (Engineering) इत्यादि कला धर्मविरोधी नसून त्या धर्मसंपोषक आहेत, हें तत्त्व सामान्य लोकांत बाणूं लागलें, शुष्क व शाब्दिक विषयवैराग्याची चीड उत्पन्न झाली, विषयांचा सात्विक उपभोग घेऊन व घेववून शरीरयष्टीची व अंतःकरणचतुष्टयाची शुद्धि करावयाची व धर्मसंग्रह करावयाचा हें व्रत लोकमान्य झालें. प्लेटो नामक महातत्त्ववेत्त्याचें तत्त्वज्ञान, एश्चिलीस, साफोक्लीस इत्यादि कवींचे मनोहर ग्रंथांतील रमणीय सौभाग्य, पेरिक्लीस नामक महाराजकार्यधुरंधराची कुशल राजनीति, अथीनियन लोकांचा देशाभिमान; इत्यादि गोष्टींचा परिचय होऊन युरोपियन लोकांचें मन विकसित झालें आणि ज्ञानसौंदर्याला व सौंदर्यज्ञानाला भर चढला. शब्दामध्यें गुरफटलेलें ज्ञान आपले बंध तोडून अर्थाकडे धांवूं लागलें, तंत्रविषयक अभिरुचीचें संक्रमण धर्मरहस्यज्ञानामध्यें झालें. सारांश, मानवी प्राणी हा पुराणसंस्कृतीचा बंदा गुलाम नसून सर्वथा म्हणजे अर्थानें, प्राणानें, मनानें व आत्मदृष्टीनें स्वतंत्र आहे. दुसऱ्याचें अकल्याण न करितां स्वतःचें ऐहिक व पारमार्थिक कल्याण संपादण्यास त्याला पूर्ण स्वातंत्र्य आहे, अशी भावना जागृत झाली आणि सूर्यप्रकाशाप्रमाणें ती सर्व यूरोपभर पसरली. ह्या स्वतंत्र भावनेनें परदास्यलोलुप संप्रदायाला मागें ढकलण्याचा संकल्प जागृत झाला. तेव्हां अर्थात् संप्रदाय आणि नवीनता,

प्राचीनता व अर्वाचीनता, श्रद्धा व तर्क यांमध्यें दारुण संग्रामाला आरंभ झाला; आणि हा आरंभ म्हणजे प्रस्तुतच्या निबंधविषयक धर्मक्रांतीचा इतिहास होय.

(८) आतां हें खरें आहे कीं, या पुनः जन्म पावलेल्या ग्रीक संस्कृतीचा अलेक्झांडर, ज्युलियस, लियो, क्लेमंट इत्यादि पोपांनीं (धर्माध्यक्ष आचार्यांनीं) प्रथम प्रथम आदरपूर्वक स्वीकार केला. सहावा अलेक्झांडर १५०३ मध्यें निजधामास गेला. त्याचें शील पराकाष्ठेचें दुष्ट होतें, तरी त्यानें पोपचा अधिकार (धर्माध्यक्षांची राजकीय सत्ता) स्वतंत्र करण्याचा प्रयत्न करून इटली देशास मिळणाऱ्या भावी स्वतंत्रेचें बीज आतांच रोंवून ठेविलें. ज्युलियस (१५०३–१५१३) महापंडित होता. याच्या पदरीं कॅस्टिग्लियोनसारखे नवीन पंथाचे सारस्वत आणि रॅफीली, मायकेल अंजेलो सारखे अद्वितीय चित्रकार असत. रोम येथील सेंटपीटरचें भव्य देवालय बांधण्यास आरंभ याच्याच अमदानींत झाला. आनंदी व दानशूर लियोचे कारकीर्दींत (१५१३–१५२२) नवीन संस्कृति कळसास पोहोंचली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. हें सर्व ठीक झालें. प्राचीन संप्रदायाचा व अर्वाचीन स्वतंत्रेचा एकजीव करण्याचा पुष्कळसा प्रयत्न वरील राजवटींत झाला, हेंही खरें; पण नवीन जन्म पावलेली स्वतंत्रता जीर्ण पण बद्धमूल झालेल्या संप्रदायाचें दास्य पत्करण्यास कबूल नव्हती व संप्रदायही आपली संपादिलेली कक्षा सोडण्यास तयार नव्हता. मात्र या गडबडीचा व पोपांच्या राजकीय उलाढालींत पडण्याचा असा परिणाम झाला कीं, पोपांनीं रोमन धर्मगादीला अतोनात कर्ज करून ठेविलें आणि त्या गादीवर अनेक संकटें ओढवून आणिलीं.

(९) या सरस्वतीसंजीवनाचे (Revival of Letters) निरनिराळ्या राष्ट्रांवर निरनिराळे परिणाम झाले. सामान्यतः यूरोपमधील दक्षिणेकडील राष्ट्रांस लॅटिन राष्ट्रें म्हणूं या व उत्तरेकडील राष्ट्रांस ट्युटानिक म्हणूं या. लॅटिन राष्ट्रांत रोमन बादशाहीच्या वृक्षाचीं मुळेंपाळें अद्यापि नष्ट झालीं नव्हतीं. पूर्वकालीन बादशाही थाटाच्या खाणाखुणा, त्या वेळचे पुतळे, तत्कालीन देवालयें, कविता, रीतिभाती समूळ नामशेष झाल्या नव्हत्या. दाक्षिणात्य लोकांस इटली हें पुण्यक्षेत्र वाटत असून तेथील साधूंच्या वसतिस्थानांस तीर्थांचें स्वरूप आलें होतें. सामान्यतः या राष्ट्रांतील काव्याची, वाङ्मयाची, ललितकलांची प्रेरणा ग्रीकसंस्कृतीच्या प्रभावानें होई. यामुळें या राष्ट्रांतील सरस्वतीसंजीवनाला वाङ्मयाचें स्वरूप येऊन धर्मग्रंथ विशद करणारीं अनेक व्याकरणें, निघंटु, निरुक्तें, भाष्यें उदयास आलीं. गद्यपद्य सारस्वत वृद्धिंगत झालें. संप्रदायाचें स्पष्टीकरण करणारीं वार्तिकें प्रकट झालीं. ग्रीक सारस्वताचें व तत्त्वज्ञानाचें अध्ययन जोरानें सुरू झालें. सारांश, प्राचीन ग्रीक व प्राचीन रोमन लोकांचे संसारसौंदर्याचे विचार पुनः जागृत करण्याचें श्रेय सरस्वतीसंजीवनानें दाक्षिणात्य राष्ट्रांत घेतलें. कारण दाक्षिणात्यांची भावना प्राचीन सार-

स्वताच्या ऐहिक कल्पनांनीं प्रेरित झाली होती. यांचा रोख शब्दाची छाननी करून अर्थ लावण्याकडे जास्त असे. यामुळें लॅटिन राष्ट्रांत पूर्वसंप्रदायानुरूप परमेश्वर-संशोधन करणारा एक पंथ व पूर्वसंप्रदाय चिरंतन करण्याचा प्रयत्न करणारा एक पंथ, असे दोन पंथ निघून त्यांनीं पूर्वकालीन लॅटिन धर्मशास्त्रें व पूर्वकालीन लॅटिन सांप्रदाय जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला. कांहीं पंडित प्लेटोचे शिष्य बनले, कांहींनीं ॲरिस्टाटलचें अनुयायित्व पत्करलें; तरी पण या ग्रीक सारस्वताच्या अध्ययनाचा परिपाक ख्रिस्ती–धर्मावर अश्रद्धा उत्पन्न करीत आहे, असें लक्षांत येतांच हीच संजीवनी पश्चाद्गामिनी झाली आणि धर्म–संरक्षण करण्यासाठीं सर्व सारस्वताचा व तत्त्वज्ञानाचा अवतार आहे ही कल्पना तिनें दृढ केली.

पण उत्तरेकडील ट्युटॉनिक राष्ट्रांच्या पायांत (जर्मनी, हालंड, स्वीत्सर्लंड, इंग्लंड इत्यादि) प्राचीन लॅटिन संस्कृतीची शृंखला नव्हती, म्हणून तेथील सरस्वती-संजीवनास निराळेंच वळण लागलें. त्यांनीं ख्राइस्टचें ध्येय काय होतें तें पाहण्याचा बुद्धिपूर्वक प्रयत्न केला. ख्रिस्ती साधूंचे ग्रंथ अवलोकन करणें, त्यांच्या ग्रंथांचा प्रसार करणें, विश्वनिरीक्षण करून कार्यकारणांचा संबंध ठरविणें, हीब्रू व ग्रीक भाषांचें अध्ययन करून धर्मोद्गमाचें ज्ञान संपादणें, प्रचलित धर्माचें स्वरूप शुद्ध करणें, विधीचें स्वरूप स्पष्ट सांगणें, ईश्वर आणि ख्रिस्ट, यांचें स्वरूप समजून घेऊन तत्प्रीत्यर्थ ईश्वरी नियमानुसार आचार ठेवणें, धर्मग्रंथ धर्माच्या आड येत असतील, तर त्यांस झुगारून देणें आणि व्यक्तीचें व समाजाचें वर्तन, सुधारणेची दिशा, राज्यस्थापना, धर्म-युद्धें, मानसिक शुद्धि आणि शिक्षणाचे नियम हीं सर्व ख्रिस्तप्रणीत धर्माच्या आधारावर स्थापित करणें हा ट्युटॉनिक संजीवनाचा प्राण होता. इहलोकापेक्षां परलोकाची चाड या लोकांस जास्त होती. हे संप्रदायाला मान देणारे लोक नव्हते. चित्तशुद्धि करावयाची, शुद्ध भाव संपादावयाचा हा त्यांचा मुख्य कटाक्ष होता.

सारांश, लॅटिन राष्ट्रें (इटली, फ्रान्स, स्पेन, पोर्च्युगाल इत्यादि) संप्रदायाचीं अभिमानी होतीं व ट्युटॉनिक राष्ट्रें शुद्ध चित्ताचीं अभिमानी होतीं. लॅटिन राष्ट्रांनीं पोपनिर्मित धर्मसंस्थांचें संरक्षण केलें, तर ट्युटॉनिक राष्ट्रांनीं धर्माचें स्वरूप उज्वल करून मनुष्यास धार्मिक स्वातंत्र्य दिलें. लॅटिन राष्ट्रें श्रद्धामूलक विचार करीत, तर ट्युटानिक राष्ट्रें विचारमूलक श्रद्धेचा अवलंब करीत. असो; एक गोष्ट निश्चित आहे, ती ही कीं, या विद्येच्या पुनर्जन्मानें धर्मसंप्रदायाचें स्वरूप पुष्कळ शुद्ध केलें, मनुष्यास इहलोकींच्या सात्विक सुखाचा, सौंदर्याचा व स्वतंत्रेचा लाभ सुगम करून दिला, धर्माचें बीज शुद्धतर करून धार्मिक दास्याला पराङ्मुख केलें, जीवाची (नरदेहाची) महती वाढविली, कर्मसंन्यासाला कर्मफलसंन्यासाचें स्वरूप दिलें आणि एकंदरींत ऐहिक व पारमार्थिक जीवितयात्रा सुकर, सुखकर, स्वतंत्र आणि सात्विक केली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

(१०) या संस्कृतीच्या मन्वंतरांत वाला (महावैय्याकरण), इरॅस्मस (महा विद्वान् पंडित), हट्टन (महाव्रात्य टीकाकार) इत्यादि पंडितांनीं सांप्रदायिक धर्मग्रंथांचें परिशोधन करितांना सांप्रदायिक अपपाठ दाखवून दिले. पिको (एक सत्यान्वेषी पंडित), रुश्लीन (अद्वैतवादी तत्त्ववेत्ता), हट्टन (धार्मिक स्वातंत्र्याचा गजर करणारा एक विनोदी पंडित), इरॅस्मस (अभियुक्त वाङ्मयाचा पुरस्कर्ता व प्रसारक पंडित,) इत्यादि महान् महान् विद्वद्रत्नें उदयास येऊन त्यांनीं ज्ञाननौका बरीच लांबपर्यंत वल्हवीत नेली. हे सर्व पंडित कमी अधिक प्रमाणानें धीट व नेटदार होते, शब्दपांडित्य जाऊन अर्थपांडित्य व्हावें, शाब्दिक वाद संपून पदार्थगत वादविवाद व्हावे, सत्यान्वेषणा व्हावी, हा त्यांचा कटाक्ष होता. असो, यांच्या या प्रयत्नाला पुष्कळ यश येऊन जुन्या व नव्या मंडळींत धर्मचर्चा गंभीरपणानें सुरू झाली; धर्मप्रवर्तकांचें आचरण शुद्ध झालें व ' सत्याअसत्या **मन केलें ग्वाही** ' ही सामान्य जनांची समजूत झाली. तसेंच तत्त्वज्ञानाचें अध्ययन जोरानें सुरू होऊन, प्लेटो नामक ग्रीक तत्त्ववेत्त्याचे शिष्य प्रचलित धर्माचे आक्षेपक झाले व ॲरिस्टाटलचे भक्त धर्मसंरक्षक झाले. असो; या संस्कृतीनें धार्मिक स्वातंत्र्याबरोबरच राजकीय, सामाजिक व औपचरिक स्वातंत्र्याच्या कल्पनांचेंही याच वेळीं बीजारोपण केलें. आणि आजमितीला युरोपियन राष्ट्रें जो राजकीय, सामाजिक, धार्मिक स्वातंत्र्याचा उपभोग घेत आहेत, त्याचें बरेंचसें श्रय या सरस्वतीसंजीवनास आहे, असें म्हणण्यास कोणताही प्रत्यवाय नाहीं.

ल्यूथरकालीन परिस्थिति.

(११) ल्यूथरचा जन्म १४८३ मध्यें झाला, हें सर्व प्रसिद्ध आहे. या वेळीं धर्माची परिस्थिति फारच शोकास्पद होती. पोपांच्या धार्मिक पीठाला बरेंच राजकीय स्थैर्य देणारा व धर्मपीठांस राजकीय संस्थानांचें स्वरूप देणारा सहावा अलेक्झांडर हा पराकाष्ठेचा क्रूर, विषयासक्त, विश्वासघातकी व अद्वितीय महत्वाकांक्षी होता. धर्मसंस्थेंत शुद्धता उत्पन्न करणें ही गोष्ट त्याच्या गांवींही नव्हती. आतां हें खरें कीं, याच्यापूर्वीं शें दोनशें वर्षांपासून धर्मसंस्थानाची शुद्धि करण्यासाठीं वैराग्याचें व्रतग्रहण, राजकीय आश्रयसंपादन, धर्मग्रंथसंशोधन इत्यादि उपाय करून पाहिले होते व ते सर्व व्यर्थ झाले होते. अलेक्झांडरनें व त्यानंतर झालेल्या पोपांनीं नवीन ग्रीक संस्कृतीचा आदर करून ती धर्मसंस्थांचें संरक्षण करण्याचे कामीं उपयोगी पडेल, व संस्थानांत वाढलेले दोष कमी करण्याचें कारण पडणार नाहीं, असा घाट घातला पण तो फसला.

(११) ख्रिस्ती धर्माला भयभीत करणारे बाहेरचे शत्रु म्हणजे ब्राह्मणी धर्म, बुद्ध धर्म व इस्लामी धर्म होत. आंतून ग्रीकचर्च व रोमनचर्च यांमध्यें पोपाचाराच्यासंबंधानें मनस्वी वांकडें आलें होतें. तथापि लॅटिन लोकांत विद्येचा

चांगलाच शिरकाव झाला असल्यामुळें लॅटिन ख्रिश्चियानिटीचा जोम चिंवट होता. व अमेरिकेसारखें नवें खंड लॅटिन ख्रिश्चियन्सच्या हातांत आल्यामुळें, त्याच्या धर्माचा प्रसार जोरानें होण्याची संधि आली.

(१२) रोमन (लॅटिन) चर्च मध्यें सात मुख्य धार्मिक संस्कार असत. त्यांत प्रार्थनागृहांतील स्थंडिलाजवळ जाऊन बाप्तिस्मा (ख्रिस्ताच्या तीर्थोदकानें मार्जन व त्याचें सेवन) हा विधि मुख्य होय. या विधिप्रसंगीं प्रत्यक्ष ख्राइस्ट प्रार्थनागृहांत सादर होत असे, अशी ख्रिस्त लोकांची समजूत १२ व्या शतकापासून प्रचलित झाली. पुढें लवकरच ' मेरी मातेची पूजा ' सुरू झाली. पाद्री भिक्षुक म्हणजे ' भूसुर, भूदेव, (भूख्रिस्त)' ही कल्पना सार्वत्रिक झाली. पाद्र्यांनीं ब्रह्मचारी असावें, परिग्रहशून्य असावें, हें ठरल्याबरोबर गृहस्थाश्रमांतील धर्मोपदेशक कमी दर्जाचे असे वाटूं लागले. ख्रिस्ती धर्माचें रहस्य व ख्रिस्ताचें माहात्म्य ब्रह्मचारी पाद्र्यांच्या द्वारें मात्र स्पष्ट कळणार व अनुभवास येणार, ही भावना पसरली. अर्थातच पापाचा उच्चार करून पश्चात्तापाचीं चिन्हें पूर्ण दिसल्यानंतर ब्रह्मचारी भिक्षूनें दिलेलें प्रायश्चित्त जितकें गुणावह होतें तितकें इतरांनीं दिलेलें प्रायश्चित्त होत नाहीं, हें खूळ जास्त दुणावलें. लोक प्रतिवर्षी प्रायश्चित्तें घेऊं लागल्यामुळें ब्रह्मचारी धर्मोपदेशकांचा प्रभाव लोकोत्तर झाला हें काय सांगावें ? तसेंच पोप महाराज हे प्रतिख्राइस्ट झाले ! त्याची आज्ञा ती ईश्वराची आज्ञा झाली व पोपविरुद्ध ईश्वराकडे दाद मागणें अशक्य झालें ! ' पोप कधीं अन्याय करीत नाहीं. व त्याचें शरीर अति पवित्र आहे ' हा समज प्रचलित झाला. अर्थात् व्यवहारी बादशहापेक्षां पोपची सलाबत अनेक पटींनीं वाढली आणि पोप कितीही स्वच्छंदी, व्यसनी, द्रव्यलोभी व विषयासक्त असो, तो करील ती पूर्वदिशा, हा समज लहान-मोठ्यांत, श्रीमंत-गरीबांत व बायका-पुरुषांत राजरोस वावरूं लागला. धर्माच्या नांवावर हजारों निरुपद्रवी साधुपुरुषांचा छल पोपच्या आज्ञेनें झाला. त्या दुर्धर छलाचें वर्णन शब्दांनीं करणें केवळ दुरापास्त आहे. सरस्वतीदेवीचीं उपकरणें म्हणजे शालागृहें, विद्यापीठें, धर्मपीठें, तत्त्वज्ञानविचारगृहें, चित्रकला, गायन-वादन, काव्यनाटकें, इत्यादि पोपमहाराजांच्या आश्रयाला असल्यामुळें पोपचें माहात्म्य वर्णन करण्यांत समर्पित होत होतीं. पोथ्या-पुराणें पोपाश्रितांनीं लिहावीं, त्यांचें प्रवचन तदाश्रितांनीं करावें; अमके अमके ख्रिस्ती साधु अमुक चमत्कार करितात, समाधि डोलतात, इत्यादि प्रकारचीं वर्तमानें पोपाच्या हस्तकांनीं प्रसृत करावीं, मणिमंत्र, दोरे, ताईत इत्यादि ख्रिस्त पवित्र वस्तूंचा संग्रह करवावा, असा प्रकार धुमधडाक्यानें चालू झाला. हा धर्मश्रद्धेचा अनान्वित मासला सर्वांनीं लक्षांत ठेवण्यासारखा आहे. फार काय सांगावें. पुढें पुढें तर बायबल हा ' दैवीग्रंथ ' सुद्धां मूलस्वरूपांत दिसेनासा झाला, आणि पोपकृत ग्रंथच पवित्र असा बोलाबाला झाला.

(१३) वर सांगितलेल्या अकांडतांडवाला प्रतिरोध झाला नाहीं, असें नाहीं. बादशाही सभेनें ' दाहिजा वसूल करूं नये ' अशी विनंति पोपला केली; पोपच्या आश्रितांनीं बादशाही परवान्याशिवाय कोणतेंही आज्ञापत्र काढूं नये, बादशाही सभा बोलावण्यास पोपच्या आज्ञेची अपेक्षा नको, इत्यादि प्रकारांनीं पोपसत्ता प्रतिरुद्ध करण्याचा प्रयत्न झाला; पण त्याचा तादृश उपयोग झाला नाहीं. उलट तुर्कांविरुद्ध युद्ध करण्यासाठीं, सेंट पीटरचे देवालयाचा जीर्णोद्धार करण्यासाठीं म्हणून धर्माच्या नांवावर सुरू केलेले कर जबरदस्तीनें वसूल करण्याचा धडाका सुरू होता. जमलेलें द्रव्य पोपांच्या चैनींत, धर्मांतील भिक्षूंच्या शाल्यन्नांत बिन दिक्कत खर्च होत होतें. धर्माध्यक्षांनीं न्यायाच्या कामांत वाटेल तसा सांवळागोंधळ घालून आपल्या वर्गाचें, त्यांच्या हक्कांचें व मालमत्तेचें संरक्षण व वृद्धि करण्यासाठीं गृहस्थांच्या हक्कांची पायमल्ली करावी, मठांत चोर, खुनी, शिंदळलोकांस खुशाल आश्रय देऊन राजसत्ता व लोकसत्ता धाब्यावर बसवावी, वाटतील तसे पर्व-पर्वण्यांचे पवित्र दिवस उत्पन्न करून पैसे उकळावे, ब्रह्मचाऱ्यांनीं सदासवाष्णींचें आराधन दिवसाढवळ्या करावें, लेकवळ्यांस प्रायश्चित्तें देऊन पंक्तिपावन करावें, राज्यवृद्धि, लोककल्याण, धर्मप्रसार इत्यादि आवश्यक कर्तव्यांप्रीत्यर्थ एक बोटसुद्धां उचलूं नये, किंवा कवडी खर्च करूं नये, हत्ती-घोडे उडवावे, सारांश ' एक दिवसाची चैन करावीशी वाटेल तर एखादें कोंबडें काप, वर्षभर चैन करावयाची असेल तर लग्न कर, पण सर्व जन्मभर सुखाच्या गादीवर लोळावयाचें असेल तर धर्मभिक्षु हो' हा वाक्प्रचार सर्वत्र सुरु झाला !!

असो; राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यांची चळवळ सहजच धार्मिक पारतंत्र्याचा विचार जोरानें पुढें आणूं लागली. पोपांचें किळस आणणारें दुर्वर्तन व सर्व कामांत धर्माधिकाऱ्यांच्या हातांत आलेली अनियंत्रित सत्ता, पोपच्या जामदारखान्यांत वाढत जाणारी सुवर्णसंपत्ति, पोपच्या सत्तेचें व राजसत्तेचें झालेलें नियुद्ध (झोंबाझोंबी), या युद्धांतील जयानें प्राप्त झालेला पोपांचा उन्माद, पंचमहापातक्यांस पोपाश्रितांनीं दिलेला आश्रय, इत्यादि कारणांनीं पोपचें धार्मिक नायकत्व सामान्य लोकांस दुःसह झालें. लौकिक सारस्वतानें या पेटलेल्या लोकद्वेषाग्नींत भर टाकिली; अभियुक्त सारस्वतानें पोपनिर्मित अशुद्ध मार्गाचें खंडन करून सन्मार्ग दाखविला; लांबर्डीच्या पिटरनें कमी जास्त केलेला धर्मसंग्रह तिरस्कृत झाला, आणि जर्मनींतील लहानमोठे लोक एकसहा पोपचा द्वेष करूं लागले. अशा आणीबाणीच्या प्रसंगींही आपल्या घराण्याचें संस्थान जिवंत राहावें म्हणून पोपनें पैसे उकळण्यास प्रारंभ केला, तो तर नागाच्या विषदंतासारखा प्राण घेणारा आहे, असें लोकांस वाटलें, यांत नवल नाहीं. प्रायश्चित्ताचीं पंक्तिपावक आज्ञापत्रें हस्त नक्षत्रांतील हत्तीच्या सोंडेच्या धारेनें याच वेळीं वर्षूं लागलीं; असो. हीं साक्षात् व परंपरेचीं कारणें पोपसत्तेचा विनाश करण्यास कारणीभूत झालीं.

ह्या अधर्माच्या अभ्युत्थानाचा प्रतिकार करावा, म्हणून जर्मनीमध्यें अनेक कवि, अनेक ग्रंथकार उत्पन्न होऊन त्यांनीं लावण्या, फटके, कटाव निर्माण केले व त्यांत अन्योक्तीनें भिक्षूंच्या ग्राम्य वर्तनावर खरपूस टीका केली; श्रीमंतांनीं व विद्वान् पंडितांनीं शिक्षणक्रम जास्त सात्विक करण्यासाठीं प्राचीन वाङ्मय देशी भाषेंत आणिलें; व्याकरण, अलंकार, वाक्यरचना मनोरम केली; सहजसुंदर लेखन-सुभगतेनें सर्व लोकांचें मनोहरण करणाऱ्या **इऱ्यास्मस** नामक पट्टीच्या विद्वानानें 'शब्दच्छल, घटविच्छिन्न, पटविच्छिन्न' इत्यादि गडबडगुंडा करून मोह उत्पन्न करणाऱ्या अर्थशून्य सारस्वताची खरडपट्टी काढिली; विनोदप्रचुर उपालंभाचा, (टोंचून लिहिण्याचा) आश्रय करून धार्मिक विधि, धार्मिक आचार, धार्मिक उच्चार, भिक्षूंचें असभ्य वर्तन, त्यांची विषयासक्तता इत्यादि प्रकारांवर स्वच्छ उजेड पाडिला आणि अधार्मिक वर्तनाविरुद्ध जर्मन लोकमत चिडविलें, बायबल शुद्ध करून तें प्रसिद्ध केलें व याप्रमाणें ख्रिस्ती धर्मपुस्तकाची ऋजुता, सरळता व सात्विकता प्रकट केली. इतर पंडितांनीं विद्यापीठांत प्राचीन कवींचा प्रवेश करविला, प्राचीन ग्रीक, लॅटिन व हिब्रू भाषांचे कोश व व्याकरण तयार करून ते प्रसिद्ध केले. **रुश्लीन**सारख्या भाषापंडितांस व धर्मसुधारकांस बहिष्काराच्या अस्त्रानें जाळून भस्म करावें यासाठीं धार्मिकंमन्य पोपाश्रितांनीं आकाशपाताळ एक केलें, पण व्यर्थ ! कारण लोकमत विशेष खवळलें होतें. खुद्द धर्माचार्यांच्या गोटांतील कित्येक विद्वान् व सरळ स्वभावी पोपाश्रित या धर्मच्छलाच्या विरुद्ध होते. सारांश, काय सुंदर मनु हा ! वाङ्मयाचा विस्तार होत आहे, मानवी मन जागृत होत आहे, धन्य मी कीं हें पवित्र युग पाहण्यास मी जिवंत आहें' ही हट्टन नामक धर्मपंडिताची उक्ति या वेळीं सार्थ झाली.

(१४) 'ख्राइस्ट हाच धर्माचा आधार आहे,' 'मनुष्यप्राणी अल्पज्ञ आहे, ख्राइस्टचा अनुग्रह झाल्याशिवाय परमेश्वरी सर्वज्ञत्व, दयाघनत्व, अंनतत्व व सर्व शक्तिमत्व समजावयाचें नाहीं, शुद्ध सात्विक आचरण असेल, खरी परोपकार बुद्धि असेल, तरच जीवसार्थक्य होईल' या कल्पना विद्यापीठांत शिरल्या. सॅक्सनीमध्यें फ्रेड्रिकनें विटेनबर्ग येथें एक नवीन विद्यापीठ (University) स्थापन केलें. त्यांत ब्रह्मविद्येचा व विश्वविद्येचा अभ्यास खऱ्या शास्त्रिय पद्धतीनें प्रतिष्ठापित झाल्यामुळें ज्या विद्यार्थ्यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला त्यांपैकीं मार्टिन ल्यूथर एक होता. याचे आईबाप दरिद्री पण करड्या स्वभावाचे असत, म्हणून याला घरीं सुख लागलें नाहीं व शाळेंतील पंतोजी छडीचा प्रत्येक क्षणीं उपयोग करीत म्हणून बिचाऱ्याला शाळेंत सुख लागलें नाहीं. मुलगा कॉलेजमध्यें पाठविला तेव्हां बापाची आशा होती कीं, ल्यूथर हा मोठा वकील होऊन आपल्या कुळाचें नांव वर काढील; पण योगायोग निराळाच होता.

शाळेची किटकीट चुकली व संसाराची दगदग पाठीमागें लागली नाहीं, अशा वयांत कॉलेजमध्यें अभ्यास करणाऱ्या मुलांपैकीं कांहींजणांस तरी जीवित्वाचीं अत्यंत गूढ रहस्यें उकलावीं, जीवेशांचे संबंध काय आहेत तें ठरवावें, इत्यादि उच्च कल्पनांची प्रेरणा होऊन त्यांचें मन उत्कंठित होतेंच होतें. ल्यूथर हा असा तरुण होता. ईश्वराच्या घरचा न्याय अत्यंत निर्घृण आहे व तो अपराध्यास अत्यंत कडकपणानें शासन करितो असें त्याच्या मनानें घेतलें. लागलींच त्यानें 'आमरण' ब्रह्मचारी राहण्याची दीक्षा घेतली, निराहार केले, श्रवणमननाचा अभ्यास जारी ठेविला; पण मनाला शांति मिळेना, ' प्रायश्चित्तानें सर्व पाप जळून जातें ' हें पोपी तत्व त्याच्या नाजुक मनाला पटेना. स्वयंस्फूर्तीनें लोकांस धर्मोपदेश केला तरी त्याचें समाधान होईना, ' मनुष्याचा स्वभावच पापी आहे ' ही त्याची भावना नाहींशी होईना, त्यानें एकांतवास पत्करिला, मूक व्रत धारण केलें; पण सर्व व्यर्थ ! असो; पुढें त्यानें एकदां सुस्वर गायन ऐकिलें, एका वृद्ध महंतानें ' ख्रिस्तावर पूर्णश्रद्धा असली म्हणजे आपल्या पापाबद्दल आपल्यास क्षमा मिळते ' हें आश्वासक वाक्य काढून दाखविलें; " मनुष्य श्रद्धेनें तरतो, कर्मानें नव्हे " या महावाक्याची सरहस्य गुंडिका ल्यूथरकडून करविली. तेव्हां समाधानी आनंद होऊन त्याचें मन शांत झालें व ' ईश्वराची पवित्रता म्हणजे त्याची दयाघनता होय, तो आपल्या भक्तांचा उद्धार करितो, तो न्यायी आहे, पण दयाघनही आहे ' अशी त्याची खात्री झाली. व आपल्यास ' श्रद्धेचें निधान ' सांपडलें असें वाटून त्या शुद्ध पुरुषाच्या सात्विक मनाची तळमळ नाहींशी झाली. पुढें लवकर त्याची विद्वत्ता व शुद्धाचरण पाहून फ्रेड्रिकनें त्याला विटेन-बर्गच्या विद्यापीठांत तत्त्वज्ञानाच्या उपगुरूची जागा देऊन त्यानें तत्त्वज्ञान शिकवावें अशी योजना केली. पुढें कांहीं वर्षांनीं त्यानें रोमची यात्रा श्रद्धापुरःसर यथासांग केली. असो; १५१२ मध्यें ल्यूथर ' ख्रिस्ती धर्मशास्त्रांचा ' आचार्य झाला. अर्थात् त्याला बायबलाचा ' जुना व नवा करार ' शिकवावा लागे. तो शिक्षणाचें व धर्मोपदेशाचें काम हौसेनें व उत्साहानें करी. भाषणामध्यें तो धर्मग्लानीचा वारंवार उल्लेख करी व म्हणे कीं, ' धर्मांत जो घोंटाळा माजला आहे याला मुख्य कारण पाद्री लोकच होत. ' यांनींच भलभलतीं वाक्यें व वेडेवांकडे मंत्र धर्मशास्त्रांत घुसडून देऊन ख्रिस्ती धर्माचें मातेरें केलें आहे. आपण बायबलचें मात्र अध्ययन करावें, ही खरी श्रुति, ईश्वरवाणी आहे. ' हें त्याच्या उपदेशाचें सार आहे. स्वार्थत्याग करून भोगनिवृत्त व्हावें व ख्राइस्टला शरण जावें, परमेश्वरावर शुद्ध श्रद्धा ठेवणें हे सर्वसंतारक आहे ही त्याच्या मनाची गुरुकिल्ली आहे. ' दयाघनत्वाची सर्वशक्तिमत्ता ' व ' श्रद्धेची पूर्ण गुणावहता ' हा त्याचा महामंत्र आहे. ' नुसत्या उपासतापासांनीं, नुसत्या मंत्रपुष्पार्पणानें, नुसत्या हरिजागरानें कार्यसिद्धि व्हावयाची नाहीं. ' असा तो उपदेश करी. असो; हा त्या तीक्ष्णबुद्धि, करारी, लोकोपकारी ल्यूथरचा संशोधक उपदेश मुमुक्षु

जर्मन लोकांस पटूं लागला. मूलग्रंथाचीं सार्थ पारायणें होऊं लागलीं. मानवी निर्बंधांस कोणीं विचारीनासें झालें आणि ल्यूथरचें मत सर्वमान्य होऊं लागलें.

हा त्रोटक उपोद्घात पुढील निबंधाचें कांहींसें साहाय्य करील या हेतूनें लिहिला आहे. विषय फार मोठा, रा. देव यांनीं कोणते पुस्तकाचा आधार घेतला होता त्याचें अज्ञान, दोन वर्षेपर्यंत फुरसत मिळाली असतांही सांसारिक कारणामुळें योग्य परिश्रमाचा अभाव इत्यादि कारणांनीं हें काम माझ्या मनजोगें झालें नाहीं. तथापि मुख्य निबंधास हा उपोद्घात बराच पोषक होईलसें वाटल्यावरून येथें जोडला आहे.

चिं. गं. भानु.

श्री

युरोपांतील धर्मक्रांति

व

मार्टिन ल्यूथर.

प्रकरण पहिलें.

सन १५२१ च्या जानेवारी महिन्याच्या सहावे तारखेस ' वेर्मस् '[1] येथें एक सभा भरावी असा जर्मनीचा बादशहा पांचवा चार्लस यानें हुकूम केला. त्यानें सर्व राजांस आमंत्रणपत्रें लिहिलीं होतीं. त्यांत त्यानें ही सभा भरविण्याचा उद्देश असा कळविला होता कीं, 'ख्रिस्त धर्माच्या संबंधानें एक नवें मत प्रचारांत आल्यामुळें त्यापासून जर्मनी देशाची स्वस्थता भंग होण्याचीं आणि आपल्या पूर्वजांनीं ज्या धर्माचा अंगिकर केला, तो धर्म नष्ट होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. यास्तव त्या नव्या मताचा प्रसार बंद करण्याकरितां काय उपाय योजावे तें ठरविण्याकरितां ही सभा भरविण्याचा ठराव केला आहे.'

ल्यूथर[2] आणि त्याचे अनुयायी यांनीं सन १५१७ पासून जीं मतें प्रसिद्ध केलीं होतीं, तीं पांचवा चार्लस याच्या मनांत बिंबलीं होतीं. ह्या मतांपासून ख्रिस्त धर्मामध्यें अत्युत्तम सुधारणा झाली असून युरोपखंडांतील एक प्रदेश पोपच्या जुलमापासून अगदीं मुक्त झाला; व दुसऱ्या प्रदेशांतील लोकांवरचा जुलूम कमी झाला होता. आणि या मतापासून लोकांच्या मनावर जे उत्तम व हितकारक संस्कार झाले, तसे ख्रिस्त धर्म प्रचारांत आल्यापासून ह्या वेळपावेतों कधींही झाले नव्हते ह्यासाठीं हीं मतें प्रथमतः कोठून उत्पन्न झालीं, आणि तीं इतक्या त्वरेनें प्रचारांत येऊन लोकमान्य कशीं झालीं, याविषयीं आपणांस बारीक शोध केला पाहिजे.

ज्या मतांवर फार काळापासून लोकांची पूर्ण श्रद्धा बसली आहे, आणि ज्याला सत्ताधीश लोकांनीं आपला आश्रय दिला असून केवळ मोठ्या श्रमानेंच नाहीं, पण पराकाष्ठेच्या काव्यादाव्यानेंही ज्या मतांचें संरक्षण केलें आहे, त्या मतांविषयीं लोकांची श्रद्धा उत्पन्न करून त्यांच्या ठिकाणीं अगदीं उलट मतें कोणत्याही प्रकारचा

---

१ येथें बादशाही सभा बादशाही प्रश्नांचा विचार करण्यासाठीं वेळोवेळीं जमत असत.
२ या महापुरुषाचें चरित्र पुढें येणारच आहे.

बलात्कार केल्यावांचून लोकांच्या मनांत बिंबविणें ही गोष्ट केवळ ईश्वरंकरणीनें घडून येते असें पराकाष्ठेचे अश्रद्धालु इतिहासकारांस देखील म्हणावें लागेल. कारण जी गोष्ट पराकाष्ठेचें साहस करूनही मनुष्याच्या मानवी शहाणपणानें परमावधींत घडून येण्यास केवळ अशक्य, ती अत्यल्प काळांत अनायासानें घडून आल्यामुळें ईश्वरी प्रेरणेचाच प्रादुर्भाव असें त्यांस मानावें लागतें. असो; ख्रिस्त धर्म प्रथम प्रवृत्तींत आला तेव्हां त्यास ईश्वराची अनुकूलता आहे, असें लोकांच्या मनांत ठसविण्याकरितां कांहीं निसर्गातीत चमत्कार दाखवावे लागले व भाकितें सांगावीं लागलीं. परंतु या ल्यूथरप्रमुख नूतन मतवादी लोकांनीं ह्या अद्भुत देणग्यांपैकीं ईश्वराचा प्रसाद होऊन आपल्यास अमुक एक देणगी प्राप्त झाली आहे असा पोकळ डौल देखील घातला नाहीं. तरी पण काळाची अशी कांहीं चमत्कारिक अनुकूलता झाली कीं, लोकांनीं नव्या मताचा मोठ्या उत्साहानें स्वीकार केला; आणि अशीं कांहीं विलक्षण कारणें घडून आलीं कीं, नूतन मतानुयायी लोकांचा विजयच होत चालला. चमत्कार पहा कीं या नवीन मताच्या प्रतिस्पर्ध्यांच्या हातांत मोठी सत्ता होती. राजांचें त्यांस पाठबळ होतें; त्यांचीं कारस्थानेंही तशींच जबर होतीं; व त्यांनीं आपल्या शत्रूंचा पाडाव करण्याचा प्रयत्नही तसाच केला. परंतु नूतन मतानुयायी लोकांस कोणतीही अनुकूलता नसतां यांच्या मतांचा प्रसारच होत चालला. ज्याच्या सत्तेनें ख्रिस्त धर्म जगामध्यें प्रवृत्तींत आला, त्यानेंच नूतन मतांचें संरक्षण करून आरंभीं तो मंदप्रभ असतां आश्चर्यजनक रीतीनें त्यास पूर्ण प्रभावास आणिलें, असें मानण्यास वरील चमत्कार अल्पस्वल्प प्रमाण नाहीं.

हें नूतन मत प्रचारांत आल्यानें जे अपरिहार्य परिणाम घडून आले, त्यांचीं कारणें दिसण्यांत अगदीं यादृच्छिक भासतात आणि त्यांचा उगम अगदीं स्वल्प वाटतो. असो. तीं कारणें अशीं—

(१) **दहावा लिओ** (१५१३–१५२२) पोपाच्या गादीवर बसला. पोपाचा खजिना अगदीं खलास झाला आहे असें त्यास समजलें, तेव्हां पोपाच्या गादीवरील पहिले अधिकारी सहावा आलेक्झांडर आणि दुसरा ज्यूलियस यांनीं अवाढव्य खर्च अंगावर घेतल्यामुळें पैशाची तूट आली होती. अशा प्रकारच्या स्थितींत त्यानें पराकाष्ठेच्या काटकसरीनें खर्च करून वेळ संभाळली पाहिजे होती. परंतु तो स्वतः उदार आणि साहसकर्मी असल्यामुळें ती काटकसर त्याच्या हातून घडून येणें शक्य नव्हतें. त्यास आपलें घराणें वैभवास आणावयाचें होतें. थाटमाटानें वागण्याची त्यास फार आवड होती; गुणी लोकांच्या गुणाची तो चहा करी आणि ऐषआराम करण्याची त्यास फार जबरदस्त चटक लागली होती, यामुळें त्यास नित्य नवा खर्च करावा लागत असे. यासाठीं त्यानें द्रव्य जमा करण्याकरितां नानाप्रकारचे उपाय करून आपल्या अनुयायांकडून पुष्कळ पैसे मिळविले. द्रव्य मिळण्याकरितां त्यानें ज्या

युक्त्या योजिल्या, त्यांत द्रव्य घेऊन पापाच्या क्षालनाप्रीत्यर्थ मनुष्यास परवाना (इन्डलजन्स) करून देणें ही एक युक्ति योजिली होती. रोमन क्यॉथॉलिक मतानुयायी यांची अशी कांहीं समजूत असे कीं, साधुसंतांनीं जीं सत्कर्मे करून पुण्यसंचय केला त्याचा बराचसा भाग आणि येशू ख्रिस्त याची अमर्याद क्षयशून्य पुण्यें, अशीं एका खजिन्यांत संचय केलीं आहेत व त्याच्या किल्ल्या ' सेन्ट पिटर ' आणि त्याचे स्थानावर असलेले पोप यांच्या स्वाधीन केल्या आहेत. त्यांनीं जेव्हां वाटेल तेव्हां तो खजिना उघडून त्यांतील पुण्यांश पाहिजे त्या मनुष्यास देऊन त्यास पापापासून मुक्त करावें. ही युक्ति अकराव्या शतकांत दुसरा अर्बन यानें उपयोजिली. ह्यानें " पवित्र भूमीची " मुसलमान लोकांपासून सुटका करण्याकरितां जे लोक तयार झाले त्यांच्या श्रमाचा मोबदला म्हणून त्यांस ह्या युक्तीनें पापमुक्त केलें. त्यानंतर पोप जें कांहीं पवित्र कर्म करण्याचा हुकूम करतील, त्यास जो द्रव्याचें साहाय्य करील, त्यास त्या खजिन्यांतील सुकृताचा अंश देण्याचा परिपाठ पडला. रोम शहरांत सेन्ट पिटरचें मंदिर बांधण्याकरितां ज्या लोकांनीं द्रव्य दिलें, त्यांस दुसरा ज्यूलियस यानें पापाची क्षमा केल्याविषयींचे परवाने करून दिले त्याच अधिकाराचा संप्रदाय पुढें चालवून लिओ हा लोकांपासून द्रव्य घेई व त्यांस पापमोचनाचीं क्षमापत्रें देई.

हीं क्षमापत्रें जर्मनीमध्यें लोकांस देण्याचा अधिकार पोप यानें **आलबर्ट** नांवाच्या एका धर्मोपदेशकास दिला होता; आणि त्यापासून जें उत्पन्न होईल त्याचा आपल्यास अमुक हिस्सा मिळावा असा ठराव केला होता. त्यास आणखी असा अधिकार दिला होता कीं, त्यानें दुसऱ्या देशांत वांटण्याकरितां त्या क्षमापत्रांची ठोकळ विक्री करावी. याप्रमाणें **आलबर्टनें** सॅक्सनी-मध्यें लोकांस क्षमापत्रें देण्याचा हक्क देण्याकरितां **टेटझल** नांवाच्या एका धर्मो-पदेशकास क्षमापत्रें विकत दिलीं. हा मनुष्य पराकाष्ठेचा दुर्वृत्त होता. परंतु मोठा उपद्व्यापी आणि आपल्या भाषणानें लोकांचीं मनें आकर्षण करण्यांत फार कुशल होता. त्याच्या वर्गातील दुसऱ्या धर्मोपदेशकांनीं त्यास साहाय्य केल्यामुळें हें काम त्यानें मोठ्या उत्साहानें शेवटास नेऊन त्यापासून मोठी अर्थसिद्धि करून घेतली. परंतु त्या कामांत त्यानें कांहीं एक सदसद्विचार अथवा शिष्टपणा केला नाहीं. तीं क्षमापत्रें त्यानें जरी अगदीं थोड्या किंमतीस विकलीं तरी भाविक आणि मूर्ख लोकांमध्यें त्यास तो एक मोठ्या नफ्याचा व्यापार झाला पण सरतेशेवटीं सर्व लोकांस त्याविषयीं तिरस्कार उत्पन्न झाला. कारण त्या क्षमापत्रांपासून होणारे परिणाम इतके फुगवून सांगितले होते आणि तें विकत देण्यामध्यें इतका अनियमितपणा केला होता कीं, त्या क्षमापत्रांविषयीं लोकांची श्रद्धा कमी झाली. राजे आणि बडे

---

१ ख्रिस्ती धर्माचें मुख्य पीठ. २ पोपसंप्रदायानुसार चालणारे लोक. ३ पालेस्ताईन देश आणि येशू ख्रिस्ताची जन्मभूमि.

लोकांस आपल्या प्रजा निर्धन झालेल्या पाहून मोठा राग आला. ख्रिस्तधर्मशास्त्राचा अभ्यास करून त्यांतील विधानांप्रमाणें ईश्वराची भक्ति करावयाची, हा मार्ग सुटून कांहीं द्रव्य देऊन क्षमापत्रें विकत घेतलीं म्हणजे आपण निष्पाप होऊं व सद्गतीस पात्र होऊं असा लोकांचा मूढ विश्वास पाहून सदाचारसंपन्न लोकांस फार वाईट वाटलें. **टेटझल** आणि त्याचे सोबती यांचें नीच वर्तन पाहून अडाणी लोकांच्या देखील अंगावर रोमांच उभे राहूं लागले. अडाणी लोकांनीं, आपल्यास अक्षय्य सुखाची प्राप्ती होईल या आशेनें भक्तिभावानें जें द्रव्य इकडे अर्पण केलें, त्याचा विनियोग द्यूत, मद्य आणि व्यभिचार यांत होऊं लागला ! तेव्हां सर्वांच्या मनांत असें आलें कीं, ह्या व्यापारास कांहींतरी प्रतिबंध केला पाहिजे. कारण कीं, हा प्रचार धर्मास जसा घातक आहे तसाच समाजाच्या हितालाही बाधक आहे.

टेटझल यानें क्षमापत्रें वांटलीं त्याचें तात्पर्य खालीं लिहिल्याप्रमाणें होतें:–

क्षमापत्रें.

" आमचा स्वामी येशू ख्रिस्त याची तुजवर दया असो, त्याचीं सत्कर्में तुला निष्पाप करोत; आणि त्यानें, व त्याचे परमप्रिय शिष्य पीटर आणि पाल व पवित्रात्मा पोप यांनीं, मला अधिकार दिला आहे, त्या-अन्वयें तुला मी निष्पाप करतों. धर्मसंबंधीं कसल्याही शापापासून मी तुला मुक्त करतों. मग कोणत्याही प्रकारचीं पापें करून त्या शापास तूं पात्र झाला असोस. आणि सर्व प्रकारच्या दुसऱ्या पापांपासून तुला मुक्त करतों, मग तीं कितीका भयंकर असेनात ? आणि तुझ्या पापाबद्दल तुला ज्या निरययातना व्हावयाच्या त्यांपासून मी तुला मुक्त करतों. तुला जेव्हां बाप्तिस्मा देण्याचा संस्कार केला, तेव्हां तूं जसा पवित्र आणि पापशून्य होतास, त्या स्थितींत तुला मी आतां ठेवितों. जेव्हां तूं मरण पावशील तेव्हां नरकाचे दरवाजे बंद होतील; आणि आनंदभुवनाचीं कपाटें उघडलीं जातील, ही माझी देणगी तूं मरण्यास टेंकशील तोंपर्यंत तशीच पूर्णपणें कायम राहील. "

ल्यूथरची टीका.

(२) मार्टिन ल्यूथर यानें प्रथमतः या क्षमापत्रांच्या गुण–शक्तीविषयीं संशय घेतला. आणि क्षमापत्रांचा प्रसार करण्याकरितां जे लोक नेमले होते, त्यांच्या दुष्टाचरणावर व त्यांच्या असन्मार्गप्रतिपादक मतांवर तो टीकात्मक भाषण करूं लागला. तेव्हां त्याचीं भाषणें चित्त देऊन ऐकण्यास लोकांचीं मनें अगदीं तयार होऊन राहिलीं होतीं.

ल्यूथर हा सॅक्सनी देशांत १४८३ मध्यें जन्मला. त्याचे आईबाप जरी अगदीं गरीब होते, तरी त्यास लहानपणीं उत्तम शिक्षण मिळालें होतें; आणि तो विद्याभ्यास करीत असतांच हा मुलगा फार बुद्धिमान् होईल असें दिसून आलें होतें. त्याच्या मनाचा स्वाभाविक कल ईश्वरभक्तीकडे होता. एके दिवशीं त्याचा सोबती

त्याच्याजवळ उभा असतां, विजेच्या तडाक्यानें भाजून मरण पावला. त्यापासून ल्यूथरच्या मनावर असा ठसा उमटला कीं, हें जीवित असार आहे. आईबापांची विनवणी व्यर्थ जाऊन तो एका मठांत साधु होऊन राहिला. त्या कालीं परमार्थज्ञान प्राप्त होण्याकरितां ज्या पुस्तकांचा अभ्यास करण्याची प्रवृत्ति होती, त्यांचा त्यानें अभ्यास केला. परंतु त्यापासून त्याचे मनास समाधान झालें नाहीं. अतिशय सूक्ष्मविचारयुक्त अध्यात्मशास्त्रांचा त्यास कंटाळा आला. त्या मठांतील पुस्तकालयांत बायबलची एक प्रत एका बाजूस पडली होती. ती त्यास सांपडल्यावर त्यानें दुसरे सर्व अभ्यास वर्ज्य करून आपला सर्व काळ त्या पुस्तकाचा अभ्यास करण्यांत घालविला. त्या पुस्तकापासून परमार्थज्ञानसंबंधीं विचार ज्या साधु मंडळींस अवगत झाले नव्हते, त्यांस ल्यूथर याची त्या पुस्तकाविषयीं तल्लीन वृत्ति पाहून मोठा अचंबा वाटला. त्या पुस्तकाचा त्यांनें अभ्यास केल्यापासून त्यास जें ज्ञान प्राप्त झालें, त्यायोगानें आणि त्याच्या पवित्र आचरणानें त्याची कीर्ति इतकी पसरली कीं, सॅक्सनीचा इलेक्टर फ्रेडरिक यानें एक नवें विद्यालय स्थापित केलें, त्यांत त्यानें ल्यूथर यास प्रथम तत्त्वज्ञान आणि नंतर धर्मज्ञान शिकविण्याकरितां नेमिलें. ल्यूथर यानें त्या दोन्ही अधिकारांचें काम असें उत्तम बजाविलें कीं, तो त्या विद्यालयांतील गुरुसमाजाचें एक मुख्य भूषण होऊन बसला.

इकडे **ल्यूथर** याचा कीर्तिरूप चंद्र षोडश कलांनीं परिपूर्ण होत्साता, लोकांच्या मनोरूप आकाशांत उदित झाला असतां, सॅक्सनीमध्यें **टेटझल** याचा क्षमापत्रें विकण्याचा धंदा चालूच होता. जर्मनींतील इतर प्रांताच्या लोकांपेक्षां सॅक्सनींतील लोक कांहीं कमी धर्मभोळे नव्हते. यामुळें टेटझल यास त्या प्रांतांत पुष्कळ पैसा मिळाला. पापाबद्दल क्षमापत्रें विकणारांचे छक्केपंजे, विकत घेणाऱ्यांचा भाविकपणा, व आपल्या पवित्र धर्माचें विटंबन पाहून ल्यूथर यास अतिशय चिंता उत्पन्न झाली. क्षमापत्राच्या खरेपणाविषयीं ज्यांचा आग्रह होता, त्यांचें तेज ल्यूथर याजपुढें पूर्वीच अगदीं कमी झालें होतें. आणि देवनिष्ठा व नीति यांचा विध्वंस करणाऱ्या त्या क्षमापत्राच्या सत्यपणाला ख्रिस्तधर्मपुस्तकामध्यें बिलकुल आधार नव्हता. धर्मपुस्तकाचें अवलोकन करून त्यानें जें खरें तत्त्व शोधून काढिलें होतें, त्याचें गोपन त्यास फार वेळपर्यंत करून ठेववेना; व आपल्या देशांतील लोकांची फसवणूक ह्याच्यानें मुकाट्यानें पाहवेना. एका मोठ्या प्रार्थनामंदिरांत त्यानें व्यासपीठावर उभें राहून ज्यानें पापाबद्दल क्षमापत्रें प्रसिद्ध केलीं त्याच्या दुष्टाचरणाविषयीं फार निकरानें निर्भर्त्सना केली. ईश्वरानें स्वतः पापापासून मुक्त होण्याचे उपाय सांगितले आहेत. त्यावांचून दुसऱ्या कोणत्याही भलत्या उपायावर श्रद्धा ठेवून त्याप्रमाणें अनुसरण करणें हें पराकाष्ठेचें घातक आहे, असें त्यानें लोकांच्या मनांत बिंबवून दिलें. त्याचा धीटपणा आणि नव्या मताची अपूर्वता पाहून त्याज-

पहिलें व्याख्यान.

कडे सर्व लोकांचें मन वेधलें. त्याचें स्वतःचें शुद्धाचरण, त्याची लोकप्रियता आणि मनोवेधक वक्तृत्वशाक्ति यांनीं श्रोत्यांचीं मनें अगदीं हरण करून घेतलीं. लोकांनीं आपलीं मतें मोठ्या संतोषानें स्वीकारिलीं, असें पाहून ल्यूथर यास धैर्य आलें. त्यानें मॅंट्झचा धर्माध्यक्ष आलबर्ट यास एक पत्र लिहिलें. त्यांत त्या खोट्या मताविषयीं आणि क्षमापत्रें वांटणाऱ्यांच्या दुष्टाचरणाविषयीं त्याची चांगली कानउघडणी केली होती. परंतु त्यानें असें पाहिलें कीं आलबर्ट याचें त्यांत परमहित आहे. तेव्हां क्षमापत्रें वांटणाऱ्यांच्या दुष्टाचरणास त्याजकडून कांहीं प्रतिबंध होणार नाहीं. सबब याविषयीं विद्वान् लोकांचीं मतें काय आहेत, हें जाणण्याकरितां त्यानें क्षमापत्राच्या संबंधानें आपल्या विचाराचे पंच्याण्णव लेख प्रसिद्ध केले. त्यांत त्यानें आपलें मत खरें आहे असेंही प्रतिपादन केलें नाहीं; व संशयित आहे असेंही म्हटलें नाहीं. परंतु हे विषय भवति न भवति व विचक्षणा करण्यास योग्य आहेत, ह्यासाठीं विद्वान् मंडळींनीं अमुक दिवशीं निर्णय करण्यासाठीं लेखानें अथवा स्वतः हजर होऊन प्रतिपादन करावें अशी विनंति केली होती. त्या सर्व ग्रंथांत प्रेषितोक्त म्हणजे पोप आपणांस सर्वपरी वंद्य आहे असें दाखविलें होतें. नेमलेल्या दिवशीं विरुद्ध पक्ष स्थापित करण्यास कोणी आलें नाहीं. आणि जर्मनीमध्यें ल्यूथर याचे ग्रंथ चहूंकडे मोठ्या त्वरेनें पसरले, आणि ते लोकांनीं मोठ्या उत्सुकतेनें वाचले.

विद्वानांस आव्हान.

रोमन क्याथॉलिक पंथांत विरक्त वृत्तीनें राहणारे चार संप्रदाय आहेत. त्यांपैकीं ल्यूथर हा **ऑगस्टाइन्**[1] पंथाचा होता. त्या पंथांतील साधू जरी इतर पंथांच्या साधूंप्रमाणें पोपाची उपासना करीत होते, तरी त्यांनीं ल्यूथर याच्या अपूर्व मताचा प्रसार होण्यास कांहीं प्रतिबंध केला नाहीं. ल्यूथर याचें पवित्राचरण आणि विद्वत्ता यायोगानें तो त्याचे मतानुयायांस फार प्रिय झाला होता. तथापि ल्यूथर यास पोपाचा अधिकार निर्मळ मनानें मान्य होता. पण रोमन क्याथॉलिक धर्मांतील सर्व मतानुयायी ल्यूथरचा द्वेष करीत होते. तरी **डॉमिनिकन** पंथाभिमानी साधूंची निर्भत्सना पाहून ऑगस्टाइन् मतानुयायी लोकांस फार आनंद वाटत होता, आणि लोकांनीं डॉमिनिकन पंथाचा तिरस्कार आणि द्वेष करावा अशी त्यांची इच्छा होती. क्षमापत्राचा प्रसार होण्यास ल्यूथर यानें अडथळा केल्याबद्दल सॅक्सनीच्या राजास देखील वाईट वाटलें नाहीं; इतकेंच नव्हे तर त्यानें आंतून ल्यूथर यास उत्तेजन दिलें. कारण राजास अशीही आशा उत्पन्न झाली कीं, धर्मोपदेशक लोकांच्या आपापसांतील भांडणापासून पोपाच्या द्रव्यापहारक व्यापारास कांहीं तरी प्रतिबंध होईल.

---

१ ऑगस्टाइन, डॉमिनिकन, फ्रॉन्सिस्कन व बेनिडिक्टाइन हे चार पंथ होत. हे परस्परांचा द्वेष करीत असत;

(३) पोप आणि त्याचे अनुयायी यांची संपत्ति आणि सत्ता यांचा ज्या मतांवर आधार होता, त्यांवरील आक्षेपांचें निरसन करण्यास पुष्कळ एकनिष्ठ वीर ल्यूथर याजबरोबर वाग्युद्ध करण्यास सिद्ध झाले. ल्यूथर याच्या मतांविरुद्ध पुष्कळांनीं कडक लेख लिहिले. परंतु त्यानें जो मार्ग स्वीकारला होता त्यापासून त्यांच्या लेखांस कांहीं दार्ढ्य आलें नाहीं. ल्यूथर यानें क्षमापत्रांविरुद्ध जे लेख लिहिले होते त्यांस ख्रिस्तधर्माच्या मुख्य शास्त्राचे आधार आणि समर्पकपणा होता; आणि त्याच्याविरुद्ध पक्षकारांनीं पोप याचे ठराव, कायद्याचे सिद्धांत, आणि विद्वान् लोकांचीं स्वकल्पित मतें यांचा आधार दाखविला होता. असो; या पक्षपाती आणि स्वार्थनिष्ठ न्यायाधीशांच्या निवाड्यानें लोकांचें कांहीं समाधान होईना. शेवटीं, ईश्वरी कायद्याचे नियम आणि समर्पकपणा यांस सर्वथैव प्रतिकूल असणाऱ्या मताभिमानी लोकांकडे धर्माध्यक्षपणाचा अधिकार तरी कां असावा, अशी लोक तक्रार घेऊं लागले.

प्रत्युत्तरें व त्यांचा शिथिलपणा.

(४) ल्यूथरच्या नव्या मताचा जर्मनीमध्यें प्रसार होत असतांही त्याविषयीं पोप याच्या दरबारांत अगदीं सामसूम होती. **लिओ** हा ऐषआरामप्रिय आणि धर्मसंबंधीं वादविवादामध्यें अगदीं ज्ञानशून्य असल्यामुळें त्यानें ल्यूथर याच्या मताच्या प्रसाराकडे अगदींच लक्ष दिलें नाहीं. ल्यूथर याचें मत प्रचारांत येऊन आपला अधिकार कमी होईल असें पोपास वाटलेंच नाहीं, आणि ल्यूथर याच्याही स्वप्नांत देखील आलें नाहीं कीं, आपलें मत पोपाच्या सत्तेस घातक होईल !

लिओचा थंडपणा.

परंतु सरतेशेवटीं ल्यूथर याच्या प्रतिस्पर्ध्यांनीं लिओचें मन वळविलें. शिवाय त्यास आपल्या आचरणाविरुद्ध ल्यूथरचे कडक लेख सहन झाले नव्हते. तसेंच, ल्यूथर याच्या मताचा प्रसारही फार होत चालला होता. तेव्हां पोपाचा अधिकार रक्षण करण्यासाठीं लिओ यास उपाय योजणें जरूर झालें. ल्यूथर याच्या मताविरुद्ध ज्यांनीं लेख लिहिले होते, त्यांची एक कमेटी (परिषद्) नेमून ल्यूथर याच्या मताचा विचार करण्यासाठीं पोपानें त्या कमेटीस अधिकार दिला. आणि ल्यूथर यास असा हुकूम दिला कीं, त्यानें साठ दिवसांचे आंत त्या कमेटीपुढें हजर व्हावें. आणखी पोप यानें सॅक्सनीच्या राजास असें पत्र लिहिलें कीं, 'तुम्ही ल्यूथर यास आश्रय देऊं नये. कारण त्याचें पाखांड मत सदाचारसंपन्न लोकांस त्रासदायक झालें आहे; यामुळें तो तुमच्या आश्रयास पात्र नाहीं.' त्या पत्राची रचना पाहून आणि आपल्या मताचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या न्यायाधीशांचीं नांवें ऐकून रोमच्या दरबारांत काय निकाल होईल हें ल्यूथर यास अगोदरच समजलें. यास्तव आपल्या मताचा विचार जर्मनीमध्यें निःपक्षपाती न्यायसभेपुढें व्हावा हें त्यास इष्ट वाटलें.

सभा.

विटेम्बर्गच्या विद्यालयांतील सर्व प्रोफेसर ल्यूथर यास इजा होऊं नये याविषयीं फार उत्सुक होते. त्यांनीं पोप यास पत्र लिहिलें. त्यांत जर्मनींतील अधिकारविशिष्ट विद्वान् मंडळींस ल्यूथर याच्या मताचा विचार करण्यास सांगावें अशी विनंति केली. सॅक्सनीच्या राजानें **ऑगसबर्ग** येथील पोपाच्या वकिलासही तशीच विनंति केली. त्या समयीं पोपाचा अधिकार नाकारण्याच ल्यूथर याच्या मनांत तिळमात्र देखील आलें नव्हतें व त्या अधिकाराच्या योग्यतेविषयीं त्याच्या मनांत लेशमात्र विकल्प नव्हता. त्यानें पोपास विनययुक्त पत्र लिहिलें होतें. पोप यानें त्याची विनंति मान्य करून जर्मनींतील आपला वकील कार्डिनल यास ल्यूथर याचें काय म्हणणें आहे तें ऐकून त्याविषयीं निर्णय करण्याचा अधिकार दिला.

कार्डिनलाशीं सामना.

(५) कार्डिनल हा ल्यूथर याचा उघड वैरी होता. तथापि त्याजपुढें हजर होण्यास ल्यूथर यानें कांकूं केली नाहीं. आपल्या सुरक्षितपणाबद्दल बादशहाचा परवाना मिळवून तो लागलींच ऑगसूबर्ग येथें गेला. कार्डिनल यानें ल्यूथर याचें चांगलें आदरातिथ्य केलें. कारण त्यास असें वाटलें होतें कीं, तेणेंकरून ल्यूथर आपणास वश होईल. कार्डिनल यास आपल्या परमार्थज्ञानाचा मोठा अभिमान होता. परंतु ल्यूथर याजबरोबर जेव्हां तो वादविवाद करण्यास प्रवृत्त झाला तेव्हां त्याचा कोटिक्रम अगदीं लटका पडला. कारण ल्यूथर हा केवळ ईश्वरप्रणीत खिस्तधर्मानुयायांस संमत असलेल्या पुस्तकांच्या आधारावर आपल्या मताचें प्रतिपादन करी. आणि कार्डिनल आपलें मत पोपाचे ठराव आणि पंडितंमन्य लोकांचे मनसोक्त अभिप्रायांवर स्थापित करण्याचा प्रयत्न करी. यामुळें त्या वादविवादापासून कांहीं चांगला अर्थ निष्पन्न होईल असें लक्षण दिसेना. तेव्हां कार्डिनल यानें वादविवाद करण्याचें सोडून देऊन ल्यूथर यास एकदम हुकूम केला कीं, तुम्ही क्षमापत्राच्या विरुद्ध लेख लिहून जी चूक केली आहे, ती पदरांत घेऊन इतःपर हें तुमचें नवें आणि घातक मत प्रसिद्ध करूं नये. पण ल्यूथरला ही आज्ञा ग्राह्य वाटली नाहीं. कारण ल्यूथर यास आपले मताच्या खरेपणाविषयीं पूर्ण विश्वास होता; आणि विद्वान् व धर्मनिष्ठ लोकांचें त्या मतास अनुमोदन मिळाल्यामुळें त्याचा विश्वास दृढ झाला होता. आपलें मत चुकीचें आहे असें सिद्ध करून देण्याचा प्रयत्न केल्यावांचून एकदम चूक पदरांत घेण्याविषयीं कार्डिनल यानें हुकूम केला, त्याबद्दल ल्यूथर यास फार नवल वाटलें. ल्यूथर यास अशी आशा होती कीं, कार्डिनलसारख्या विद्वान् धर्माध्यक्षापुढें आपल्या मताची भवतिनभवति झाल्यानें आपल्या शत्रूंनीं अज्ञानपणानें अथवा दुष्ट भावानें आपल्यावर जे दोषारोप आणिले आहेत, त्यांपैकीं पुष्कळ दूर होतील. परंतु कार्डिनल यानें अधिकाराच्या जोरावर दिलेला कडक निर्णय ऐकून ल्यूथर याच्या सर्व आशा एकदम लयाला गेल्या; तथापि त्याचें धैर्य खचलें नाहीं. त्यानें दृढ निश्चयानें असें सांगितलें कीं, ज्या मताविषयीं माझी

पूर्ण खात्री झाली आहे, त्याचा मी कधींही त्याग करणार नाहीं; आणि ईश्वराला' अप्रिय अशा बाष्कळ मताचा स्वीकार करण्याविषयीं माझें मन वळविण्यास या जगांतील कोणतेही विषय समर्थ नाहींत, मग ते किती कां मोहक असेनात ! त्यानें कार्डिनलास सांगितलें कीं, आपल्या मताचा अमुक अमुक विद्यालयांतील पंडितांपुढें विचार व्हावा. क्षमापत्राच्या संबंधानें माझे प्रतिपक्षी मौन स्वीकारतील तर मी त्याबद्दल कांहीं लिहिणार नाहीं, व भाषण करणार नाहीं, असेंही त्यानें वचन दिलें. परंतु कार्डिनल यानें आपला आग्रह सोडला नाहीं; उलट, 'जर चूक पदरांत घेतली नाहीं, तर धर्माध्यक्ष या नात्यानें मी तुला शासन करीन ', असें ल्यूथर यास त्यानें भय घातलें; आणि ' माझी आज्ञा मान्य केल्यावांचून तूं माझ्यासमोर येऊं नकोस, ' असा त्यास हुकूम फर्माविला. कार्डिनल याचें वर्तन पाहून बादशहाच्या अभयपत्रानें ल्यूथर याचें संरक्षण होईल अशी त्याच्या मित्रांची खातरजमा होईना. तेव्हां त्यांनीं त्यास सल्ला दिल्याप्रमाणें तो ऑगसूबर्ग सोडून आपल्या देशास चालता झाला.

कार्डिनल यास ल्यूथर एकाएकीं आपल्या देशास गेला, त्याबद्दल मोठा राग येऊन त्यानें सॅक्सनीचा राजा फ्रेडरिक यास असें पत्र लिहिलें कीं, ' तुह्मी ल्यूथर यास कैद करून पोप यांजकडे पाठवावें, अथवा त्यास तुमच्या देशांतून हांकून द्यावें.' फ्रेडरिक यानें ल्यूथर यास आजपर्यंत आश्रय दिला तो कांहीं परमार्थप्रकरणीं पोक्त विचार करून दिला नव्हता, त्याचा मुख्यत्वें करून राजकीय हेतु होता; आणि आपलें अंग बाहेर दिसूं नये म्हणून त्यानें मोठी काळजीही घेतली होती. फ्रेड्रिक यानें ल्यूथर याचें भाषण ऐकिलें नव्हतें, व त्याच्या ग्रंथांपैकीं एकही ग्रंथ वाचला नव्हता आणि सगळा जर्मन देश ल्यूथरच्या कीर्तिरूप चंद्रानें प्रकाशित झाला होता, तरी फ्रेड्रिक यानें त्यास एकवेळां देखील आपल्या भेटीस बोलाविलें नव्हतें. कार्डिनल यानें ल्यूथर-विषयीं फ्रेडरिक यास सक्त मागणें केलें तेव्हां त्यास पूर्वीचा आडपडदा कांहींसा एकीकडे सारावा लागला. नवें विद्यालय स्थापन करण्यांत त्यानें पुष्कळ खर्च केला होता; आणि जर्मनींतील प्रत्येक राजास तें विद्यालय फार महत्वाचें वाटत होतें. त्यांतून ल्यूथर यास दूर केलें असतां त्या विद्यालयाच्या योग्यतेस मोठा धक्का बसेल, असें जाणून त्यानें अनेक निमित्तें दाखवून कार्डिनल याचे म्हणण्यांपैकीं एकही गोष्ट कबूल केली नाहीं, आणि ल्यूथर याचा उघड पक्ष धरिला.

(६) कार्डिनल हा ल्यूथर यानें आपली चूक पदरांत घ्यावी, असा आग्रह धरून बसल्यामुळें, ल्यूथर याचे अनुयायी फार रागावले. ल्यूथर याच्या मताचा ज्या सभेनें विचार करावा म्हणून पोप यानें ठरविलें होतें, त्या सभेचे सभासद ल्यूथर यास प्रतिकूल ठराव करण्यास अगदीं तयार होते. साठ दिवसांची मुदत संपण्यापूर्वींच त्यांनीं त्यास 'पाषंड' ठरविलें. आणि लिओ यानें त्याजवर अपशब्दांचा आणि शापांचा भडिमार केला. पण एवढ्यानें कारभार आटपण्यासारखा नव्हता. ल्यूथर यानें

जें मत प्रसिद्ध केलें होतें, तें चुकीचें आहे असें त्याजकडून कबूल करविल्यावांचून पोपास आपली अब्रू बचाविण्याचा दुसरा इलाजच नव्हता. जें कांहीं एकदां मुख्य धर्माध्यक्षानें स्थापित केलें, त्यांतील स्वल्पांश देखील चुकीचा आहे असें कबूल करून त्यास सोडून दिला असतां पोपवर भ्रांतत्वाचा दोष येतो, व तसें होणें इष्ट नव्हतें.

धैर्य.

ह्या समयीं ल्यूथर इतक्या संकटांत होता कीं, त्याच्या जागीं जर दुसरा कोणी असता, तर तो अगदींच घाबरून गेला असता. पोप याजबरोबर उघड वैर करून फ्रेडूरिक आपलें संरक्षण करील अशी त्यास आशा नव्हती. कारण कीं पोप यांनीं आपल्या अधिकाराच्या बळानें जर्मनींतील अतिशय बलाढ्य राजाधिराजे देखील चिरडून टाकिले होते. त्या काळांत पोपाच्या ठरावाला लोक किती मान देतात हें त्यास माहीत होतें. जर आपल्यास सॅक्सनींतून हांकून लाविलें, तर आपले क्रुद्ध झालेले शत्रु आपल्यास जें शासन करतील, तें भोगल्यावांचून दुसरा इलाजच नाहीं, अशी त्याची खात्री झाली होती, तथापि त्याच्या मुखश्रीवर किंचित् देखील ग्लानि आली नाहीं. अथवा आपल्या कर्तव्यकर्मांत तो शिथिल झाला नाहीं. आपल्या शत्रूच्या दुष्टाचरणावर तो पहिल्यापेक्षां जास्त कठोर शब्दांनीं टीका करूं लागला. या समयीं " संकटसमयीं सोडुनि धैर्यासि ह्मणेल काय कवि हाय " या आर्यापतीच्या काव्योक्तीची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं.

(७) रोमच्या दरबारानें आपल्यास एकदम पाखंड ठरविलें, तेव्हां आतां त्यापेक्षां जास्त जुलमी उपायांची योजना पोपकडून करण्यांत येईल, असें ल्यूथर यास वाटल्यावरून त्यानें धर्माध्यक्ष लोकांची एक सभा होती तीस अपील केलें; आणि तेथें दाद मागितली. कारण ल्यूथरच्या मतें या सभेचा अधिकार पोपपेक्षां मोठा होता. पोपच्या पूर्वजांमध्यें सेन्ट पीटर हा विशेष ज्ञानी असतांही तो जसा चुकला, तसा लिओ याजकडूनही चुकी होण्याचा संभव आहे. सबब त्यानें हें अपील केलें.

(८) रोमच्या दरबारांतून पुढें काय होईल याविषयीं ल्यूथर यानें केलेली कल्पना लागलींच खरी झाली. पोपानें एक आज्ञापत्र प्रसिद्ध केलें, त्यांत क्षमापत्राच्या गुणशक्तीविषयीं पराकाष्ठेचें वर्णन केलें होतें. अज्ञानकालांत भाविकपणानें लोकांनीं ज्या गोष्टी खऱ्या मानल्या त्या ज्ञानकालांत सर्वांशीं खऱ्या मानल्या जाणार नाहींत, याविषयीं पोपानें कांहींएक विचार न करितां, मी जें कांहीं सांगतों तें ख्रिस्तधर्माच्या मतास अनुसरून आहे असें सर्व ख्रिस्ती धर्मानुयायी लोकांनीं मान्य करावें, व उलटमतानुयायी लोकांस उग्र शाप द्यावा, असा हुकूम केला.

राज्यक्रांति व तीमुळें ल्यूथर यास क्षणिक विश्रांति.

(९) क्षमापत्राच्या विक्रीपासून पोप आणि त्याचे अनुयायी यांस पुष्कळ प्राप्ति होत होती. तीस व्यत्यय येऊं नये म्हणून पोपानें केलेल्या या प्रयत्नांनीं ल्यूथरच्या अनुयायी मंडळींच्या मनांत ल्यूथर-विषयींचा पूज्यभाव बिलकुल कमी झाला नाहीं. दैवयोगानें जर्मनीचा बादशहा मॉक्सिमिलियन याच वेळीं १५१५ मध्यें मरण पावला. तो मरण पावला नसता, तर पोपाच्या ठरावापासून ल्यूथरच्या देशांतील इतर लोकांच्या मनामध्यें ल्यूथरविषयीं विपरीत ग्रह होऊन त्याच्या कार्याचा अगदीं विध्वंस झाला असता. कारण कीं, त्या बादशहाचें पोपास मोठें पाठबळ होतें. मॅक्समिलियन मरण पावल्यावर त्याचा अधिकार फ्रेडरिक याजकडे आला. यामुळें ल्यूथर यास मोठीच विश्रांति मिळाली, इतकेंच नाहीं पण दुसऱ्या बादशहाची निवड होईपर्यंत जो काल गेला, त्यांत ल्यूथर याच्या मताचा प्रसारही फार झाला; आणि त्यास जास्त बळकटी आली. धर्मसंबंधीं वादविवादापेक्षां बादशहाच्या निवडणुकीकडे पोप याचें फार लक्ष लागलें होतें; आणि निवड करणाऱ्या राजांमध्यें फ्रेडरिक हा प्रमुख होता. यामुळें त्यास नाखुष करणें हें लिओ यास इष्ट नव्हतें, म्हणून ल्यूथर यास बहिष्कृत करण्याविषयीं त्याच्या प्रतिस्पर्ध्यांनीं लिओ यास पुष्कळ आग्रह केला तरी त्यानें त्यांचें म्हणणें ऐकिलें नाहीं.

(१०) अठरा महिनेपर्यंत ल्यूथरच्या संबंधानें पोप अगदीं स्तब्ध होता. उपस्थित झालेल्या वादाचा स्नेहभावानें निकाल व्हावा, अशी खटपट मात्र नेहमीं चालू होती. या काळांत रोमच्या दरबारांतील आणखी दुसरीं पुष्कळ दुष्टाचरणें ल्यूथरच्या दृष्टोत्पत्तीस आलीं. तीं त्यानें स्पष्ट रीतीनें पुढें आणून सबळ प्रमाणांनीं खरीं करूनही दिलीं. ही पोपाच्या दरबाराच्या अशुद्धाचरणाविषयीं एकनिष्ठता आणि सत्याविषयींचें औदासीन्य पाहून त्यास मोठा संताप आला; आणि पोपाच्या ईश्वरदत्त अधिकाराविषयीं तो आतां उघडपणें शंका घेऊं लागला.

क्षमापत्र व झ्विंग्लियर्स.

(११) क्षमापत्रकांसंबंधीं पोप याच्या मतांवर फक्त सॅक्सनी देशांतच भडिमार झाला असें नाहीं. स्वित्सर्लंड देशांतही त्याच समयास तींच कारणें घडून येऊन त्या मतांवर मोठा जबर भडिमार झाला. त्या देशांत क्षमापत्रें विकण्याचा अधिकार '**फ्रॅन्सिस्कन**' मताच्या साधु-मंडळीकडे होता. त्यांनीं कांहींएक सदसद्विचार न करतां क्षमापत्र विकून द्रव्यापहार करण्याची कांहींच मर्यादा ठेविली नाहीं. सरतेशेवटीं ते झूरीच येथें जाऊन दाखल झाले. तेथें **झ्विंग्ली** यानें त्यास हरकत केली. हा मनुष्य उत्कंठा आणि धाडस यांजमध्यें ल्यूथरपेक्षां रतिमात्रही उणा नव्हता. तो या कामांत इतका पुढें सरसावला कीं, स्थापित धर्माची सर्व इमारत अगदीं ढासळून जाते कीं काय, असें भासूं लागलें. ल्यूथर यास आपणास असा सोबती मिळाल्यामुळें फारच आनंद झाला,

(१२) कलोन आणि लोव्हन येथील विद्यापीठांनीं ल्यूथर याचें मत चुकीचें आहे असें प्रसिद्ध केलें. त्यामुळें त्याच्या प्रतिपक्षास आपण विजयी झालों असें प्रथम वाटलें. परंतु ल्यूथर याच्या निर्भय स्वभावानें त्यास सोडलें नाहीं. त्यास नव्या हरकतीनें नवें धैर्य येऊं लागलें. आणि प्रत्येक मताविषयीं त्याचे शोध आणि त्याजवर त्याचे दोषारोप प्रसिद्ध झाले; यायोगानें ज्या बळकट पायावर पोप याची सत्ता व संपत्तिरूप इमारत उभारली होती, तो पाया अगदीं डळमळूं लागला. इतक्या प्रसंगावर गोष्ट आली, तेव्हां आपण आजपर्यंत क्षमा केली ही चूक केली असें पोप यास वाटलें; आणि सन १५२१ च्या तारीख १५ जून रोजीं आपल्या दरबाराला परम घातक असें एक आज्ञापत्र त्यानें प्रसिद्ध केलें. ल्यूथरच्या ग्रंथांतून एकेचाळीस वाक्यें निवडून काढून त्यांजवर त्या आज्ञापत्रांत टीका केली होती, व सर्व लोकांस असा हुकूम फर्माविला होता कीं, ' ल्यूथर याचे ग्रंथ जो कोणी वाचील त्यास बहिष्कृत करण्यांत येईल. यासाठीं ते ग्रंथ ज्यापाशीं असतील त्यांनीं एकदम जाळून टाकावे. ' ल्यूथर याच्या-संबंधानें असा हुकूम केला होता कीं, " त्यानें साठ दिवसांचे आंत आपली चूक पदरांत घेऊन आपले ग्रंथ जाळून टाकिले पाहिजेत; नाहीं तर त्यास बहिष्कृत करून त्याचें मांस भक्षण करण्याकरितां त्यास सैतानच्या स्वाधीन केलें जाईल." आणि सर्व खिस्ती राजे यांस असा हुकूम केला होता कीं, " ल्यूथर यास धरून त्याच्य पापाबद्दल त्यास यथार्थ शासन करण्याकरितां हजर करावें, तसें त्यांनीं न केलें तर तेही धर्माध्यक्षाच्या शापास पात्र होतील."

लिओचें आज्ञापत्र १५२१.

ह्या आज्ञापत्राच्या प्रसिद्धीपासून जर्मनी देशांतील निरनिराळ्या प्रदेशांत वेगवेगळाले परिणाम झाले. ल्यूथर याच्या प्रतिपक्षास असें वाटलें कीं, त्याच्या मतांसह त्याचे अनुयायी आतां रसातळास गेलेच म्हणून समजावें. पोप याच्या अधिकारा-विषयीं ल्यूथर याच्या मतानुसारी लोकांची पूज्यबुद्धि दिवसेंदिवस कमी होत चालली होती, त्यांस पोप याचा बहिष्काराचा व अभिशापाचा लेख वाचून मोठा संताप आला. कांहीं शहरांत तो लेख प्रसिद्ध करूं नये, म्हणून लोकांनीं अत्याचारही केले. कांहीं शहरवासी लोकांनीं लेख प्रसिद्ध करणाराची अप्र-तिष्ठा करून पोपच्या आज्ञापत्राचे तुकडे तुकडे करून पायाखालीं तुडविले. ल्यूथर ज्या शासनाची अपेक्षा करीत होता, तें एकदांचें त्याजवर येऊन पडलें; परंतु त्यापासून तो कांहीं अस्वस्थ किंवा भयभीत झाला नाहीं. त्यानें पुनः धर्माध्यक्षांच्या जनरल सभेस अपील करून बहिष्कार-पत्रावर टीका केली. 'पोप हा पापी मनुष्य असून खिस्ती धर्माचा शत्रु आहे. खिस्त-धर्मशास्त्राच्या नव्या ग्रंथांत ज्याच्या प्रादुर्भावाविषयीं भविष्यकथन केलें आहे, तोच हा,' असें ल्यूथर यानें प्रसिद्ध करून लिओची पराकाष्ठेची निर्भर्त्सना केली. त्यानें सर्व

आज्ञापत्राची तिरपीट.

राजांस असा उपदेश केला कीं, "पोप यानें तुमच्या मानेवर अन्यायानें जें जूं घातलें आहे तें फेंकून द्या." नुसत्या शब्दांनींच पोप याची फजिती करून तो उगीच राहिला नाहीं. लिओनें बहिष्कारपत्रांत ल्यूथर याचे ग्रंथ जाळून टाकण्याविषयीं जो हुकूम केला होता, त्याची प्रतिक्रिया करावी म्हणून त्यानें विटेम्बर्ग विद्यालयांतील सर्व विद्यागुरु आणि विद्यार्थी एकत्र केले. आणि पुष्कळ तमासगीर लोकांच्या समक्ष मोठी धामधूम करून पोप याचे सर्व नियम आणि तें बहिष्कारपत्र यांच्या अग्नीस आहुती दिल्या; आणि जर्मनींतील पुष्कळ नगरवासी लोकांनीही ल्यूथर याचेंच अनुकरण केलें.

नवीन निवडलेला बादशहा पांचवा चार्लस जर्मनीमध्यें आला तेव्हां ल्यूथर याच्या पक्षांतील लोकांची वर सांगितल्याप्रमाणें स्थिति होती; आणि त्याच्या मतांचा याप्रमाणें प्रसार झाला होता. संस्थानी राजांपैकीं कोणींही लूथर याच्या मताचा स्वीकार केला नव्हता. ईश्वरभक्ति करण्याच्या क्रमामध्यें फेरफार झाला नव्हता. धर्मोपदेशकाच्या हक्कांत आणि अधिकारांत कांहीं ढवळाढवळ झाली नव्हती; आणि जरी दोन्हीही पक्षाचे लोक आपापलीं मतें स्थापन करण्यासाठीं मोठ्या निकरानें भांडत होते, तरी ग्रंथ छापणें, खंडनमंडन करणें आणि उत्तर-प्रत्युत्तर देणें ह्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही अत्याचाराचा उपयोग करण्यांत आला नव्हता. पण लोकांच्या मनावर ल्यूथरच्या मतांचा बळकट ठसा उमटला होता. प्राचीन नियम आणि मतें यांविषयीं त्यांची श्रद्धा कमी झाली होती. आणि जर्मनी देशांत चहूंकडे एकदम प्रचलित धर्माविरुद्ध अग्नीचा भडका होईल, अशीं साधनें पूर्वींच तयार झालीं होतीं. प्रत्येक प्रांतांतून विद्यार्थ्यांच्या झुंडीच्याझुंडी विटेम्बर्ग येथें एकत्र झाल्या; आणि ल्यूथर याच्या हाताखालचे उपगुरु यांनीं नव्या मतांची दीक्षा घेऊन आपापल्या प्रांतांत त्याचा प्रसार केला. सत्याशीं जेव्हां जिज्ञासेचें व नवेपणाचें साहचर्य असतें, तेव्हां लोकांमध्यें प्रसार फार लौकर होतो असा नियम आहे.

पोप याची चूक.

पोप याच्या दरबाराचें दुष्टाचरण उघडकीस आणण्यास ल्यूथर प्रवृत्त झाल्यापासून त्यास प्रतिकार करण्याविषयीं पोप यानें जे यत्न केले, त्यांत पूर्ण शहाणपणही नव्हतें; व ते स्थिरबुद्धीनें दीर्घ प्रयत्न करून शेवटपर्यंतही नेलें नाहींत. ल्यूथर जेव्हां पोपाबद्दलच्या क्षमापत्राविरुद्ध भाषण करण्यास प्रवृत्त झाला, तेव्हां पोप याजवळ दोन उपाय होते. त्यांपैकीं एका उपायाच्या योजनेनें ल्यूथरचा प्रयत्न अगदीं निष्फळ झाला असता, आणि दुसऱ्या उपायाच्या योजनेनें त्याचा प्रयत्न निरुपद्रवी झाला असता. ल्यूथर हा पोपप्रचारित मताचा अधिक्षेप करूं लागला तेव्हांच जर त्यास बहिष्कृत केलें असतें तर फ्रेड्रिक यानें भयानें कदाचित् त्यास आश्रय दिला नसता; लोकांनीं त्याचें भाषण ऐकिलें नसतें; आणि ल्यूथर स्वतः भयभीत होऊन त्यानें तो मार्ग सोडूनही दिला असता; तसेंच रोमन क्याथॉलिक

धर्मांतील दोष दूर करण्याकरितां कालाची अनुकूलता नसतांही पूर्वींच्या सत्पुरुषांनीं प्रयत्न केले ह्मणून त्यांचीं नांवें जशीं लोकांच्या स्मरणांत राहिलीं आहेत, त्याप्रमाणें ल्यूथर याचेंही नांव स्मरणशेष राहिलें असतें; अथवा क्षमापत्रें वाटणाऱ्यांच्या दुष्टाचरणाविषयीं पोप यानें आपला असंतोष प्रदर्शित केला असता, आणि वादग्रस्त विषयांचें प्रतिपादन करण्याची धर्मोपदेशकांस मनाई केली असती, तरी काम झालें असतें. पुनः जर पोप यानें दोन्ही पक्षांच्या लोकांस मौन स्वीकारण्याची आज्ञा केली असती, आणि जीं प्रकरणें पूर्वींच अश्रद्धेय झालीं, त्यांचा वास्तविकपणा स्थापित करण्याचा प्रयत्न न करितां आपल्या मतांविषयीं लोकांची श्रद्धा शंकाकुल केली नसती, तर आपले मताचें समर्थन करण्याकरितां ल्यूथर यानें पोपाच्या मतांतील नवे दोष काढण्याची खटपट केली नसती; फ्रान्सिस्कन व डॉमिनिकन या दोन मतांचा धर्मोपदेशकांमध्यें (मेरीच्या गर्भाच्या परिशुद्धतेविषयीं) अथवा जान्सेनिस्टस आणि जेसुईटस यांजमध्यें (इतर कांहीं मतांविषयीं) वादग्रस्त प्रश्न आहेत, त्याप्रमाणें ल्यूथर याच्या मतांविषयीं साधुमंडळीमध्यें वादविवाद चालले असते; व धर्माचें ऐक्य आणि शांति यांस अपाय होण्यापर्यंत मजल घऊन पोहोंचली नसती. परंतु लिओ यानें दोन्ही उपायांपैकीं एकही उपाय वक्तशीर न केल्यामुळें पोपाचे पुढील सर्व प्रयत्न निष्फळ झाले. त्यानें अकालीं व अयोग्य रीतीनें अधिकाराचा उपयोग केल्यानें ल्यूथर अगदीं निकरावर आला. सामोपचारानें ल्यूथर यास वश करण्यांत जो काळ घालविला, त्यांत ल्यूथर याच्या मतांचा प्रसार होण्यास अवकाश सांपडला; आणि त्यास बहिष्कृत करण्याचें शासन करण्यास इतका विलंब झाला कीं, त्या शिक्षेचें त्यास कांहींच भय वाटलें नाहीं.

पोपच्या मतांचें भ्रामकत्व.

पोप याजकडून अशा जरी चुका झाल्या तरी त्यामुळें भावी गोष्टींवर यांचा कांहींएक परिणाम झाला नाहीं. कारण ल्यूथर याच्या आचरणामध्यें इतकें शहाणपण होतें कीं, वर सांगितलेले उपाय पोप यानें वक्तशीर केले असते, तरीही कदाचित् निष्फळ झाले असते. टेटझलला प्रतिबंध करण्यास जेव्हां ल्यूथर पुढें झाला तेव्हां, पुढें त्यानें जें मत स्थापन केलें त्याविषयीं त्याच्या कांहीं मनींध्यानीं देखील गोष्ट नव्हती. ईश्वरी प्रसाद होऊन त्यास सत्याविषयीं पूर्ण ज्ञान झालें अशी गोष्ट नव्हती. तें ज्ञान त्यानें श्रम करून आणि चिंतन करून संपादन केलें होतें. म्हणून त्याचा उत्कर्ष हळुहळू होत गेला. पुनः पोपाच्या मतांचा एकमेकांशीं असा कांहीं निकट संबंध होता कीं, एक चूक शोधून काढली म्हणजे दुसऱ्या चुका शोधून काढण्याविषयीं स्वभावतःच मनुष्याच्या मनानें प्रवृत्त व्हावें; आणि त्या सत्याभासी मतांचे सर्व भाग एकमेकांशीं असे कांहीं जुळले होते कीं, त्या इमारतीचा एक दगड ओढून काढिला कीं, ती सगळी डळमळूं लागलीच म्हणून समजावें, आणि असें झाल्यावर जेव्हां पाहिजे तेव्हां अगदीं ती इमारत जमीनदोस्त करण्यास कांहीं विलंब आणि सायास नकोच होते. क्षमापत्रासंबंधीं बाष्कळ मतांचें खंडण करण्यास जेव्हां तो उद्युक्त झाला, तेव्हां आपलें दोषविमोचन

कोणत्या उपायानें होईल याचा शोध करण्याचा त्यास प्रसंग प्राप्त झाला. त्याविषयीं त्यास जेव्हां ज्ञान झालें, तेव्हां त्यास तीर्थाटणाचें आणि प्रायश्चित्ताचें वैयर्थ्य, साधूंच्या मध्यस्थीपणाची निरर्थकता, त्यांचें पूजन करणें हें अधर्माचरण आणि काल्पनिक नरकाचे अस्तित्वाविषयीं लोकांचा मिथ्याभ्रम, ह्या गोष्टी त्यास स्पष्टपणें कळून आल्या. अशीं पुष्कळ चुकीचीं मतें प्रचारांत आलीं आहेत, असें जेव्हां ल्यूथर यास कळून आलें, तेव्हां त्या मताभिमानी धर्मोपदेशकांच्या आचरणाचा शोध करण्यास तो प्रवृत्त झाला. त्यांची अपार संपत्ति, नैष्ठिक ब्रह्मचर्य धारण करण्याविषयीं त्यांचे कडक आदेश, आणि मठवासासंबंधीं वृत्तें हे त्यांच्या दुराचरणाचे मुख्य उगम आहेत, असें त्यास दिसून आलें. आणि अशा प्रकारच्या दुष्टाचरणास पोपाचें जर पाठबळ आहे, आणि त्यानें दिलेल्या अधिकारामुळें तीं जर घडून येतात तर अर्थातच पोप याच्या अधिकाराला ईश्वरी संमति आहे असें जें मत मानलें गेलें होतें, त्याविषयीं त्यास शंका येण्यास जागा झाली. ह्या सर्व गोष्टींचा अनिवार्य परिणाम असा झाला कीं, पोपाची बुद्धि भ्रमरहित असा लौकिक समज होता, त्याच्या आणि मनुष्यप्रणीत-शास्त्राच्या विरुद्ध शास्त्राला धरून त्यानें उभयतांचा धिःकार केला. ईश्वरप्रणीतशास्त्र हेंच काय तें परमार्थविषयकज्ञानाचें मूलस्थान, असें त्याच्या मनांत पक्कें भरलें. आणि त्या अमोघ मतामुळें त्याचा विजय झाला.

परंतु ल्यूथर याच्या केवळ शहाणपणानें आणि त्याच्या प्रतिपक्ष्यांकडून चुका झाल्यामुळेंच ल्यूथर याच्या मतांचा एकाएकीं प्रसार होऊन त्याचा पाया दृढ झाला, असेंही आपल्यास म्हणतां येत नाहीं. ल्यूथर यानें जीं मतें आतां प्रसिद्ध केलीं तीं निरनिराळ्या ठिकाणीं पूर्वींच प्रसिद्धीस आलीं होतीं; आणि ज्या प्रमाणांनीं तीं आतां विचारसंमत झालीं त्याच प्रमाणांनीं त्यांचें पूर्वींही पुष्टीकरण झालेलें होतें. परंतु धर्मा-मध्यें सुधारणा करण्याविषयीं पूर्वीं जे प्रयत्न झाले ते योग्य कालापूर्वीं झाले असल्या-मुळें उलटे अनर्थक झाले होते. त्याकाळीं रोमन क्याथॉलिक धर्म हा अज्ञानरूपी निबिड अंधःकारानें अगदीं व्यापिला होता. त्या अंधःकाराचें त्या अल्प प्रकाशानें दूरीकरण न होतां त्या प्रकाशाचाच उलटा लय झाला. ल्यूथर याच्या मताचा प्रसार होण्यास जीं प्रबळ कारणें अनुकूळ झालीं, तीं पूर्वीं ज्या सत्पुरुषांनीं प्रयत्न केला त्यांस अनुकूल नव्हतीं.

चौदाव्या शतकाच्या शेवटीं व पंधराव्या शतकाच्या प्रारंभीं रोमन क्याथॉलिक धर्मामध्यें जो अपेशी मतभेद झाला, त्यायोगानें पोपाविषयीं फार काळापासून जी लोकांची पूज्यबुद्धि होती, ती कमी होत चालली. दोन तीन वावदूक मुख्य धर्मा॰ ध्यक्ष त्या काळीं युरोपांत भटकत फिरले, आणि राजांचें आर्जव करून ज्या लो-कांनीं त्यांचा अधिकार मान्य केला त्यांजपासून पुष्कळ पैसा उपटला. आपल्या प्रति-पक्षास बहिष्कृत करून, व त्याच्या अनुयायांवर अपशब्दांचा भडिमार करून आपल्या

अमोघ ज्ञानाविषयीं लोकांची अश्रद्धा उत्पन्न करून त्यांनीं आपणांस तिरस्कारास्पदं करून घेतलें. कान्स्टील आणि ब्यासील येथील सभांनीं पोप यास पदच्युत करण्याचा आणि त्याच्या जागीं नवे पोप निवडण्याचा अधिकार चालविल्यामुळें लोकांस असें वाटूं लागलें कीं, पोप हा ज्यापेक्षां मनुष्याच्या नियंतृत्वाखालीं आहे, त्यापेक्षां त्याचे अंगीं दैविकशक्ति कोठून असणार ?

सहावा आलेक्झांडर आणि दुसरा जूलीयस हे एकामागून एक पापाच्या अधिकारावर आले व त्यांनीं ख्रिस्तधर्मानुयायी लोकांच्या देशाला नवा कलंक लाविला; तेव्हां पोपाच्या अधिकाराला पूर्वीं जी जखम लागली होती, ती या कलंकानें भरून आली नाहीं. पहिला हा पराकाष्ठेचा दुराचरणी, कपटी, जुलुमी आणि क्रूर होता; आणि दुसरा जरी द्वेषजनक मनोविकारांपासून अलिप्त होता तरी पराकाष्ठेचा महत्वेच्छु होता. त्याच्या प्रयत्नाला कोणीं अडथळा केला म्हणजे मग तो कृतज्ञता, लज्जा, आणि न्याय, यांला तुच्छ मानी. धर्माचें मुख्य लक्षण म्हटलें म्हणजे पवित्रता आणि दया. ह्या वृत्ति ज्याच्या अंगीं मुळीं वसत नाहीं असे दुष्टाचरणी आलेक्झांडर आणि महत्वाकांक्षी ज्यूलीयस यांच्या अंतःकरणांत धर्मसंबंधीं निभ्रांत ज्ञानाचा ठेवा सांठविला आहे, असें लोकांच्या मनांत भरविणें ही गोष्ट फार कठीण होती.

दुष्टाचरणानें आपला पगडा नुसता मुख्य धर्माध्यक्षावरच बसविला होता असें नाहीं. तर सन्यस्त व असन्यस्त आणि परमार्थपरायण धर्मोपदेशक यांस धार्मिक स्वकर्तव्याची हेळसांड करण्याची संवय जडून गेली होती. हे लोक मोठ्या कुळांतले होते. मान व बोज यासाठीं मात्र त्यांनीं धर्मदीक्षा घेतली होती. संपत्ति आणि अनुद्योग हीं त्यांस दुष्टाचरणास प्रवृत्त करण्यास स्वभावतः अनुकूल होतीं. त्यांजपेक्षां खालच्या प्रतीचे धर्मोपदेशक दरिद्री असल्यामुळें आपल्यापेक्षां वरिष्ठ धर्मोपदेशकांप्रमाणें त्यांस ऐषआराम करण्यास साधन नव्हतें, तरी त्यांचें अज्ञान आणि दुराचरण ह्यायोगानें ते लोकांस कमी तिरस्कारार्ह नव्हते. ब्रह्मचर्याविषयीं नियम दोन्ही वर्गांस सारखे लागू होते. त्या त्या नियमांचा विपरीत परिणाम असा झाला कीं, युरोपांतील कित्येक प्रदेशांत धर्मोपदेशकांस संभोगसंबंधीं परवानगी दिली. इतकेंच नाहीं, पण त्याविषयीं त्यांस ताकिदी दिल्या. सोळाव्या शतकाच्या फार अगोदर जे इतिहासकार झाले, त्यांनीं धर्मोपदेशकांच्या बेढंगी वर्तनाविषयीं जें वर्णन केलें आहे, तें आपल्यास या काळांत अगदीं खरें देखील वाटत नाहीं. धर्मनियुक्त मनुष्याचा अमर्याद विषयासक्तपणा पाहून गृहस्थाश्रमी लोकांस त्यांचा मोठा तिटकारा आला. त्यांचें वर्तन त्यांच्या अंगीकृत अधिकाराला विलग होतें, म्हणून ते त्यांचा द्वेष करीत असें नाहीं, तर ते गृहस्थाश्रमांत अगदीं नीच असतां त्यांस एकदम महत्व प्राप्त झालें; पण तदनुरूप त्यांचें आचरण नव्हतें, हें लोकांस सहन होईना. तेव्हां त्यांनीं त्यांच्या पापाबद्दल फार निर्भर्त्सना केली.

अर्थातच अशा समयीं ल्यूथर याच्या श्रोत्यांस धर्मोपदेशकांची त्यांच्या दुष्टाचरणाबद्दल निंदा अत्यंत प्रिय झाली, व त्याविषयीं स्वतःच्या माहितीवरून प्रत्येक श्रोत्याची खातरजमा झाली.

पैका दिला म्हणजे अघोर पापाबद्दल देखील क्षमा मिळण्याचा प्रचार सुरू झाल्यापासून तर पापाची फारच वृद्धि होऊं लागली. युरोपांतील सर्व राष्ट्रांत मॅजिस्ट्रेटचा अधिकार अतिशय बेकायदेशीर आणि दंडेलीचा होता. कायद्यांत सांगितल्याप्रमाणें अमुक एक रक्कम दिली अथवा दुसरी तोडजोड केली म्हणजे न्यायाधीश अपराध्यास बेलाशक सोडून देत असत. मग त्याचा अपराध किती कां घोर असेना. पैसा जमा करण्याकडे दरबारांचें नेहमीं लक्ष होतें. पोपनेंही आपल्या दरबारांत ही चाल वहिवाटींत आणली, व धर्मसंबंधीं कोणीं कांहीं अपराध केला. म्हणजे त्याजपासून द्रव्य घेऊन त्यास पापाबद्दल क्षमा करावी असा धडाका सुरू केला. अपराधाबद्दल तोडजोड करणें ही लोकांच्या वळणीं पडल्यामुळें ह्या व्यापाराविषयीं प्रथम त्यांच्या मनाचा ग्रह विपरीत झाला नाहीं; शिवाय रोमन अदालतीनें एक कायदा प्रसिद्ध केला तो असा--प्रत्येक अपराधाबद्दल अमुक रक्कम द्यावी, असें स्पष्ट निर्दिष्ट केलें. **डीकाल** हा एक धर्माध्यक्षाच्या हाताखालचा कामगार असे. त्यानें खुनाच्या अपराधाबद्दल २० क्राऊन दिले ह्मणजे त्यास माफी देत. ३०० लिव्हर दंड देण्याची ऐपत असली, म्हणजे धर्माध्यक्षानें पाहिजे त्याचा प्राण घ्यावा. कोणत्याही धर्मोपदशकानें आपल्या अति बीभत्स आचरणाबद्दल या रकमेचा तृतीयांश दिला ह्मणजे पुरे! जीं अघोर पातकें मनुष्यप्राण्याच्या हातून क्वचित् घडावयाचीं अशा काल्पनिक पातकावर देखील अगदीं नेमस्त कर बसविला होता. परंतु जेव्हां राजदरबारांत न्यायाची उत्तम व्यवस्था झाली, अपराधाबद्दल तडजोड करण्याची चाल हळुहळू कमी होऊन अपराध्यास अपराधानुरूप शासनें होऊं लागलीं आणि नीति व धर्म याविषयीं शुद्ध भावना मनुष्याच्या मनांत येऊं लागल्या, तेव्हां पैसा घेऊन अपराधाबद्धल क्षमा करणें ही पोप याच्या दरबारची चाल लोकांस अपवित्र वाटूं लागली; आणि धर्माध्यक्षांच्या आचरणांत हा एक मोठा दोष आहे असें ते मानूं लागले.

धर्मोपदेशकांनीं आपली अमर्याद संपत्ति आणि सत्ता यांच्या जोरावर प्रत्येक वर्गातील लोकांच्या हक्कांत ढवळाढवळ केली नसती, तर कदाचित् लोकांनीं त्यांच्या आचरणांतील वैगुण्याकडे कानाडोळा केला असता. अतिभक्तीचा असा एक नैसर्गिक गुण आहे कीं, ज्या लोकांस ती पवित्र मानते, त्यांजविषयीं तिच्या स्नेहाला कांहीं सीमा नसते आणि त्यांस संपत्ति व सत्ता यांच्या शिखरावर नेऊन बसविल्यावांचून आपली त्याजविषयीं जी पूज्यबुद्धि आहे, तिची सार्थकता झाली असें तीस वाटत नाहीं. सर्व युरोपांतील लोकांची धर्मोपदेशकांविषयीं अतिभक्ति हेच त्यांच्या

संपत्तीचें आणि सत्तेचें मूळ ! गृहस्थांच्या विवेकशून्य औदार्यानें धर्मोपदेशकांस जी सत्ता आणि संपत्ति प्राप्त झाली ती आतां त्याच गृहस्थांच्या डोळ्यांत खुपूं लागली.

तथापि धर्मोपदेशकांनीं जर्मन लोकांना इतका उपद्रव दिला होता कीं, युरोपांतील इतर लोकांपेक्षां ते धर्मोपदेशकांच्या प्रतिपक्ष्याचें भाषण ऐकण्यास जास्त उत्सुक झाले होते. पोप आणि जर्मनीचा बादशहा यांजमध्यें जर्मनींतील मठाधिपतीच्या अधिकारांवर नेमणूक कोणीं करावी, व त्याजवर देखरेख कोणीं ठेवावी याबद्दल फार काळपर्यंत झगडा व लढाया चालूं होत्या. तेव्हां जर्मनी देशांतील बहुतकरून सर्व विख्यात धर्मोपदेशकांनीं पोप याचा कैवार घेतला होता; आणि दांडगाई करून बादशहाचा मुलूख बळकाविला होता; इतकेंच नव्हे तर आपल्या अधिकाराखालील देशांवर बादशहाची हुकमत होती तीही आपण चालवूं लागले. सलोखा झाल्यावरदेखील त्यांजकडे तें स्वामित्व राहिलें होतें. जसा काय पुष्कळ वर्षांच्या भोगवट्यानें त्यांचा हक्क कायम झाला होता! आपला मुलूख परत घेण्याची शक्ति बादशहामध्यें नसल्यामुळें, त्यास त्या त्या विस्तीर्ण मुलुखाविषयीं धर्मोपदेशकांस जहागिरीच्या सनदा करून देणें भाग झालें. ह्या गोष्टीचा परिणाम असा झाला कीं, जर्मनींतील मठाधिपति राजे बनले; आणि ते आपल्या वर्तनांत व रीतीभातींत राजांच्या दुर्गुणांचें अनुकरण करूं लागले; आपल्या दीक्षेला उचित अशा पवित्राचरणाचा त्यांनीं त्याग केला.

(१३) जर्मन देशांतील राज्यकारभारांतील अव्यवस्था आणि नेहेमीं लढाया यांजपासून धर्मोपदेशकांचें ऐश्वर्य सहजासहजीं वाढलें. त्या झोटिंगपादशाहींत धर्मोपदेकांचा प्रदेश मात्र सुरक्षित होता. त्या काळीं त्या वर्गाविषयीं लोकांची पूज्यबुद्धि होती, म्हणून त्यांच्या मिळकतीचें संरक्षण झालें असें नाहीं, तर त्यांच्या भोगवट्याला कोणीं हरकत केली असतां त्यांस बहिष्कार घालीत. आणि तत्कालीन लोक अतिशय भाविक असल्यामुळें त्या शासनांचें त्यांस मोठें भय वाटत असे. ही स्थिति पाहून पुष्कळांनीं आपल्या जमिनी धर्मोपदेशकांच्या स्वाधीन केल्या, आणि त्याबद्दल त्यांस सारा देण्याचें कबूल करून आपण त्यांचीं कुळें बनले. यावांचून त्या काळीं मिळकतीचा बचाव करण्यास दुसरा मार्गच नव्हता. ह्यायोगानें धर्मोपदेशकांची संपत्ति अमर्याद वाढली.

मिळकतीपेक्षां आपल्या स्वतःच्या सुरक्षितपणाविषयीं ते फार काळजी बाळगीत असत; आणि त्याबद्दलचे त्यांचे प्रयत्न विशेष फलद्रूप होत. बाहेरून दिसण्यांत भव्य असे संस्कार करून त्यांस धर्मोपाध्यायपणाची दीक्षा देत असत, यामुळें त्यांचे चमत्कारिक पोषाक आणि बाह्य आचरण यायोगानें इतर लोकांमध्यें आणि त्यांजमध्यें वैलक्षण्य असे. त्यांनीं आपल्या वर्गाकडे पुष्कळ अधिकारही बळकावून घेतल्यामुळें ते स्वाभाविकपणें लोकांच्या अतिशय सन्मानास पात्र होऊन बसले होते. जसजसा भाविकपणा वाढत चालला तसतसें त्या लोकांस जास्त महत्व येत चाललें; आणि

प्रापंचिक लोकांस जे कायदे लागू तेच कायदे परमार्थपरायण लोकांस लागूं करणें, आणि दोन्ही वर्गीच्या लोकांस समान शिक्षा देणें, हा मोठा अधर्म आहे, असें लोक मानूं लागले. पहिल्यानें धर्मोपदेशकांची मर्यादा राखण्याकरितां त्यांजवर मुलकी मॅजिस्ट्रेटची हुकमत चालत नसे. परंतु तो आपला एक हक्क आहे असा पुढें ते लोक दावा (हट्ट) करून बसले; आणि त्याबद्दल पोप याजपासून व मोठ्या प्रतापशील बादशहापासून देखील त्यांनीं माफीच्या सनदा करून घेतल्या. हा किता वळवून पुष्कळ लोकांनीं अपराधाबद्दलचें यथार्थ शासन चुकविण्यासाठीं धर्मोपदेशकांची दीक्षा घेतली. तेव्हां लोक जागे झाले, व जर्मनींतील बडे लोकांनीं ह्या अभिषिक्त दुष्कर्मी लोकांस अतिशय अघोर पापाबद्दलही शासन होत नाहीं, एतदर्थ डायेट सभेपुढें फार नालस्ती केली. आणि हा पाद्री लोकांस दिलेला हक्क जसा समाजास घातक आहे तसाच त्यांच्या सदाचरणासही घातक आहे, असें सिद्ध करून दाखविलें.

व्यावहारिक गोष्टींचा धर्मसभेंत प्रवेश.

(१४) धर्मोपदेशक आपले हक्क संभाळून उगीच बसले नाहींत. त्यांनीं प्रापंचिक लोकांच्या हक्कांमध्यें देखील ढवळाढवळ केली. विवाह, मृत्युलेख, व्याज, औरसपणा आणि मठाचें उत्पन्न यांचा धर्माशीं फार निकट संबंध आहे, असें म्हणून त्याविषयीं तंटा उत्पन्न झाला असतां त्यांचा इनसाफ धर्माध्यक्षांच्या कोर्टांत ते करूं लागले. यायोगानें निमें प्रजेवर त्यांची सत्ता चालूं लागली; तरी त्यांची तृप्ति झाली नाहीं. दुसऱ्या वादांबद्दलही आपल्या कोर्टांत न्याय व्हावा, म्हणून त्यांनीं विलक्षण प्रयत्न केले, व हजारों युक्त्या लढविल्या. अज्ञानकालांत जी कांहीं विद्यासंपत्ति होती, ती सर्व धर्मोपदेशकांच्या घरांत होती, त्यामुळें ज्ञानामध्यें आणि बुद्धिवैभवामध्यें राजांच्या दरबारांतील न्यायाधीशापेक्षां त्यांचे न्यायाधीश श्रेष्ठ होते. म्हणून सामान्य लोक आपल्या वादांचा धर्माशीं संबंध आहे, असें निमित्त करून ते वाद धर्मोपदेशकाच्या कोर्टांत नेत असत. त्यांनीं केलेल्या फैसल्यावर लोकांचा जास्त विश्वास होता. लोकांची इच्छा आणि धर्मोपदेशकांचें हित यांचें ऐक्य झाल्यामुळें, राजांचा अधिकार अगदींच विलयास गेला; व पाद्री लोकांची संपत्ति आणि सत्ता अमर्याद वाढली.

बहिष्काराचा दुरुपयोग.

(१५) आपले हुकूम बजाविण्यामध्यें ज्या शासनाची धर्माधिकारी लोक योजना करीत असत त्या शासनापासून त्यांच्या अधिकाराला फार महत्व आलें होतें. त्यांच्या सत्तेपुढें लोकांची त्रेधा होत असे. धर्मबहिष्कृत करणें, ह्या शासनाची योजना पूर्वीं फक्त धर्माचें पावित्र्य संरक्षण करण्याकरितां होती. धर्मपरायण लोकांमध्यें जो कोणी दुष्टाचरणी असेल त्याचें निर्मूलन करावें हा त्या शासनाचा मुख्य उद्देश होता. परंतु आपली सत्ता वाढविण्याकरितां ह्या शासनाचा उपयोग करतांनां पाद्री लोक आतां कांहींच शंका बाळगीनासे झाले; अगदीं क्षुद्र प्रसंगीं ह्या शासनाची योजना होऊं लागली.

प्रापंचिक व्यवहारासंबंधीं त्यांच्या ठरावाचा कोणीं अतिक्रम केला, म्हणजे त्यास लागलींच धर्मबहिष्कृत करीत असत; म्हणजे ख्रिस्तानुयायी यांस जे हक्क असतात, त्यांपासून तो बहिष्कृत होत असे. इतकेंच नाहीं, पण मनुष्यप्राणी या नात्यानें त्यास जे स्वाभाविक हक्क असतात, त्यांस देखील तो मुकत असे. अतिशय क्रूर आणि दंडेल स्वभावाच्या मनुष्याचे देखील या शासनानें हाल होऊन गात्रें अगदीं शिथिल होऊन जात.

(१६) धर्माधिकारी यांनीं याप्रमाणें कावेदावे करून जी संपत्ति व सत्ता मिळविली होती, तिचें संरक्षण करण्याकरितां योग्य उपायांची योजना करण्यांत ते फार तत्पर असत. त्यांच्या ताब्यांत जें कांहीं होतें तें ईश्वरास अर्पण केल्यामुळें अदेय्य आहे असें त्यांनीं ठरविलें होतें. त्यामुळें त्यांजपाशीं अपार संपत्ति जमा झाली. जर्मन राष्ट्राच्या एकंदर मिळकतीचा निंमेहून जास्त भाग धर्मोपदेशकांकडे होता, असा अजमास आहे; इतर देशांतही त्यांच्या प्राप्तीचें प्रमाण कमीजास्त होतें तरी प्रत्येक ठिकाणीं तें बेसुमार जास्त होतें. त्यांच्या ताब्यांतील जमिनींवर कोणत्याही प्रकारचा कर नव्हता. कारण जर्मनींतील सर्व पाद्री यांस कायद्यानें सर्व प्रकारच्या करांपासून मुक्त केलें होतें; आणि जर एखाद्या विशेष प्रसंगीं त्यांनीं राजांस आपल्या संतोषानें पैशाचा पुरवठा केला, तर त्यांनीं औदार्यानें ती एक देणगी दिली आहे असें समजत. अर्थातच मागणें करण्याचा देखील हक्क राजांस नव्हता. मग वसूल करण्याचा तर कोठून असेल ? या गोष्टीचा असा परिणाम झाला कीं, जर्मनींतील अर्धीअधिक प्रजा कराच्या बोजानें अगदीं चिरडून गेली; म्हणजे ज्याच्या ताब्यांत पुष्कळ मिळकत आहे, त्याजवर राष्ट्राचा नेहमींचा खर्च चालविण्याकरितां, अथवा प्रसंगविशेषीं त्याचा बचाव करण्याकरितां कोणत्याही प्रकारचा कर नाहीं व आपल्यावर मात्र आहे, हें पाहून त्यांस आपली बदशान होते, असें वाटूं लागलें.

करासंबंधीं अन्याय.

(१७) धर्माधिकारी यांची अपार संपत्ति आणि अनेक अधिकार जरी जर्मनींतील इतर वर्गांचे लोकांस पीडाजनक होते, तरी त्यांच्या देशांत राहणाऱ्या धर्मोपदेशकांकडेसच जर ते असते, तर त्यांस तें दुःख कदाचित् सुसह्य झालें असतें. कारण त्यांच्याकडून संपत्तीचा वाईट रीतीनें विनियोग, आणि सत्तेचा अयोग्य रीतीनें प्रयोग झाला नसता. परंतु रोम येथील महत्वाकांक्षी बिशप यांनीं पूर्वींच असा नियम घातला होता कीं, "ख्रिस्तधर्माच्या मठांच्या स्वामित्वाचा मुख्य अधिकार आमचा आहे." याप्रमाणें त्यांनीं ज्या कांहीं त्यांस अनुकूल गोष्टी घडून आल्या, त्यांचा चातुर्यानें आपल्या हिताकडे उपयोग करून घेऊन कांहीं राजांच्या भक्तिभावाचा, व कांहीं गरजेचा, आणि लोकांच्या भोळेपणाचा

पोप व राजे.

लाभ घेऊन आपला अधिकार कायमचा स्थापित केला. जर्मनी देशांत पोप याच्या अधिकारास कांहीं मर्यादाच नव्हती. त्यानें मोठमोठाले प्रतापी आणि यशस्वी बादशहा धर्मबहिष्कृत करून पदच्युत केले. त्यांच्या प्रजा, त्यांचे प्रधान, व त्यांचीं मुलें यांजवर देखील शस्त्र धरण्यास उत्तेजन दिलें. ह्या भांडणांत नेहमीं पोप ह्यांनीं राजांच्या अधिकाराचा अपहार करून आपलें स्वातंत्र्य वाढविलें होतें. सारांश, परकीय जुलुमी राजांच्या अमलानें व त्यांच्या अपहारानें जीं दुःखें होतात ती लोकांबरोबरच जर्मनींतील धर्मोपदेशकांसही सोसावीं लागत असत.

पोप व धर्माधिकारी.

त्या घोंटाळ्याच्या काळांत धर्माधिकारी नेमण्याचा अधिकार पोपांनीं जर्मनींतील राजांपासून हिसकावून घेतल्यामुळें, पोपांस मोठें वैभव प्राप्त झालें. जर्मनींतील बादशहा आणि राजे ह्या अधिकाराचा फार काळापासून उपभोग घेत होते; आणि त्यायोगानें त्यांजकडे मोठी सत्ता होती व त्याबद्दल त्यांस प्राप्तीही मोठी होती. परंतु तो हक्क पोपानें मुरगाळून घेतल्यामुळें त्यास सर्व जर्मन देश आपल्या मनुष्यांनीं व्यापून टाकण्यास सवड मिळाली. जर्मनींतील प्रत्येक प्रांतांतील मोठ्या उत्पन्नाच्या धर्माधिकाऱ्यांच्या जागा त्यांनीं परदेशीय लोकांस दिल्या; आणि त्या प्रांतांतील संपत्ति आपल्या ऐषआरामाकरितां रोम येथें नेली. तो काल जरी अति मूढ भक्तीचा होता, तरी देखील त्या काळांतील लोकांस तो जुलूम सोसवेनासा झाला. त्यांनीं त्याविषयीं इतकी आरडओरड केली कीं,–जर आपण आपल्या अधिकारांत कांहीं कमीपणा केला नाहीं तर लोक फार रागावून जातील, व परिणाम चांगला होणार नाहीं असें पाहून त्यांनीं अशी तोडजोड काढली कीं–सहा महिन्यांत धर्माध्यक्षाच्या ज्या जागा रिकाम्या होतील त्यांजवर पोपानें धर्माध्यक्ष नेमावे; आणि बाकी राहिलेल्या काळांत ज्या जागा रिकाम्या होतील त्यांची व्यवस्था राजे आणि दुसरे कायदेशीर पुरस्कर्ते यांनीं करावी.

पोप अधिकार वाढवितात.

(१८) परंतु रोमच्या दरबारानें जी गोष्ट कबूल केली होती ती नाहींशी करण्यास युक्ति शोधून काढिली. व प्रत्येक प्रांतांतील कांहीं धर्माध्यक्षाच्या जागा पोपानेंच भराव्या, अशी वहिवाट चालत होती ती आतां पोपांनीं अमर्याद वाढविली. रोमच्या दरबारांतील अधिकाऱ्यांकडे ज्या वृत्त्या बेतानें होत्या, त्या सर्व आणि दुसऱ्या वृत्त्या पोपनें बळकाविल्या. दुसरा ज्यूलीयस व दहावा लिओ यांनीं तर जेथें त्यांचे अधिकार स्पष्ट नव्हते ते सर्व अधिकार आपल्याकडे घेतले. पोपांनीं आपल्या अधिकाराची अशा प्रकारें मर्यादा वाढविली तरी कांहीं सीमा होती. ती मुळींच नसावी म्हणून पहिल्याने जी धर्माध्यक्षाची जागा खालीं होईल, तिजवर अमुक मनुष्याची योजना केली आहे असा अगोदरच पोपनें हुकूम करण्याचा प्रचार सुरू केला आणि त्यास " अपेक्षित अनु-

ग्रह" करण्याचा हक्क असें नांव दिलें. अशा प्रकारचे छक्केपंजे आणि लबाड्या करून पोपांनीं आपल्या शागीर्दांकडून सगळा जर्मन देश व्यापून टाकला.

ह्या विलक्षण सत्ता ज्या रीतीनें त्यांनीं अंमलांत आणल्या त्यांपासून ते लोकांस फारच नावडते झाले; आणि त्यांचा जुलूम लोकांस अगदीं सोसवेनासा झाला. रोमच्या दरबारची तृष्णा आणि अपहारबुद्धि यांस कांहींच मर्यादा राहिली नाहीं. धर्माध्यक्षाच्या वृत्त्या विकण्याचा प्रचार इतक्या अविवेकानें सुरू केला गेला कीं, त्याचें गोपन करण्याविषयीं अथवा त्यांस कांहीं दुसरें रूप देण्याविषयीं किंचित् देखील प्रयत्न केला नाहीं. कित्येक वेळीं व्यापाऱ्यांच्या कंपन्या पोप यांच्या प्रधाना-

पाद्र्यांच्या जाग्यांचा लिलांव.

पासून जर्मनी देशांतील धर्माधिकाऱ्यांची वृत्ति उघडपणें विकत घेत असत; आणि त्यांचा फुटकळ विक्रय करून त्यांत नफा मिळवीत असत ! इकडे ख्रिस्तधर्माच्या मुख्य अधिकाऱ्याचें अयोग्य वर्तन पाहून सदाचरणी लोकांस परमदुःख वाटत होतें; आणि अधर्मप्रयुक्त व्यापारापासून अपार संपत्तीचा जर्मनी देशांतून अपहार करण्यांत येत होता. तें पाहून नीतिविशारद लोकांचीं मनें अगदीं त्रस्त झालीं होतीं.

(१९) ज्या देशांतल्या लोकांनीं पोपचा अधिकार कबूल केला होता, त्या

पाद्र्यावर कर.

लोकांपासून कायदेशीर रीतीनें जो पैसा घेण्यांत येत असे, ती रक्कम इतकी जबर होती कीं–किंचित् वाढही कुरकुर उत्पन्न करी. अधिकार मिळाला म्हणजे प्रत्येक धर्माधिकाऱ्यास आपल्या वृत्तीचें एक वर्षाचें उत्पन्न पोपास द्यावें लागे. त्याखेरीज एकंदर उत्पन्नाचा दशांश दरसाल द्यावा लागे. त्याखेरीज टर्क लोकांवर स्वारी करण्याचा हेतु नसतां, व कधीं केलीही नसतां, त्या निमित्तानें धर्मोपदेशकांकडून आणखी द्रव्य घेत असत. त्यावरून रोमच्या दरबारीं नेहमीं द्रव्याचा किती मोठा पूर वहात होता याची आपल्यास अटकळ करतां येते.

सोळाव्या शतकाच्या आरंभीं पोपच्या संपत्तीची व अधिकाराची याप्रमाणें स्थिति होती; आणि जुलुमानें लोकांचीं मनें अगदीं खवळून गेलीं होतीं.

या सर्व व अशाच इतर कारणांमुळें पोपच्या अधिकाराचें आपल्या मानेवरील जूं काढून टाकण्यास लोक अगदीं तयार होऊन राहिले होते. त्याच वेळेस ल्यूथर हा पोपाच्या दरबारांतील आणि धर्मोपदेशकांच्या वर्तनांतील व्यंगें उघडकीस आणूं

कारणांची अनुकूलता.

लागला. मग काय ! लोक मोठ्या आनंदानें त्याचें भाषण ऐकण्यास त्याच्या भोंवतीं जमूं लागले. त्याच्या मताचा चोहोंकडे प्रसार होत चालला. ल्यूथर हा मोठ्या करड्या स्वभावाचा होता. आपल्या मतास जो कोणी प्रतिकूळ असे त्याची तो पराकाष्ठेची निर्भर्त्सना करीत असे हें खरें. परंतु त्या काळांतील लोकांचीं मनें धर्मोपदेशकांच्या जुलुमांनीं पराकाष्ठेचीं क्षुब्ध झाल्यामुळें ल्यूथरचे दोष त्या काळांतील लोकांस भासले नाहींत.

छापण्याची कला.

(२०) ल्यूथर हा मोठा साहसी होता; आणि त्याचा उत्कर्ष होण्यास अनुकूल करणेंही पुष्कळ घडून आलीं. सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं छापण्याची युक्ति सांपडली होती, तिचा ल्यूथरमताचा प्रसार होण्यास फार उपयोग झाला. सगळ्या युरोपांत त्याचे ग्रंथ सगळ्या लोकांस वाचण्यास मिळाले. छापण्याची युक्ति सांपडली नव्हती तेव्हां श्रीमंत लोकांस मात्र पुस्तकें वाचण्यास मिळत असत, तीं आतां सर्व लोकांस मिळूं लागलीं. लोकांनीं ल्यूथर याचे ग्रंथ वाचून ज्या मतांवर पूर्वीं त्यांची श्रद्धा होती, त्यांविषयीं सुद्धां आपण होऊनच त्यांनीं विचार केला, आणि त्यांपैकीं पुष्कळ मतांचा धिक्कार केला. त्यांस कोणीं कांहीं शिकवावें देखील लागलें नाहीं.

विद्याभिरुचि व ल्यूथर.

(२१) त्याकाळीं विद्येविषयीं लोकांस अभिरुचि उत्पन्न झाली. ही गोष्ट ख्रिस्त धर्मामध्यें सुधारणा होण्यास फार कारणीभूत झाली. ज्याच्या अभ्यासापासून मनुष्यास सत्पथ, समर्पक आणि प्रवर्तक ज्ञानाची प्राप्ति होते, अशा रोमन व ग्रीक लोकांच्या ग्रंथांचा लोक अभ्यास करूं लागले. मनुष्यप्राणी पुष्कळ काळपर्यंत अज्ञानरूपी गाढ निद्रेंत निजला होता, तो आतां जागा होऊन आपल्याविषयीं आपण विचार करूं लागला, असें दिसूं लागलें; आणि फार काळापासून आपल्या बुद्धीचा उपयोग कसा करावा हें तो विसरला होता त्याचें आतां त्यास स्मरण झालें. ज्या मार्गाचा लोकांनीं कधीं अवलंब केला नव्हता त्या मार्गाचा धिटाईनें अवलंब करून नव्या मतांचा ते स्वीकार करूं लागले. सारांश, ल्यूथरच्या नव्या मतांचा नूतनपणाच लोकप्रिय होण्यास कांहींसा कारण झाला. ल्यूथर यानें धर्मरूपी दुष्टचालीवरील पडदा एकीकडे केला, तेव्हां लोकांस त्याबद्दल कांहीं वाईट वाटलें नाहीं. त्यांनीं त्याची उलट स्तुतिच केली. आणि ते त्याच्या प्रयत्नास साहाय्य करूं लागले. ल्यूथर हा स्वतः रसज्ञ नव्हता; आणि ग्रंथाचें रहस्य जाणण्यास अथवा सालंकार ग्रंथांची रचना करण्यांत जरी अनभिज्ञ होता तरी त्यानें उत्साहानें प्राचीन ग्रंथांचा अभ्यास करण्याविषयीं लोकांस उत्तेजन दिलें. आणि धर्मशास्त्राचा वास्तविक अर्थ समजण्याकरितां आपण स्वतः हिब्रू आणि ग्रीक या भाषांचा अभ्यास केला. धर्मग्लानि होऊन अत्यंत अनाचार झाला म्हणजे परमेश्वराच्या इच्छेनें कोणीएक महात्मा जन्मास येऊन पुनः पवित्र धर्माची स्थापना होते, असा नियम आहे, त्याप्रमाणेंच ही गोष्ट घडून आली. अशा कालीं ल्यूथर जन्माला आला, आणि त्याच्या अत्यंत दीर्घ प्रयत्नानें रोमन क्याथोलिक मतांमध्यें सुधारणा होऊन पोपप्रभृति धर्माध्यक्ष दुष्टाचरणापासून निवृत्त झाले. हा प्रसंग सोळाव्या शतकांत जर्मनीचा बादशहा पांचवा चार्लस याच्या कारकीर्दींत घडून आला; त्याविषयीं पुढील प्रकरणांत निरूपण केलें आहे.

प्रकरण २ रें.

विद्याप्रसार व धर्मस्फोट.

युरोपांत जसजसा विद्येचा ' प्रसार ' होत चालला तसतसें खरें तत्त्व जाणण्याची लोकांची जिज्ञासा वाढत चालली, आणि त्यायोगानें ल्यूथर यास मोठें साहाय्य मिळालें हें मागें सांगितलें. पंधराव्या शतकाच्या शेवटीं व सोळाव्या शतकाच्या आरंभीं ज्या लोकांनीं प्राचीन विद्येचा अभ्यास केला त्यांपैकीं बहुतेक निराग्रही लोकांस पोपांचीं मतें आणि सांप्रदाय यांजमध्यें पुष्कळ दोष दिसून आले आणि त्यांचें प्रतिपादन करण्याकरितां अज्ञ पाद्री लोकांनीं ज्या युक्त्या योजिल्या, त्यांत त्यांस त्या मतांचा पोकळपणा दिसून आला. ज्यामध्यें अनेक दोष आहेत अशा मतांचा स्वीकार करून त्यांचें मंडन करण्याविषयीं पोप–अनुयायी पाद्री लोकांचा प्रयत्न पाहून, लोक त्यांचा विशेष तिरस्कार करूं लागले व त्यांच्या मूर्खपणाविषयीं त्यांचा उघड रीतीनें उपहास करूं लागले. जर्मनीमध्यें प्राचीन विद्येचा अभ्यास करण्याविषयीं लोकांचें मन वळविण्याचा प्रयत्न झाला, तेव्हां तेव्हां जर्मनींतील मूढ पाद्री लोकांनीं त्या गोष्टीस फार अडथळा केला. तेव्हां विद्येचे पुरस्कर्ते यांनीं त्यांच्या मोबदल्यांत त्या पाद्री लोकांच्या मूढपणाबद्दल त्यांच्यावर फार कडाका उडविला. त्या समयीं रोमन कॅथोलिक मतांतील दोषांविषयीं ज्यांनीं लेख लिहिले ते ल्यूथर याच्या लेखांपेक्षां कांहीं उणे नव्हते.

ल्यूथर व चार्लस.

वर्मूस् येथें जी सभा भरली होती तिजमध्यें इतर कामांचा विचार झाल्यावर मग धर्मसंबंधीं विचार झाला. ल्यूथरचा प्रश्न स्वीकारण्याचें पांचव्या चार्लसच्या मनांत येण्यास पुष्कळ कारणें होतीं. पोपानें राजाच्या अधिकाराचा अपहार केला होता, हा ल्यूथरचा पोपावर जबर दोषारोप होता. परंतु फ्रान्सचा महाकारस्थानी राजा पहिला फ्रान्सिस हा पांचवा चार्लस याच्या सत्तेस अपाय करण्याकरितां ज्या घातक युक्त्याप्रयुक्त्या करीत होता, त्याचा प्रतिकार करण्यासाठीं चार्लसास पोप लिओच्या अनुकुलतेची गरज होती. म्हणून त्यानें ल्यूथर यास फार जुलुमानें वागविलें. जर्मनींतील पोपाचे वकिलांनीं चार्लसास असा आग्रह केला कीं, ल्यूथरच्या मताचा कांहीं एक विचार न करितां डायेट सभेनें त्यास एकदम 'अति दुष्ट व कुमार्गगामी' असें ठरवून टाकावें. कारण कीं, पोपानें त्यास पूर्वींच धर्मबहिष्कृत केलेंच आहे. वकील लोकांच्या आग्रहाप्रमाणें करण्यास चार्लस कांहीं नाखूष नव्हता, परंतु तें करणें न्याय्य नाहीं, असें त्या सभेच्या इतर सभासदांस वाटलें. त्यांनीं असा हुकूम केला कीं, ज्या मताचा अंगिकार केल्यामुळें ल्यूथर पोपाच्या शापास पात्र झाला आहे, त्या मतांचा

त्यास अजून अभिमान आहे किंवा नाहीं, हें स्वतः ल्यूथर यानें सभेपुढें येऊन स्पष्ट सांगावें. फक्त चार्लस बादशहा यानेंच नाहीं, परंतु ज्या राजांच्या मुलुखांतून ल्यूथर यास प्रवास करून यावयाचा होता, त्यांनीं देखील त्यास सुरक्षितपणाबद्दल परवाने करून दिले होते; आणि चार्लस यानें स्वतः त्यास पत्र लिहिलें होतें कीं "तुम्हास कोणत्याही प्रकारचा उपद्रव किंवा इजा मी होऊं देणार नाहीं; यास्तव तुम्ही डायेट सभेंत हजर व्हावें." ल्यूथर कांहीं कांकूं केल्यावांचून वरमस येथें जाण्यास निघाला. तो प्रवास करीत असतां, त्यास त्याच्या मित्रांनीं पुष्कळ सांगितलें कीं, "जरी तुला सुरक्षितपणाबद्दल परवाने दिले आहेत, तरी त्यांत कांहीं अर्थ नाहीं; यासाठीं तूं कांहीं आपला जीव धोक्यांत घालूं नकोस." परंतु ल्यूथर यास कांहीं भयाची पर्वा नव्हती. त्यानें आपल्या मित्रांस एकच उत्तर देऊन त्यांचीं तोंडें बंद केलीं. तो म्हणाला, "मला कायदेशीररीतीनें बोलावणें केलें आहे, यास्तव ईश्वराचें नांव घेऊन मी तेथें जाणार! मग त्या घराला जितकीं कौलें आहेत तितकीं भूतें जरी मला अपाय करण्याकरितां एकत्र झालीं असलीं, तरी त्याची मला पर्वा नाहीं."

ल्यूथरचा सन्मान.

लोकांनीं आपली स्तुति करावी, या हेतूचेंच ल्यूथर यानें रोमन कॅथोलिक मतांतील दोष उघडकीस आणण्याचा एक धंदा पत्करला होता, असें जर मानलें तर वर्म्स् येथें त्याचा मनोरथ पूर्ण झाला असें समजलें पाहिजे.

पांचवा चार्लस यानें नगरांत प्रवेश केला, त्या वेळेस लोक जमा झाले होते, त्यापेक्षांही ल्यूथर यास पहाण्याकरितां अधिक लोक जमा झाले होते. ल्यूथरच्या दिवाणखान्यांत राजे आणि अति मोठ्या पदवीचे संभावित गृहस्थ यांची नेहमीं दाटी होत असे. आपले विचार लोकांच्या मनांत ठसवून त्याप्रमाणें त्यांजकडून वर्तन करविण्याची ज्यामध्यें शक्ति असते त्यास लोक जे जे सन्मान देतात ते ते ल्यूथर यास लोकांकडून मिळाले. जन्माच्या अथवा वैभवाच्या अधिकाराच्या पोपाची लोक जी उपासना करतात, त्यापेक्षां लोकांनीं ल्यूथर याची केलेली उपासना जास्त मोकळे मनापासून होती. डायेट सभेपुढें जेव्हां तो हजर झाला तेव्हां त्याच्या वर्तनांत फार सभ्यपणा होता. त्याची धृतिही तशीच होती. त्यानें आपल्या खंडनमंडन विषयक लेखांत कडकपणा जास्त आहे असें कांहीं दिक्कत न घेतां कबूल केलें. परंतु फक्त ईश्वरप्रणीत ग्रंथाच्या आधारानें आपल्या मताचा खोटेपणा सिद्ध करून दिल्यावांचून आपण आपलें मत परत घेणार नाहीं, असें त्यानें निक्षून सांगितलें. धमकीनें अथवा विनवणीनें ल्यूथर हा आपल्या दृढनिश्चयापासून च्युत होणार नाहीं असें जेव्हां दिसून आलें, तेव्हां धर्माधिकारी मंडळींपैकीं कांहीं मंडळींनीं त्यास शासन करण्याविषयीं सभेस सूचना केली. "परंतु असा विश्वासघात करून जर्मनदेशाच्या प्रामाणिकपणाला

सभेचा वृत्तांत.

आम्हीं कलंक लावणार नाहीं " असें डायेट सभेच्या सभासदांनीं त्यांस सांगितलें आणि आपल्या कारकीर्दीचे सुरुवातीसच अशा प्रकारचें अपयशस्कर कृत्य करून आपल्या राज्यास कलंक लावून घेणें हें पांचवा चार्लस बादशहा यास उचित वाटलें नाहीं. त्यानें ल्यूथर यास सुरक्षितपणें जाण्याविषयीं परवानगी दिली. ल्यूथरनें नगर सोडल्यावर थोड्याच दिवसांनीं सभेच्या हुकुमावरून बादशहाच्या नांवानें एक करडा हुकूम प्रसिद्ध झाला. त्यांत "ल्यूथर हा पराकाष्ठेचा दुराग्रही असून धर्मबहिष्कृत आहे, यासाठीं साम्राज्याची प्रजा या नात्यानें तो ज्या हक्कांचा उपभोग घेत आहे त्या हक्कांपासून त्यास दूर केलें आहे. यासाठीं त्यास कोणी आश्रय देऊं नये; आणि परवान्याची मुदत सरल्याबरोबर तो जेथें सांपडेल तेथें त्यास धरावें " असें फर्माविलें होतें.

ल्यूथरचा अज्ञातवास.

परंतु चार्लस हा दुसऱ्या महत्वाच्या कामांत गुंतल्यामुळें व ल्यूथरचा सत्य प्रतिज्ञ आणि दूरदर्शी पुरस्कर्ता साक्सनीचा राजा जो फ्रेडरिक याच्या सावधगिरीमुळें हा कडक हुकूम अमलांत आला नाहीं. यामुळें त्यापासून कांहीं जमेस धरण्याजोगा परिणाम झाला नाहीं. ल्यूथर वरमस येथून परत येत असतां झाडींतून तोंडावर बुरखा घेतलेले कांहीं स्वार एकाएकीं धसून पुढें आले व त्यांनीं फ्रेडरिकच्या अनुशासनाप्रमाणें ल्यूथरच्या अनुयायांची दाणादाण करून ल्यूथर यास वार्टबर्गच्या किल्ल्यांत नेऊन ठेविलें. तेथें फ्रेडरिकानें ल्यूथर यास सर्व वस्तूंचा पुरवठा केला. परंतु युरोपांतील राजकीय स्थितीमध्यें फेरफार होऊन सांप्रतच्या चित्तप्रक्षोभाचा वेग कमी होईपर्यंत ल्यूथर त्या किल्ल्यांत आहे, असें कोणास त्यानें कळूं दिलें नाहीं. येथें तो नऊ महिने होता. आपल्या मतांचें मंडन करण्यांत व आपल्या प्रतिपक्षाच्या विरोधी मतांचें खंडन करण्यांत ल्यूथर नेहमींप्रमाणें येथेंही सोत्साह आणि अनलस होता.

मतप्रसार.

ल्यूथर अज्ञातवासांत असतां साक्सनी देशांत त्याच्या मताचा प्रसार फार झाला आणि आगस्टनीस पंथाच्या साधूंनीं वुइटेंबर्ग येथील विद्यालयांतील धर्मपंडितांच्या अनुमोदनानें व फ्रेडरिकच्या डोळेझांकीनें ईश्वरभक्ति करण्याच्या प्राचीन संप्रदायांत फेरफार करून एक नवान संप्रदाय सुरू केला.

ल्यूथर, पॅरिसविद्यापीठ व हेनरी.

आपल्या देशांत आपल्या मताचा प्रसार व आपल्या अनुयायांचें धैर्य आणि होणारा विजय पाहून ल्यूथराचे चित्तास समाधान झालें होतें. परंतु तो अज्ञातवासांत असतां त्यानें जीं दोन वर्तमानें ऐकिलीं त्यापासून त्याचा फार हिरमोड झाला; आणि यूरोपांतील दोन मुख्य व मोठ्या प्रबळ राष्ट्रांत आपल्या मताचा प्रसार होणें हें मोठें दुर्घट आहे असें त्यास वाटलें, त्याकाळीं पॅरिस येथील विद्यापीठाची मोठी कीर्ति होती. तें विद्यालय

फार प्राचीन असून त्यांतील गुरु विद्येनें मोठे विश्रुत होते, त्या विद्यालयांतून असे लेख प्रसिद्ध झाले कीं, ल्यूथर याचें मत अगदीं अशुद्ध आहे. दुसरें इंग्लंडचा राजा आठवा हेनरी यानें स्वतः ल्यूथरचें मत खंडन करण्याकरितां कांहीं निबंध लिहिले होते, त्यांची जरी लोकांस आज विस्मृति झाली आहे, तरी वादकौशल्य व जनमनोहारिता या गुणांत हे निबंध फार श्रेष्ठ योग्यतेचे होते. हेनरी याच्या दरबारांतील खुशामती लोकांनीं तर त्यास ग्रंथकर्त्यांच्या शिरोभागीं नेऊन बसविलें. पोप यास हेनरी यानें ते ग्रंथ अर्पण केले, तेव्हां यानें त्याची इतकी स्तुति केली कीं, जसे काय ईश्वरी साक्षात्कार झाल्यावरूनच हेनरी यानें ते ग्रंथ रचिले! आणि त्याच्या विलक्षण उत्साहाबद्दल त्यास योग्य बक्षीस दिलें पाहिजे म्हणून पोपानें त्यास "धर्मसंरक्षक" (Defender of Faith) अशी पदवी दिली व ती आजही इंग्लंडचे राजे उपभोगीत आहेत. असो. या दोन ठिकाणीं हिरमोड झाला तरी पॅरिस येथील युनिव्हर्सिटीच्या अधिकारास व हेनरी याच्या वैभवास न जुमानतां ल्यूथर यानें दोन्ही पक्षांच्या चुका काढिल्या. नंतर दोन्ही पक्षांमध्यें वादविवाद झाला तो इतक्या खडाजंगीचा होता कीं, त्याजकडे जगाचें लक्ष लागलें; आणि त्याचा परिणाम असा झाला कीं, जरी ल्यूथरच्या मताला राजाची सत्ता आणि धर्माध्यक्षाचा अधिकार सर्वस्वी प्रतिकूल होता, तरी ल्यूथरच्या मताबरोबर जो पुरावा प्रसिद्ध झाला होता, त्याच्या सत्यत्व सामर्थ्यानें फ्रान्स व इंग्लंड देशांतील लोक जुन्या मताचा त्याग करून ल्यूथरच्या मताचा स्वीकार करूं लागले.

शांति व मतप्रसार.

चार्लस आणि फ्रॅन्सिस हे एकमेकांचा हेवा करीत असल्यामुळें यूरोपांतील पुष्कळ देशांत लढाया चालू असतांही जर्मन देशांत पूर्ण शांतता होती; आणि त्यायोगानें ल्यूथरच्या मताचा प्रसार होऊन ख्रिस्त धर्मांत सुधारणा होण्यास फारच उत्तम संधि सांपडली. ल्यूथर वारबर्गच्या किल्ल्यांत असतां, त्याच्या एका शिष्यानें हलक्या प्रतीच्या लोकांमध्यें बाष्फळ मताचा उपदेश करण्यास आरंभ केला. ल्यूथरसारखाच तो उत्साही होता. परंतु त्याजमध्यें तारतम्य ज्ञान नव्हतें. त्याचा उपदेश ऐकून सॅक्सनींतील कांहीं गांवच्या लोकांनीं एकाएकीं उठावणी केली. व प्रार्थनामंदिरांत शिरून त्यांनीं तेथें ज्या मूर्ति होत्या, त्यांचा विध्वंस केला. फ्रेडरिक यास तें अपकृत्य इतकें नापसंत झालें कीं, जर वेळेवर त्यास प्रतिबंध झाला नसता तर फ्रेडरिकानें ल्यूथरचा पंथ सोडला असता. कारण कीं, त्यास आपल्या अधिकाराचा अतिक्रम होऊं देणें हें अगदींच आवडत नव्हतें. तसेंच

शिष्याचा अतिरेक.

प्राचीन मतानुयायी लोकांची व चार्लस यांची आपल्यावर खप्पा मर्जी करून घेण्यास तो तयार नव्हता. ल्यूथरनें हें वर्तमान ऐकिलें तेव्हां त्याचा परिणाम काय होईल हें त्याच्या लक्षांत येऊन तो फ्रेडरिकची परवानगी घेतल्यावांचून वुइटेंबर्ग येथें आला. रेफॉर्मेशनच्या दुर्दैवानें त्याजविषयीं

लोकांची इतकी पूज्य बुद्धि होती कीं, त्यानें आपल्या शिष्यास व त्यांजभोंवतीं जे लोक जमले होते, त्यांस दटावल्याबरोबर ते अगदीं निश्चेष्ट झाले. आणि दंगेखोर लोकांची दृष्टादृष्ट झाल्याबरोबर जिकडे तिकडे सामसूम झाली.

धर्मपुस्तकाचें भाषांतर.

अज्ञातवास टाकण्यापूर्वीं ल्यूथरनें बायबलाचें जर्मन भाषेंत भाषांतर करण्यास आरंभ केला होता. तें कृत्य जसें महत्त्वाचें होतें, तसेंच परम कठीणही होतें. मात्र ल्यूथर तें काम शेवटास नेण्यास योग्य झाला होता. कारण हीब्रू भाषेचें त्यास यथार्थ ज्ञान होतें आणि ईश्वरी ग्रंथाचें रहस्य काय आहे हें तो जाणण्यांत मोठा निष्णात होता. सन १५२२ मध्यें त्यानें **मिल्यांकथोन*** व प्रमुख शिष्यांच्या मदतीनें नव्या धर्मपुस्तकाचें भाषांतर शेवटास नेलें. ल्यूथर यानें स्वतः जे ग्रंथ प्रसिद्ध केले, त्यापेक्षां नव्या धर्मपुस्तकाच्या भाषांतरानें पोपप्रचारित मताला मोठा जबर धक्का बसला. प्रत्येक वर्गाच्या लोकांनीं तें भाषांतर मोठ्या उत्साहानें लक्ष देऊन वाचलें. लोकांस जेव्हां धर्माचें खरें स्वरूप समजलें, तेव्हां " आम्ही पोपचे प्रतिनिधी आहोंत " असें ढोंग करून धर्मोपदेशकांनीं आजपर्यंत मूळधर्मपुस्तकांतील मतांविरुद्ध त्यांजकडून जीं अहित कर्में करविलीं होतीं त्याबद्दल त्यांस मोठें नवल वाटलें. आणि आतां जेव्हां खरें धर्मपुस्तक त्यांच्या हातांत आलें तेव्हां ' ईश्वरभक्तीचा ' खरा मार्ग कोणता ह्याविषयीं निर्णय करण्यास आपण पात्र झालों आहोंत, दुसऱ्याच्या उपदेशाची आपणांस गरज नाहीं, ' असें त्यांस वाटलें. ल्यूथरनें केलेल्या भाषांतरापासून जे मोठे फायदे झाले, ते पाहून इतर देशांतील रिफॉर्मेशनच्या पुरस्कर्त्यांस उत्तेजन आलें. त्यांनीं ल्यूथर याचें अनुकरण करून आपआपल्या देशभाषेंत धर्मपुस्तकाचीं भाषांतरें करून प्रसिद्ध केलीं. त्या सुमारास जर्मनींतील पहिल्या प्रतीच्या स्वतंत्र नगरवासी लोकांनीं उघडपणें नव्या मताचा

प्रसार.

अंगिकार केला; आणि आपल्या मॅजिस्ट्रेटकडून पोप–प्रचारित मताप्रमाणें ईश्वरोपासना करण्याची लोकांस मनाई केली. जर्मनींतील कित्येक प्रांतांचे राजे आणि ड्यूक हे ल्यूथर याच्या मताचे उघड पुरस्कर्ते झाले. आणि आपल्या प्रजेस त्या मताचा उपदेश करण्याची ल्यूथर यास त्यांनीं मदत केली.

इकडे पोप लियो हा मरून पाड्रीआना हा पोप झाला होता. स्वमताचें वैकल्य पाहून रोमच्या दरबारांत मोठी काळजी उत्पन्न झाली; आणि ल्यूथर याच्या मताचा प्रसार बंद करण्याकरितां कोणत्या उपायांची योजना करावी याविषयीं धर्मोपदेशकांच्या श्रेष्ठ मसलती सुरू झाल्या. पाड्रीयाना हा परमार्थज्ञानाविषयीं ॲरिस्टाटलचीं

* हा पटाईत लेखक महा विद्वान् आणि कट्टा सुधारक होता. तथापि त्याचें लिहिणें इतकें मनोहर असे कीं, त्याचे लेख दुष्मानांनीं वाचले तरी त्यांचें मन दुखवत नसे.

जीं मतें होतीं, त्यांत निष्णात होता. ल्यूथर यानें **थामस*** **आक्किनासाची** जी निर्भर्त्सना केली ती ईश्वराचीच केली, असें पोपला वाटलें. त्यानें त्या साधूचीं मतें इतकीं शुद्ध व उत्कृष्ट मानलीं होतीं कीं, त्याजविषयीं ज्यांनीं ज्यांनीं शंका घेतली किंवा प्रतिवाद केला, ते ते लोक अज्ञानांध असावेत किंवा आपल्या मनाच्या समजुतीविरुद्ध त्यांचें आचरण असावें असें तो म्हणत असे. खरोखर पाड्रीयाना हा पराकाष्ठेचा दुराग्रही होता. प्राचीन मताचा उच्छेद होऊं नये, किंवा त्याजमध्यें फेरफार होणें धोक्याचें आहे, म्हणून त्यानें पुराणमताचा अंगिकार केला होता, असें नाहीं. आपण ब्रह्मविद्यावेत्ते आहोंत, असें समजून तो त्या मतास चिकटून राहिला होता. परंतु प्राचीन मताविषयीं त्याच्या विचारांत जरी दुराग्रह होता, तरी त्याच्या स्वतःच्या वर्तनांत पराकाष्ठेचा साधेपणा असल्यामुळें रोमचे दरबारांत त्याकाळीं जीं दुराचरणें घडत होतीं, त्यांपासून तो अगदीं अलिप्त असल्यामुळें नव्या मताच्या लोकांस त्या दुष्टाचरणाचा जसा तिटकारा होता, त्यापेक्षां त्यास कांहीं कमी नव्हता. जरमबर्ग येथें डायेट सभा भरली तेव्हां तिला त्यानें जें पत्र लिहिलें, तें आणि त्यानें आपल्या वकिलांस जे हुकूम केले, ते त्याच्या विचारांशीं अगदीं जुळून होते. ल्यूथरच्या मताची त्यानें फार निर्भर्त्सना केली होती, आणि वर्मस् येथें झालेल्या हुकूम बजाविण्याच्या कामांत हयगय केल्याबद्दल व ल्यूथरच्या मताचा प्रसार होऊं दिल्याबद्दल जर्मनींतील राजे यांस सख्त ठपका दिला होता; आणि ल्यूथर जर तत्काळ आपल्या चुका पदरांत घेणार नाहीं, तर त्याची जाळून राख करावी असें त्यानें त्यांस सत्तापूर्वक आज्ञापन केलें होतें, हें सर्व खरें; पण रोमचें दरबार आज ज्या मोठ्या संकटांत पडलें आहे, तो त्या दरबारांतील दुष्टाचरणाचा परिणाम होय, असें त्यानें निर्मळमनानें व स्पष्टार्थदर्शक शब्दांनीं कबूल केलें होतें. त्यानें असें वचन दिलें होतें कीं, माझें सर्व सामर्थ्य खर्च करून समूळ अव्यवस्था दूर करण्यास जितक्या काळाची अपेक्षा लागते तितक्या काळांत रोमच्या दरबाराची अव्यवस्था दूर करण्याचा प्रयत्न करीन. त्यानें मुख्य सभेस अशी विनंति केली कीं, कोणते उपाय योजल्यानें नव्या पाखंड मतांचा विध्वंस होईल, त्याविषयीं आपण मला सल्ला द्यावी. डायेट सभेच्या सभासदांनीं पोपाच्या पवित्र आणि स्तुत्य उद्देशाबद्दल गौरव करून वारमस येथील सभेनें जो ठराव केला तो अमलांत न आणण्याचें कारण असें सांगितलें कीं, " ल्यूथरच्या मताचा प्रसार फार झाला असून आमच्या प्रजेपासून जो द्रव्यापहार करण्यांत येतो त्यायोगानें आमच्या प्रजेला रोमच्या दरबाराचा अतिशय तिटकारा आला आहे व तो ठराव अंमलांत आणणें नुसतें धोक्याचेंच नाहीं पण अशक्य आहे." आणखी त्यांनीं प्रतिज्ञापूर्वक असें बोलून दाख-

पोप व ल्यूथर.

* हा फार मोठा विद्वान पंडित व तत्वज्ञानी होता. शब्दाचा कीस काढून सर्व संप्रदायांस शास्त्रीय स्वरूप देणारा हाच महा पंडित होय.

विलें कीं, "जर्मनींतील लोकांवर रोमच्या दरबारांतून जुलूम होत आहे, त्याविषयीं एका तयार झालेल्या यादीवरून कळून येईल. यासाठीं त्या जुलमापासून जर्मन देशाची मुक्तता होण्याकरितां, पोपास नव्या आणि कार्यक्षम उपायांची योजना करणें अगदीं जरूर आहे; आणि या रोगाचें दूरीकरण करण्याकरितां खरा उपाय हाच आहे कीं, जर्मनींतील एका मोठ्या शहरांत एक जनरल सभा भरवावी, आणि त्या सभेंत सर्वांनीं आपापली दुःखें निःशंकपणें निवेदन करून त्याविषयीं आपापले अभिप्राय कळवावे, आणि त्याविषयीं सभेंत पुरता विचार व्हावा."

डायेट सभा.

पोपचा वकील मोठा मुत्सद्दी होता. पोपाच्या अधिकाराविषयीं पुष्कळ लोक आक्षेप घेत आहेत, अशा प्रसंगीं डायेटसभेच्या सूचनेप्रमाणें सभा भरविली असतां त्यापासून पोपाच्या अधिकारास कसा धक्का बसेल हें त्याच्या सहज लक्षांत आलें. यास्तव ल्यूथर याच्या थोतांड मताचा प्रसार बंद करण्याकरितां डायेटसभेनें सक्त उपाय योजावे, म्हणून त्यानें आपलें सर्व चातुर्य खर्च केलें. रोमच्या दरबारचा वकील केवळ आपल्या यजमानाचें हित इच्छित आहे; त्यास देशाची शांतता व प्रार्थनामंदिराचें पावित्र्य यांची कांहीं पर्वा नाहीं, असें पाहून डायेटसभेनें त्याच्या म्हणण्याकडे कांहींएक लक्ष न देतां रोमच्या दरबारचा प्रजेवर किती जुलूम आहे, त्याची एक यादी तयार केली. आपल्या दरबाराला घातक असा लेख आपण बरोबर घेऊन जावें हें उचित नाहीं, असें त्या वकिलास वाटल्यावरून त्यानें सभेची परवानगी घेतल्यावांचून नरन्बर्ग येथून तो चालता झाला.

पोप व लोक.

जर्मनींतील राजांनीं आपल्या प्रजेवरील पोपच्या जुलमाबद्दल जी यादी तयार केली होती तींत शेंकडों कलमें होतीं, आणि शेवटीं असें लिहिलें होतें कीं " पोपानें जर ह्या असह्य दुःखांपासून आमची मुक्तता केली नाहीं, तर आतां तीं सहन करावयाचीं नाहींत असा आम्हीं निश्चय केला आहे; आणि ईश्वरानें आम्हांस जी सत्ता आणि अधिकार दिला आहे त्याच्या बलानें आम्ही जुलमाचा प्रतिबंध करूं."

डायेट सभा.

ल्यूथर व त्याचे अनुयायी ह्यांच्यासंबंधानें डायेट सभेनें आपल्या शासनपत्रांत इतकाच हुकूम केला कीं, थोडे दिवसांत जी जनरल सभा भरणार आहे; तींत जो ठराव होईल, त्याची सर्व वर्गाच्या लोकांनीं शांतपणें वाट पहावी. आणि त्याच्या दरम्यान स्थापित धर्माच्या विरुद्ध कोणीही जाऊं नये अथवा भाषण करूं नये.

डायेट सभेच्या ठरावापासून तर ल्यूथर याच्या मतास फार बळकटी आली. (१) पोपाचें दरबार दुष्टाचरणानें अगदीं व्यापून टाकलें आहे. आणि धर्मोपदेशकांनीं लोकांवर जुलमी कर बसवून सगळें राष्ट्र अगदीं भिकेस लाविलें आहे असें सिद्ध झालें.

(२) पोपानें स्वतः आपल्या दरबारांतील दुष्टाचरणें कबूल केल्यामुळें ल्यूथर आणि त्याचे अनुयायी हे पोपाच्या दरबारावर मिथ्या दोषारोप केल्याच्या दोषापासून मुक्त झाले; आणि (३) जर्मनींतील लोकांवर धर्मोपदेशकांचा अतिशय जुलूम आहे हें याचें म्हणणें, जर्मनींतील राजे यांनीं यादी तयार केली यावरून खरें झालें.

गेमच्या दरबारांतील भ्रष्ट व कावेबाज लोकांस न्याय काय आहे याविषयीं विचार करण्याची तर नव्हे–पण फायदेशीर काय आहे याचा विचार करण्याची संवय जडली होती. यामुळें त्यांस पोपाचें वर्तन पोरकट, भोळेपणाचें व विलक्षण असमंजस-पणाचें वाटलें. आपल्या पूर्वजांचा मार्ग सोडून व ज्या गोष्टी पोपानें गुप्त ठेवावयाच्या होत्या, त्या त्यानें उघडपणें कबूल केल्या आणि पोपचा अधिकार लोकांस उपदेश व आज्ञा करण्याचा असतां तो विसरून त्यानें दुसऱ्याची सल्ला विचारली, हें दर-बारास आवडलें नाहीं. त्यास असें भय वाटलें कीं पोपाची ही अदूरदर्शी सरलता त्या अधिकारास व संपत्तीस घातक होईल. त्यासाठीं पोपाच्या दरबारी धर्मोपदेशकांत जे मुख्य होते त्यांनीं पोपास सुधारणा करण्याच्या कामांत अनेक अडथळे घातले. हें पाहून पोपाचा अधिकार स्वीकारल्या-बद्दल पाड्रियानास फार पश्चात्ताप झाला.

पोप व दरबार.

पोप सातवा क्लेमन्ट पाड्रियानासारखा पवित्र मताचा नव्हता. डायेट सभेच्या सूचनेप्रमाणें जनरल सभा भरविण्याविषयीं अनुमति देण्यास त्यानें चुकवाचुकव केली व पोपाच्या दरबारांतील दुष्टाचरणें दूर करण्याचा त्यानें प्रयत्नही केला नाहीं. त्यानें **क्यामूपपेगियो** नांवाचा मोठा कावे-बाज धर्मोपदेशक यास आपला वकील नेमिला; आणि त्यास पुनः **नरन्बर्ग** येथें डायेट सभा भरली होती तिजकडे पाठविला.

सातवा पोप.

ह्या वकिलानें वारमस् येथील सभेनें झालेला ठराव अमलांत आणण्याकरितां पराकाष्ठेचा प्रयत्न केला; व त्यास पांचव्या चार्लसच्या वकिलाचें पाठबळ मिळालें. परंतु डायेट सभेनें पूर्वी जो ठराव होता, त्यांत कांहीं फेरबदल केला नाहीं. क्यामूपपेगियो यानें जर्मनी सोडण्यापूर्वी लोकांचें अनु-रंजन व शांतवन करण्याकरितां हलक्या प्रतीच्या धर्मोपदेशकांमध्यें जीं दुराचरणें प्रच-लित होतीं, त्यांचा प्रतिबंध करण्याकरितां कांहीं कलमें प्रसिद्ध केलीं. परंतु ह्या पक्षपाती सुधारणुकीपासून लोकांचें मुळींच समाधान झालें नाहीं. ह्या वकिलानें दुष्टाचरणरूप विषवृक्षांच्या कांहीं शाखा आपल्या कोमल अंतःकरणानें आणि मृदुहस्तानें कापून टाकल्या. पण त्याचा कांहीं उपयोग नव्हता, कारण जर्मनींतील लोकांनीं त्या वृक्षाच्या मुळांवर घाव घातला होता; आणि तो समूळ लयास न्यावा अशी त्यांची इच्छा होती.

पोप व डायेट.

सन १५२६ सालांत जर्मनींतील कांहीं प्रान्ताच्या शेतकरी लोकांनीं मोठा दंगा केला. जमिनीचे मालक त्यांजपासून जबर सारा घेत असत, व त्यांजवर निराळे कर

बसवीत, यामुळें ते लोक अगदीं रंजीस आले होते. जमीन लागवड करण्याचा धंदा सोडून देऊन दुसरा धंदा करण्याचा असेल तर त्याबद्दल देखील जमिनीच्या मालकांस कांहीं नजराणा दिल्यावांचून त्या शेतकऱ्यांची सुटका होत नसे ! शेतकरी मरण पावला म्हणजे त्यास बक्षीस दिलेल्या जमिनीवर त्याच्या वारसाचा हक्क नव्हता व अशा प्रसंगीं देखील त्या मेलेल्या मनुष्यांच्या चांगल्या वस्तु व चांगलीं गुरेंही मालकानें खुशाल घेऊन जावीं, अशी शेतकरी लोकांस गुलामी अवस्था प्राप्त झाली होती. तीस त्रासून शेवटीं त्यांनीं आपल्या हातांत शस्त्रें घेतलीं. त्यांनीं धर्मोपदेशकांचे मठ लुटून फस्त केले, आणि आपल्या धन्याच्या जमिनी वैराण करून टाकिल्या. दुर्दैवानें मोठ्या कुळांतील जे लोक त्यांच्या हातीं सांपडले त्यांचे त्यांनीं निर्दयपणें प्राण घेतले. याप्रमाणें आपल्यावरील जुलमी लोकांस दहशत घालून ते आतां पुढें आपल्यावर जुलूम न होईल यासाठीं कोणते उपाय योजावे, याचा विचार करूं लागले. त्यांनीं एक अर्जी तयार करून ती प्रसिद्ध केली. त्यांत त्यांनीं आपलीं सर्व मागणीं लिहिलीं होतीं. त्यांतील मुख्य कलमें हीं होतीं कीं–(१) आम्हांला वाटेल तो गुरु निवडण्याची मोकळीक असावी. (२) धान्याखेरीज कोणत्याही वस्तूचा दहावा हिस्सा आपल्यापासून घेऊं नये. (३) आमच्या धन्यानें आम्हांस कोणत्याही प्रकारें आम्ही त्याचे गुलाम किंवा बंदे आहोंत असें समजून वागवूं नये. (४) शिकार करण्याची व मासे धरण्याची आम्हांस मोकळीक असावी. (५) मोठीं अरण्यें ही खाजगी मिळकत न समजतां त्यांचा सर्वांस उपयोग करण्याची मोकळीक असावी. (६) आम्हांवर जे जबर कर बसविले आहेत ते माफ करावे, आणि न्यायाची व्यवस्था चांगली करून त्यापासून त्रास व पक्षपात होऊं नये, असा बंदोबस्त करावा.

शेतकऱ्यांचा दंगा.

ह्या मागण्यांत पुष्कळ कलमें मान्य करण्याजोगीं होतीं, आणि लोकांच्या भयंकर समुदायाकडून ती मागणी झाली होती. यामुळें ती मान्य करणें भाग झालें; परंतु एकत्र झालेल्या लोकांत ऐक्य नसून त्यांचें आचरण शुद्ध नव्हतें, व अंगिकारलेलें काम शेवटास नेण्याचा त्यांच्यामध्यें दमही नव्हता. त्यांचे पुढारी अगदीं हलक्या वर्गांतले होते. त्यांस युद्ध कसें करावें हें माहीत नव्हतें, व आपला उद्देश सिद्धीस नेण्याकरितां कोणत्या साहित्याचें प्रयोजन आहे, याचें त्यांस ज्ञान नव्हतें. जर्मनींतील राजे यांनीं फौज एकत्र करून त्या बंडखोरांपैकीं वीस हजारांहून जास्त लोक मारून टाकून बाकीच्या लोकांस आपल्या घराची वाट धरण्यास लाविलें; एवंच, आतां आपली कधीं तरी दुःखांतून मुक्तता होईल अशी त्यांस आशाही राहिली नव्हती.

पहिल्यानें ह्या बंडाचा ज्या प्रांतांत उद्भव झाला, त्या प्रांतांत ल्यूथरच्या मताचा प्रसार झाला नव्हता. परंतु ज्या प्रांतांत ल्यूथरच्या मताचा प्रसार झाला होता, त्या प्रांतांत हळुहळू उन्मादानें प्रवेश केला. धर्मासारख्या अति–महत्त्वाच्या विषयाचा विचार करून उचित असेल त्याचा स्वीकार व अनुचित असेल त्याचा त्याग करण्याची लोकांस संवय

विचारस्वातंत्र्याचा परिणाम.

पडल्यामुळें राज्यकारभारासंबंधानेंही स्वतंत्रपणें विचार करण्याचा आपणांस अधिकार आहे, असें त्यांच्या मनांत भरलें. मॅजिस्ट्रेटच्या परवानगीवांचून आपण धर्मामध्यें जे दोष होते, ते दूर करून जर सुधारणा केली तर राज्यकारभारांतील दोष दूर करून त्यांजमध्यें सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्यास कांहींएक प्रत्यवाय नाहीं, असें त्यांस साहजिक वाटलें.

साक्सनीच्या राज्यांतील एका प्रान्तस्थांनीं ल्यूथरच्या मताचा अंगिकार केला होता. ल्यूथरचा शिष्य मनसर यानें त्यांचीं मनें इतकी आत्मवश करून ठेविलीं होतीं कीं, तो जें सांगेल तेंच खरें, असें मानण्यास लोक सिद्ध होते. त्यानें त्यांच्या मनांत असा एक युक्तिशून्य वाद भरवून दिला होता कीं त्यापासून लोकांनीं अतिशय दांडगेपणानें दंगा करण्यास प्रवृत्त व्हावें. तो त्यांस असे म्हणाला, " ल्यूथर यानें धर्मसंबंधानें जें कांहीं केलें त्यांत गुणापेक्षां दोष फार आहेत. त्याने प्रार्थनामंदिरें पोपाच्या जुलुमापासून मुक्त केलीं आहेत, ही गोष्ट खरी आहे, परंतु त्याचें मत व स्वतांचें आचरण फारच भ्रष्टकारक आहे. मनुष्यानें पापाचरण टाळण्याकरितां इंद्रियदमन करण्याचा सदा अभ्यास केला पाहिजे. त्यानें कधीं उल्हासवृत्तीनें राहतां कामा नये; म्हणजे सदा खिन्नवृत्तीनें रहावें, थोडें बोलावें, साधा पोषाख करावा आणि गंभीरवृत्ति असावें. अशा रीतीनें वर्तन केलें असतां त्यानें कोणत्या मार्गाचा अवलंब करावा, ह्याविषयीं ईश्वर त्यास आपली इच्छा कांहीं दृश्य साक्षात्कारानें कळवितो; पण प्रभूनें आपली इच्छा काय आहे हें कळविलें नाहीं तर त्यानें जीं वचनें दिलीं आहेत, त्यांचें त्यास स्मरण देऊन त्याची कानउघाडणी करण्याचा आपल्यास अधिकार आहे. हा आपला रोष आणि कानउघाडणी ईश्वरास पराकाष्ठेची ग्राह्य होईल, आणि ज्या वर्तनांत चूक नाहीं असें वर्तन करण्याविषयीं तो प्रेरणा करील. आपण मगरूरपणा करून त्यास असंतुष्ट करूं नये, याविषयीं आपल्यास फार सावध असलें पाहिजे. परंतु त्याच्या दृष्टीनें सर्व मनुष्यें समान आहोंत; त्यासाठीं आपण त्या सर्वांस समान स्थितींत आणून ठेवूं या; आणि जगांतील सर्व वस्तु ईश्वरानें सार्वजनिक उपयोगासाठीं केल्या आहेत, यास्तव कोणत्याही प्रकारचा भेद असल्यावांचून आपण सर्व बंधु या नात्यानें एकत्र राहूं या. "

समदृष्टाचा अतिरेक.

या बाष्कळ मतानें मनुष्यांच्या मनांत अनेक उलट्या इच्छा मात्र उत्पन्न केल्या; आणि त्यां त्यांच्या मनावर बळकट ठसल्याही. बडे लोकांची मात्र सत्ता कमी करण्याचा प्रयत्न करणें हें अगदीं तुच्छ काम आहे; व सर्वांस एका मालिकेंत आणावें, आणि सर्व संपत्ति एकत्र करवून तिचा सारख्या प्रमाणानें सर्वांनीं उपयोग

घ्यावा, अशा कल्पना प्रचलित झाल्या. मनसरनें लोकांस असें सांगितलें कीं आपला विचार ईश्वरास पसंत पडला, आणि त्याविषयीं त्यानें मला स्वप्नांत असें सांगितलें आहे कीं–या कामांत आपला जय होईल.

मनसर व अतिरेक.

शेतकरी लोकांनीं आपला विचार शेवटास नेण्यास सुरुवात केली आहे, सर्व नगराच्या मॅजिस्ट्रेटांस पदच्युत करून बडे लोकांच्या जमिनी त्यांनीं हिसकावून घेतल्या, आणि जे त्यांच्या हातीं सापडले त्यांस त्यांनीं आपल्याप्रमाणें पोषाक करण्यास भाग पाडलें, व अतिशय हलक्या प्रतीच्या वर्गांतील लोकांस नांवें देण्याची चाल होती त्या नांवानें त्यांस ते हांका मारूं लागले. ह्या अन्यायी कर्मांत पुष्कळ लोक गुंतले होते. परंतु त्यांचा पुढारी मनसर हा अगदीं बेवकूब मनुष्य होता. त्यास अशा समयीं कसें वर्तन करावें, याचें ज्ञान नव्हतें. तो पराकाष्ठेचा भित्राही होता. लढाई करण्याविषयीं त्याचें मन वळविणें मोठें कठीण होतें. एके प्रसंगीं त्यानें साक्सनींतील आठ हजार लोक एकत्र जमविले होते. म्हणून तेथील राजा व दुसरे ड्यूक यांनीं त्यास वेढा घातला. तथापि या दयाळू राजाच्या मनांत आपल्या हुराळलेल्या प्रजेचा रक्तस्राव करावयाचा नव्हता, सबब त्यांनीं एक सद्गृहस्थ शिष्टाई करण्यास पाठविला. तो अशा शर्तीनें कीं, ' जर त्यांनीं तत्काळ आपलीं शस्त्रें खालीं ठेविलीं; आणि बंडाचा उत्पादक आमच्या स्वाधीन केला, तर सर्वांस त्यांच्या अपराधाबद्दल क्षमा केली जाईल. ' मनसर यास मोठें भय व धास्ती उत्पन्न झाली. त्यानें आपल्या अनुयायांस असा उपदेश केला कीं—' तुम्ही या जुलुमी राजांच्या वचनावर विश्वास ठेवून ईश्वराचा आणि धर्मसंबंधीं स्वातंत्र्याचा त्याग करूं नका.' परंतु ओढवलेलें संकट इतकें जबर होतें कीं, मनसर याच्या वाक्पटुत्वापासून लोकांच्या मनांवर जसा ठसा उठावा तसा उठला नाहीं; आणि प्रत्येक मनुष्याच्या मुखश्रीवर ग्लानि येऊन ते सर्वजण अगदींच भयत्रस्त झाले. अशा प्रसंगीं यदृच्छेंकरून आकाशांत एक इंद्रधनुष्य दृश्य झालें. बंडखोर लोकांच्या बाहुस्यावर तेंच चिन्ह पाहून मनसर यानें मोठ्या चातुर्यानें एका उंच ठिकाणीं लोकांस नेलें आणि तें इंद्रधनुष्य दाखवून गंभीर वाणीनें तो लोकांस म्हणाला, " पहा, तें ईश्वरकृत चिन्ह ही तुमच्या सुरक्षितपणाची जामीनगिरी असून दुष्टांच्या नाशाची निशाणी आहे. " उन्मादानें वेडे झालेल्या लोकांनीं एकदम जयजयकार केला; आणि आपला जय खचित आहे असें मानून त्यांनीं त्या दुर्दैवी वकिलाचा वध केला. आणि ते युद्ध करण्यास सिद्ध झाले. राजास त्या लोकांचा हा अतिक्रम पाहून फार राग आला. त्यांनीं लढाईमध्यें पांच हजार लोक मारून टाकले, आणि दुसरे दिवशीं मनसर यास पकडून त्याचा शिरच्छेद केला.

ह्या प्रसंगीं ल्यूथर याचें वर्तन फार शहाणपणाचें आणि शांतपणाचें होतें. त्यानें दोन्ही पक्षांकडे सारखा भाव ठेविला होता; दोन्ही पक्षांच्या कल्याणाची त्यास इच्छा होती. राजे लोकांस त्यानें असा उपदेश केला कीं, 'तुम्हीं आपल्या आश्रयाखालच्या लोकांबरोबर विशेष दयेची व क्षमेची

ल्यूथर व बंड.

वागणूक करावी. ' शेतकरी लोकांस त्यानें त्यांच्या दुष्टाचरणाबद्दल मोठा टपका
दिला, व ' तुम्हीं ज्या स्थितींत आहांत, त्या स्थितीला जे कष्ट सोसणें भाग आहेत,
त्यांविषयीं तुम्ही कांहीं कुरकुर करूं नये; आणि कायदेशीर उपायाशिवाय दाद
मागण्यासाठीं तुम्हीं दुसरें कांहीं करूं नये. ' असें त्यांस सांगितलें.

त्या वर्षी म्हणजे १५२६ त ल्यूथरनें एका प्रसिद्ध घराण्यांतील कन्येबरोबर लग्न
केलें. ही बाई पूर्वी विरक्त होऊन बैरागीण झाली होती. परंतु
लग्न. तो कृत्रिम वेष टाकून तिनें ल्यूथर याजबरोबर लग्न केलें.
ल्यूथरच्या परम निःसीम भक्तांनीं देखील हें त्याचें वर्तन असभ्य मानिलें. कारण कीं,
त्या वेळेस त्याच्या देशावर अनेक संकटें ओढवलीं होतीं, आणि त्याचे शत्रु तर
त्यास अति निंद्य व्यभिचारी म्हणण्यासही चुकले नाहींत. लोकांच्या मनावर असा
ठसा उमटल्यामुळें त्यांत आपलें किती अहित आहे, हें त्यास कळलें होतें; परंतु त्यानें
आपलें वर्तन शुद्ध मानून आपल्या मित्रांचा टपका व शत्रूंची निंदा मोठ्या धैर्यानें
सहन केलीं.

पोप आणि जर्मनीचा बादशहा चार्लस यांजमधील बेबनाव ल्यूथरच्या मताचा
प्रसार होण्यास फार अनुकूल झाला. क्लेमेन्ट याच्या वर्तनानें
पोप व बादशहा. चार्लस फार रागावला होता व पोपानें त्याजविरुद्ध जो कट केला
होता, तो निष्फल करण्याच्या कामांत तो इतका निमग्न झाला होता, कीं, नव्या
मताचा प्रसार करण्याचा त्यास अवकाश नव्हता, व त्याच्या मनांतही नव्हतें.

इटाली देशांतील राजकीय कामें संपल्यावर चार्लस जर्मनींत येण्याच्या तया-
रीस लागला. त्या देशांत त्याच्या आगमनाची फार जरूर होती; आणि रोमन
क्यॅथोलिक व नूतन मतानुयायी हे त्यास समान औत्सुक्यानें पाचारण करीत होते.
सन १५२६ त स्पायरस येथें जर्मनींतील राजे यांची सभा भरली, तेव्हां धर्माची
स्थिति काय आहे, याविषयीं विचार झाला. चार्लस यानें सर्व राजांस असें सांगितलें
कीं ' एक सर्वसामान्य सभा भरविण्याविषयीं मीं पोपास लिहून सांगितलें आहे. त्या
सभेंत काय होतें याची वाट पाहून तोंपर्यंत प्राचीन धर्मांत कांहीं फेरफार करूं नये. '
धर्ममंदिरांतील दोष दूर करण्याकरितां जनरल सभा भरविणें हा उपाय योग्य
आहे, हें राजेलोकांनीं कबूल केलें. परंतु त्यांनीं अशी तक्रार केली कीं--
जर्मनी देशांतील राष्ट्राची सभा युरोपांतील सर्व राष्ट्रांच्या सभेपेक्षां धर्मसंबंधीं विचार
करण्यास जास्त योग्य आहे. चार्लस यानें केलेल्या उपदेशाकडे राजे यांनीं इतकें
दुर्लक्ष केलें कीं स्पायरस येथें सभेचें काम चालूं असतां, नूतन मतानुयायी राजां-
बरोबर जे धर्मोपदेशक आले होते, त्यांनीं उघडपणें लोकांस नव्या मताचा उपदेश

करून त्या मताप्रमाणें धर्मसंबंधीं संस्कारही केले. पोपाचा अधिकार तुच्छ मानण्यास जर्मन लोकांस चार्लस यानें स्वतःच कित्ता घालून दिला होता. चार्लस पोपावर रागावला होता. पोपानें आपलें वर्तन रास्त आहे, असें प्रतिपादन करण्याकरितां एक संक्षिप्त लेख लिहिला होता, त्याजवर चार्लसनें एक विस्तृत उत्तर लिहून प्रसिद्ध केलें. त्या लेखांत पोपच्या कृतघ्नपणाचीं, निमकहरामपणाचीं, कपटाचीं, दगलबाजीचीं, आणि महत्वाकांक्षेचीं, अनेक उदाहरणें दाखवून त्याबद्दलचा निवाडा जनरल सभेपुढें व्हावा, असें सुचविलें होतें. त्याच वेळीं त्यानें मुख्य धर्माध्यक्षाचें एक विद्यालय होतें, त्या विद्यालयांतील धर्माधिकारी यांस एक पत्र लिहिलें. त्यांत पोपाच्या अन्यायाचीं, व पक्षपाताच्या संबंधाचीं कांहीं उदाहरणें दाखवून त्यास अशी विनंति केली होती कीं, पोपानें जनरल सभा भरविण्याचें नाकबूल केलें, किंवा लांबणीवर टाकिलें, तर तुम्हीं आपल्या नांवानें ती सभा भरवून मुख्य आचार्यांनें जरी धर्माचा अनादर केला आहे, तरी आम्हांस त्याविषयीं काळजी आहे, असें लोकांस कळूं द्या.' निर्भर्त्सना आणि कडकपणा यांजमध्यें चार्लस याचा हा लेख ल्यूथर याच्या लेखास हार जाईल असा नव्हता. सगळ्या जर्मनींत त्याच्या मताचा प्रसार झाला, आणि प्रत्येक वर्गाच्या लोकांनीं तो मोठ्या उत्सुकतेनें वाचला; व नव्या मताच्या विरुद्ध चार्लसनें जें कांहीं म्हटलें होतें, तें सगळें खोटें आहे, असें त्याच्याच या लेखानें सिद्ध झालें.

पोप व चार्लस.

पोप आणि चालस यांचें पुनः सख्य झाल्यावर चार्लस यानें धर्मसंबंधीं विचार करण्याकरितां स्पायरस येथें सन १५२९ मध्यें डायेट सभा भरविली. सन १५२६ मध्यें ही सभा भरली होती, तेव्हां ल्यूथरच्या मताला उत्तेजन दिल्यासारखा ठराव झाल्यामुळें युरोपांतील ख्रिस्तधर्मानुयायी राष्ट्रें यांस फार संताप आला होता. तथापि ल्यूथरच्या मताचा प्रतिबंध करण्याकरितां कडक उपायांची योजना करतांना फार दूरवर विचार करण्याचा समय प्राप्त झाला होता.

वादविवाद व लोकमत.

मध्यें कांहीं व्यवधान आल्यावांचून अथवा उत्साहभंग झाल्यावांचून एकसारखीं बारा वर्षें वादविवाद चालूं असल्यामुळें मनुष्यांचीं मनें अगदीं व्यग्र होऊन राहिलीं होतीं, तीं आतां विशेष व्यग्र होऊन संतप्त झालीं. नव्या मतांवर त्यांची श्रद्धा बसली होती. आणि आपल्यांतील धीट लोकांचा सर्वांनीं उत्कर्ष पाहिला होता. ईश्वरोपासनेसंबंधीं जुन्या विधानांचा त्यांनीं नुसता त्यागच केला नव्हता, तर त्या विधानांच्या जागीं नवीं विधानें स्थापित केलीं होतीं; व त्याग केलेल्या मताविषयीं त्यांचा तिटकारा आणि अंगिकृत मताविषयीं त्यांची अनुरक्तता अगदीं समान होती. पुष्कळ वर्षेंपर्यंत वाद चालला होता, तरी ल्यूथर याचा शोधक व्यवसाय किंचित् देखील कमी झाला नव्हता. रोमन

कॅथोलिक मतांतील दोष आणि धर्मोपदेशकांचीं दुराचरणें बाहेर आणण्याचा त्याचा क्रम एकसारखा चालू होता. त्याच्या शिष्यांपैकीं पुष्कळांस त्याजसारखी कळकळ असून विद्येंत तर ते त्यास मागें सारतील असे होते; आणि वादविवाद चालविण्याविषयीं मोठे पटाईत बनून गेले होते. धर्मसंबंधानें पुष्कळ वर्षें 'भवति न भवति' होत गेल्यामुळें व दोन्ही पक्षांकडील साधकबाधक कारणें ऐकण्यांत आल्यामुळें गृहस्थाश्रमी लोकांतील पुष्कळ लोक व कांहीं राजे परमार्थज्ञानविषयक वादांत इतके प्रवीण झाले होते कीं, त्यासंबंधानें कोणताही प्रश्न त्यांजपुढें आला असतां, त्याचा मोठ्या चातुर्यानें ते निवाडा करीत असत. ह्या घडून आलेल्या गोष्टींवरून असें स्पष्ट दिसत होतें कीं, डायेट सभेनें एकादा जुलमी ठराव केला असतां, सर्व जर्मन देशांत एकदम घोंटाळा होऊन धर्मसंबंधानें युद्धावर गोष्ट आल्यावांचून कधीं रहाणार नाहीं. पुष्कळ वादविवाद झाल्यानंतर सरतेशेवटीं सभेनें असा ठराव केला कीं, वारमस येथील सभेंत ल्यूथरच्या संबंधानें जो ठराव झाला आहे, तो सर्वांनीं मान्य करून अमलांत आणावा, व प्राचीनकालपासून चालत आलेल्या धर्मांत, जनरल सभा भरवून तींत जो कांहीं ठराव होईल त्यापूर्वीं, कोणत्याही प्रकारें फेरफार होऊं नये.

सॅक्सनीचा राजा व दुसरे देशाधिपती यांनीं तो ठराव अन्यायाचा व अपवित्र म्हणून साफ नाकबूल केला. त्याकारणानें प्रॉटेस्टंटस् या

प्रॉटेस्टंटस्.

नांवानें ते प्रसिद्धीस आले, तेव्हांपासून पोपाच्या या अनुशासनाचा त्याग करून जे संप्रदाय प्रचारांत आले, त्या सर्वांस अविचारानें प्रॉटेस्टंटस् असें म्हणूं लागले. हे प्रॉटेस्टंटस् डायेट सभेचा ठराव नाकबूल करून उगीच राहिले नाहींत; त्यांनीं बादशहास आपलीं दुःखें निवेदन करण्याकरितां आपले वकील पाठविले; परंतु चार्लस यानें त्यांचा जो सत्कार केला, त्यावरूनच तो त्यांस प्रतिकूल आहे, असें दिसून आलें. त्या काळीं चार्लसाचें पोप याजबरोबर दृढ सख्य झालें होतें, आणि पोपाच्या हिताविषयीं त्यास फार कळकळ होती.

जर्मनींत पाखंडमताचा प्रसार होत चालला आहे, त्याचा प्रतिबंध करण्याकरितां आपण कोणते उपाय योजावे, याविषयीं चार्लस व पोप विचार करीत होते. पोपाचें मत असें होतें कीं, जनरल सभा भरवून तिजमध्यें धर्मसंबंधीं विचार करणें हें कांहीं उचित नाहीं. कारण कीं अशा प्रकारच्या सभेंत वितंडवाद फार होतात; तीस नसता अभिमान फार असतो; आणि ती राजाच्या अधिकाराला बाधक असून तिचें काम फार दीर्घसूत्री असतें. पोप म्हणाला कीं, 'अनुभवावरून आपल्यास कळून आलें आहे कीं, आपण आजपर्यंत क्षमा केली ती चूक केली. यासाठीं आतां सक्त उपायांची योजना केली पाहिजे. पोप लिओ ह्यानें ल्यूथर यास बहिष्कृत करण्याचें शासन केलें आहे, तें व डायेट सभेनें जो ठराव केला आहे तो, आतां तात्काळ अमलांत आणला पाहिजे; आणि ज्यांनीं पोपाच्या अधिकाराचा व राजसत्तेचा अति-

क्रम केला आहे, त्यांस चार्लस यानें आपलें सर्व सामर्थ्य खर्च करून ताब्यावर आणलें पाहिजे." चार्लस याचे विचार पोपाच्या विचाराहून फार निराळे होते. नव्या मताचा लोकांच्या मनांवर कसा ग्रह झाला आहे, आणि एकदम जुलमी उपायांची योजना केली असतां कोणच्या थरावर गोष्ट जाईल, हें तो जाणत होता. 'जनरल सभा भरवून उपस्थित झालेल्या वादाचा निवाडा करावा, हाच काय तो उत्तम मार्ग आहे,' असें त्यानें पोप यास सांगितलें, आणि असें वचन दिलें कीं 'या सौम्य उपायांपासून जर इच्छित हेतु तडीस गेला नाहीं तर रोमन कॅथोलिक मताच्या दुराग्रही शत्रूंची खोड मोडून त्यांस पोपाच्या आज्ञा पाळण्यास भाग पाडण्याचा मी प्रयत्न करीन.'

चार्लस जर्मन देशांत येण्यास निघाला तेव्हां सदरहूप्रमाणें त्याचे विचार होते. ऑग्सबर्ग येथें डायेट सभा भरविण्यास त्यानें पूर्वींच हुकूम केला होता. त्या शहराकडे तो जात असतां धर्मसंबंधानें लोकांच्या मनांवर ग्रह कसा झाला आहे, हें त्याच्या लक्षांत आलें; आणि त्याची अशी खातरजमा झाली कीं, दुसरे उपाय अगदीं निष्फळ झाल्यावांचून सक्त उपाय योजण्याची सोय राहिली नाहीं. ऑग्सबर्ग शहरांत त्यानें मोठ्या थाटमाटानें प्रवेश केला. त्या सभेपुढें ज्या विषयाचा विचार व्हावयाचा होता, त्याच्या महत्वास आणि आपण जीं महत्कृत्यें करून यश मिळविलें आहे, त्याविषयीं आपला सत्कार करण्यास योग्य असा डायेट सभेच्या सभासदांचा ऑग्सबर्ग येथें जमलेला मोठा समुदाय पाहून चार्लस यास फार मोठा आनंद झाला. पोपनें बहिष्कृत केलेल्या मनुष्यास आपल्या समोर आणल्याबद्दल बादशहास राग येईल म्हणून सॅक्सनीच्या राजानें ल्यूथर यास आपल्याबरोबर ऑग्सबर्ग येथें नेलें नाहीं; आणि बादशहाच्या इच्छेस अनुसरून प्रॉटेस्टंटस् राजे ह्यांनीं आपल्याबरोबरच्या धर्मोपदेशकांस ऑग्सबर्ग येथें लोकांस धर्मोपदेश करण्याची मनाई केली होती. नूतनमतानुयायी मंडळींत ल्यूथरचा शिष्य मिल्यांकथन हा विद्वान् असून पराकाष्ठेचा शांत स्वभावाचा होता, त्यास त्यानें आपली ज्या मतावर श्रद्धा बसली होती तिच्या सत्याचा लोप करूं नये व रोमन कॅथोलिक मतानुयायी लोकांस त्याविषयीं क्रोध येऊं नये, असा एक लेख सभेपुढें सादर करण्याकरितां तयार करण्यास सांगितलें. मिल्यांकथन यानें वादविवादात्मक लेखांत देखील कधीं दुसऱ्याच्या मनास टोंचणारा शब्दप्रयोग करून आपल्या लेखणीचें अग्र विटाळलें नव्हतें. त्यानें तो लेख मोठ्या चातुर्यानें व आपल्या शांत स्वभावानुरूप असा तयार केला. तो लेख उघडपणें डायेट सभेपुढें वाचला गेला; आणि रोमन क्याथोलिक मतानुयायीं धर्माधिकारी व मिल्यांकथन आणि त्याचे सोबती यांजमध्यें पुष्कळ वादविवाद झाला. मिल्यांकथन यानें जरी आपल्या लेखांत कांहीं कलमांचा जोर कमी केला, व कांहीं कलमें अजिबात काढून टाकलीं, आणि बाकीच्या कलमांचा अर्थ अगदीं कमी

बाधक असा केला, व चार्लस यानेंही दोन्ही पक्षांमध्यें एकवाक्यता होऊन तंटा मिटावा म्हणून पुष्कळ प्रयत्न केला; तथापि अशा कांहीं अडचणी अवशिष्ट राहिल्या कीं, त्यांचें निवारण करून दोन्ही पक्षांमध्यें ऐक्य करणें हें सर्वथैव अशक्य असें दिसून आलें.

धर्मोपदेशकांमध्यें आपला प्रयत्न निष्फळ झाला हें पाहून चार्लस हा ल्यूथर याचे पुरस्कर्ते राजे यांचें मन वळविण्याचा प्रयत्न करूं लागला. ते राजे सलोखा व्हावा अशी जरी इच्छा करीत होते, तरी स्वीकारलेल्या मतांचा त्याग न करण्याविषयीं त्यांचा निश्चय पराकाष्ठेचा दृढ झाला होता. पुष्कळ काळपर्यंत अज्ञानावस्थेंत काळ काढल्यानंतर सत्य म्हणजे काय हें पहिल्यानेंच मनुष्यास कळतें, आणि त्याविषयीं स्वतंत्र विचार करण्याची त्यास पहिल्यानेंच सवड मिळते, तेव्हां मनुष्यास उत्तेजन येऊन धर्माविषयीं त्यांचीं मनें किती अनुरक्त असतात, हें ज्या काळांत ते मनोधर्म पुष्कळ अंशीं विराम पावले असतात, त्या काळांतील लोकांस समजणें फार कठीण आहे. राजे लोकांचा प्रधान हेतु काय तो राज्यसंबंधीं जितकें हित साधेल तितकें साधून घेण्याचा असतो, परंतु सॅक्सनीचा राजा व दुसरे देशाधिपती यांस अंगीकृत मतांविषयीं इतकी कळकळ होती कीं, त्यांनीं राजकीय हिताचीही पर्वा केली नाहीं. चार्लस यानें त्यांस वेगवेगळ्या विनंत्या केल्या, व ज्या हितांची ते मोठ्या उत्सुकतेनें अपेक्षा करीत होते, त्यांविषयीं त्यांस अभिवचनें दिलीं, पण सर्व व्यर्थ ! त्यांनीं त्यास एकच उत्तर दिलें, कीं क्षणिक सुखाकरितां अक्षय सुखाचा त्याग करून तुमच्या म्हणण्यास आम्हीं अनुसरण्यास तयार होणार नाहीं.

ल्यूथरचे आश्रयदाते एकनिष्ठ राहतात.

प्रॉटेस्टंटस् पक्षांतील लोकांस अनुकूल करून घेण्यास किंवा त्यांमध्यें विरोध उत्पन्न करून फाटाफूट पाडण्याकरितां केलेले सर्व प्रयत्न जेव्हां निष्फळ झाले, तेव्हां प्राचीन मत व पोपाचा अधिकार स्थापित करण्याकरितां जबरीचे उपाय योजिले पाहिजेत, या पल्ल्यावर गोष्ट येऊन ठेपली. पोपाचा वकील 'दुराग्रही पाखंडमतानुयायी लोकांवर जुलूम केल्यावांचून ते वठणीस येणार नाहींत ' अशी नेहमीं विनंति करीत होता. डायेट सभेनें त्याची विनंति मान्य करून असा हुकूम केला कीं, प्रॉटेस्टंटस् यांनीं ज्या मताचा स्वीकार केला आहे, तें अगदीं निर्मूल आहे, यास्तव त्याचा कोणींही अंगिकार करूं नये, आणि प्राचीन संप्रदायाप्रमाणें ईश्वराची उपासना करीत जावी. सभेनें सर्व वर्गाच्या लोकांस असा हुकूम केला कीं, ' तुम्हीं आपलें अंगबळ व (द्रव्यबळ) संपत्ति खर्च करून सभेनें केलेला हुकूम अमलांत आणवा,' आणि आणखी असा हुकूम केला कीं, डायेट सभेचा ठराव जे नाकबूल करतील ते आजपासून बादशहाच्या न्यायसभेंत न्यायाधीश ह्या नात्यानें बसण्यायोग्य होणार नाहींत. डायेटसभेनें केलेल्या सक्त हुकुमाप्रमाणें आतां

डायेटचा ठराव.

आपणावर मोठा बिकट प्रसंग गुदरेल असें प्रॉटेस्टंटस् यांस वाटून ते अगदीं गर्भगळित होऊन गेले. मिल्यांकथन हा स्वभावाचा भित्रा होता. धर्मसंबंधानें आजपर्यंत केलेले सर्व श्रम व्यर्थ गेले असें मानून तो औदासीन्य व शोकाचें भक्ष होऊन बसला. परंतु डायेटसभेचें काम चालूं असतां, ल्यूथरनें कित्येक निबंध लिहून नवीन मतांस एकनिष्ठ राहण्याविषयीं लोकांस उत्तेजन दिलें, त्याचा ह्या वेळेस फार उपयोग झाला; आणि नव्या संकटाबद्दल तर त्यास कांहींच भय वाटलें नाहीं, किंवा त्याची मनोवृत्ति उद्विग्न झाली नाहीं. मिल्यांकथन व दुसरेही विगतोत्साह व नष्टधैर्य शिष्यांचें समाधान करून व त्यांस धैर्य देऊन ल्यूथर यानें राजे यांस असा उपदेश केला कीं, ' तुम्हीं प्रशंसेस पात्र अशा मनोत्साहानें व धैर्यानें सत्य धर्म कोणता, याचा अगोदर विचार करून तुमची खातरजमा झाल्यावर तुम्हीं ज्या मताचा अंगिकार केला आहे, त्याचा ऐहिक सुखासाठीं त्याग करणें, हें कांहीं तुमच्या योग्यतेस व शहाणपणास उचित नाहीं. ' या उपदेशापासून ल्यूथर याचा इच्छित मनोरथ सिद्धीस गेला. रोमन कॅथोलिक मतानुयायी राजे यांनीं प्राचीन धर्म सुरक्षित ठेविण्याकरितां आपल्यामध्यें ऐक्य केलें होतें; आणि बादशहा त्या पक्षाकडे होता तरी, त्याची कांहींएक पर्वा न ठेवितां, प्रॉटेस्टंटस् राजे यांनीं आपल्या बचावाकरितां, व त्यांनीं ज्या मताचा अंगिकार केला होता. तें मत कायम राखून, त्याचा विशेष प्रसार करण्याकरितां आपल्यांमध्येंही ऐक्य केलें; आणि आपणास जो कोणी उपद्रव देईल, त्याचें सर्वांनीं मिळून पारिपत्य करावें, असा ठराव केला. या कटाचा परिणाम असा झाला कीं, प्रॉटेस्टंटस् राजे यांच्या अनेक संस्थानांत ऐक्य होऊन संप्रदायशुद्ध असें एक प्रॉटेस्टंटस् राष्ट्र बनलें, व फ्रान्सचा राजा फ्रॅन्सीस व इंग्लंडचा राजा हेनरी यांनीं आपल्यास साहाय्य करावें, अशी विनंति करण्याचा त्यांनीं निश्चय केला.

ल्यूथरचे पक्षाभिमानी.

धर्मसंबंध न दाखवितां दुसरें निमित्त पुढें करून परकीय राजांची मदत मागण्याची त्यांस सवड पाहिजे होती, तीही त्यांस सांपडली. चार्लस याचें जसजसें सत्ता आणि वैभव वाढत चालल, तसतशी त्याची महत्वाकांक्षाही अमर्याद वाढत चालली. आपल्या घराण्यांत बादशाही अधिकार नेहमीं असावा, यासाठीं त्यानें एक युक्ति योजिली. त्याच्या हेतुसिद्धीस तो समयही अनुकूल होता. त्याचा चहूंकडे विजय झाला होता; आणि सर्व यूरोपखंड तो आपल्या सूत्रानें नाचवीत होता. त्याची बरोबरी करील, असा कोणी शत्रु त्यास उरला नव्हता; आणि बादशहाची निवड करण्याचा ज्यांकडे अधिकार होता, ते राजे त्याच्या तेजापुढें अगदीं विगतप्रभ झाले होते. तो म्हणालाः— " माझ्या दुसऱ्या राज्याचा राज्यकारभार चालविण्याकरितां मला नेहमीं गैरहजर रहावें लागतें; आणि धर्मसंबंधानें जर्मनीमध्यें आपसांत फूट पडली

चार्लसचे डावपेंच.

असून टर्कीचा बादशहा जर्मनीवर स्वाऱ्या करण्याचें नेहमीं भय घालीत आहे. यास्तव देशांत शांतता आणि समाधान राखून शत्रूंचा पराभव करण्यास योग्य अशा सदसद्द्वर्शी आणि शूर राजाच्या विद्यमानतेची जर्मनीमध्यें नेहमीं जरूर आहे. माझा भाऊ फर्डिनांड नेहमीं जर्मनींत राहतो, यामुळें त्यास त्या देशाची राज्यव्यवस्था, लोकांच्या रीतिभाति आणि स्वभाव यांची पूर्ण माहिती झाली आहे. कोणत्या उपायाची योजना केली असतां, इच्छित हेतु सिद्धीस जातील, आणि त्या उपायांचा विनियोग कसा करावा, याविषयीं त्यास चांगलें कळतें; आणि त्याचा मुलूख टर्कीचे सरहद्दीवर आल्यामुळें त्या ख्रिस्तधर्मनिंदक लोकांच्या स्वाऱ्यांपासून जर्मन देशाचा तो स्वाभाविक संरक्षक बनला आहे. यासाठीं तुम्हीं त्यास राजा निवडावा म्हणजे सर्व संकटें दूर होतील, " असा चार्लसानें जर्मनींतील राजे यांस मंत्र सांगितला. हीच चार्लसची युक्ति होय.

फर्डिनंड इटलीचा राजा झाला.

चार्लस यानें साधकबाधक कारणें सांगितलीं, त्यांपासून प्रॉटेस्टंटस् यांच्या मनावर किंचित् देखील ठसा उठला नाहीं. अनुभवावरून त्यांस असें समजून आलें होतें कीं, मॅक्सामिलन मरण पावल्यानंतर मध्यें जो अराजक काळ गेल्यामुळें व चार्लस याच्या अविद्यमानतेमुळें (गैरहजिरी) जी अव्यवस्था झाली आहे, तींत आमच्या मताच्या प्रसारानें कांहीं जास्त भर पडली नाहीं. राज्यकारभाराच्या शैथिल्यापासून त्यांस जे लोक लीन झाले होते, ते त्यांच्या लक्षानें पूर्णपणें वागत होते. यामुळें नेहमीं हजर असणारा नवा राजा आणि सुव्यवस्थित राज्यकारभार ह्या गोष्टी त्यांस इष्ट नव्हत्या. यास्तव फर्डिनंड यास रोमचा राजा निवडूं नये म्हणून त्यांनीं पराकाष्ठा केली, व सॅक्सनीचा राजा यानें त्या सभेंत जाण्याचें नाकबूल करून आपल्या मुलास पाठवून त्या निवडणुकींत हरकत केली असतां, दुसरे इलेक्टर यांनीं फर्डिनंड यास रोमचा राजा निवडून त्यास राज्याभिषेक केला.

प्रॉटेस्टंटस् व इंग्लंड आणि फ्रान्स.

प्रॉटेस्टंटस् यांनीं हें वर्तमान ऐकून फ्रान्स आणि इंग्लंड येथें बोलणें करण्याकरितां लागलींच आपले वकील पाठविले. फ्रॅन्सीस यास चार्लस याचा उत्कर्ष असह्य झाला होता. परंतु नवी लढाई उभी करून आपलें राष्ट्र संकटांत टाकण्याचा तो समय नव्हता. कारण विलक्षण प्रकारचीं साहसी कृत्यें केल्यामुळें तें राष्ट्र अगदीं जेरीस आलें होतें; आणि पराजयानें त्याचें धैर्य अगदीं खचलें होतें. यामुळें पूर्वींच्या दुर्दैवाचें विस्मरण होऊन व नवें बळ आल्यावांचून फ्रॅन्सीस यास लढाई उत्पन्न करतां येत नव्हती. दुसरे, चार्लस यांजकडून कांहीं अतिक्रम झाल्यावांचून फ्रॅन्सीस यानें आपण जो तह केला होता, तो सगळ्या यूरोपांत आपली अब्रू आणि इमानीपणा गमाविल्यावांचून त्यास मोडतां येत नव्हता. तथापि, त्यानें प्रॉटेस्टंटस् यांचें म्हणणें मोठ्या उत्सुकतेनें ऐकिलें, आणि

जर्मनीमध्यें आपसांत जबरदस्त कलह माजला आहे, हें ऐकून त्यांस फार हर्ष झाला. धर्मसंबंधानें त्यांच्या मतास आपली अनुकूलता आहे, असें न दाखवितां राजकीय संबंधानें जर्मनींतील राजांमध्यें जें वैमनस्य होतें, तें वृद्धिंगत करून वैराग्नि जास्त पेटविण्याचा त्यानें निश्चय केला. यासाठीं त्यानें वुइल्यम् दि होली यास जर्मनींत पाठविलें. त्या कालीं सगळ्या फ्रान्सांत हा मुत्सद्दी मोठा संधिविग्रहकुशल होता. त्यानें चार्लस याजवर असंतुष्ट झालेल्या राजांच्या भेटी घेऊन, त्यांजबरोबर आपल्या यजमानाचा सख्यसंबंध जोडला.

पोप व इंग्लंड. पोपानें चार्लस याच्या अनुवृत्तीनें इंग्लंडच्या राजाचा विवाहसंबंध मोडण्याचें काम लांबणीवर टाकल्यामुळें तोही चार्लसवर फार रागावला होता; आणि त्याच्याविरुद्ध कट करण्यास तो फ्रॅन्सीस याजपेक्षां कमी उत्सुक नव्हता; परंतु त्यास पोप याजपासून आपल्या बायकोबद्दल सोडचिठ्ठी मिळवावयाची होती, सबब त्याला पोप यास उघडपणें प्रतिकूल होतां येईना. जर्मनींतील राजांस द्रव्याचें साहाय्य करण्याविषयीं मात्र त्यानें अभिवचन दिलें.

चार्लसच्या अडचणी. याप्रमाणें प्राटेस्टंटस् यांचे प्रयत्न सफल झालेले पाहून पोप याच्या सांगण्यावरून पाखंडमताचें समूलोत्पाटन करण्याकरितां जुलमी उपायांची योजना केली, ही आपण चूक केली, असें चार्लस याच्या तत्काळ लक्षांत आलें. आपसांत कलह माजवून जर्मनीमध्यें दुफळी करण्याचा तो समय नव्हता. शत्रूचा पराभव करण्यापुरतें प्राटेस्टंटस् ह्यांच्या अंगीं सामर्थ्य प्राप्त झाल्यावर डायेट सभेनें केलेले ठराव त्यांनीं तुच्छ मानिले होते. फ्रान्सच्या राजाबरोबर केलेला चार्लसचा तह अगदीं अशाश्वत होता. अस्थिरमनस्क आणि स्वार्थी पोप भरंवसा ठेवण्यास पात्र नव्हता; आणि इकडे टर्कीचा सुलतान ऑस्ट्रिया देशावर स्वारी करण्याकरितां कडेकोट तयारी करीत होता. याप्रमाणें चार्लस चोहोंकडून कचाट्यांत सांपडल्यामुळें त्यास आपल्यावर असंतुष्ट झालेल्या राजांबरोबर संधि करणें भाग पडलें. तहाविषयीं त्यानें बोलणें लाविल्यावर वादविवादांत पुष्कळ वेळ जाऊन सरतेशेवटीं तहनामा झाला; आणि तो न्याटिसबोन येथें डायेट सभा भरली होती तिनें मंजूर केला.'जनरल सभा भरेपर्यंत धर्मसंबंधानें कोणास कांहीं उपद्रव होऊं नये, प्राटेस्टंटस् यांचे विरुद्ध जे ठराव झाले आहेत, ते अमलांत आणण्याचें तहकूब ठेवावे, जे ठराव पूर्वीं अमलांत येऊन चुकले आहेत, ते सर्व बातल चुकीचे आहेत, असें प्रसिद्ध करावें; आणि टर्क लोकांचा पराभव करण्याकरितां प्राटेस्टंटस् यांनीं आपल्या फौजेसह बादशहा चार्लस यास साहाय्य करावें.' याप्रमाणें प्राटेस्टंटस् यांनीं चार्लस यास कचाट्यांत धरून आपले अर्थ साधून घेतले, आणि आजपर्यंत जर्मनींतील प्राटेस्टंटस् एक पाखंड मतानुयायी समाज आहे, असें लेखीत असत, त्याची आतां स्वतंत्र राष्ट्रांत गणना होऊं लागली.

रोमन कॅथोलिक मतांत अनेक पंथ असून सन १५४० मध्यें Jesuits नांवाचा आणखी एक नवा पंथ उत्पन्न झाला. ह्या पंथांतील लोकांनीं धर्म आणि राज्य यांच्या कारभारांत सोळाव्या शतकांत यूरोपांत फार मोठी ढवळाढवळ केली; यास्तव हा पंथ कसा उत्पन्न झाला, त्याचा उत्पादक कोण, आणि त्याचे नियम कोणत्या प्रकारचे होते, याविषयीं येथें थोडेंसें निरूपण केलें पाहिजे.

जेजुइटस् पंथ.

भैक्ष्यवृत्ति स्वीकारून ईश्वरोपासना करण्याचा बाणा बाळगिलेल्या लोकसमुदायानें अल्प काळांत संपादन केलेल्या अपार संपत्तीविषयीं, अमर्याद सत्तेविषयीं, आणि अनेक स्वभावाच्या लोकांचें ज्या नियमांनीं नियमन केलें जातें, ते नियम रचणाराच्या स्तुत्य चातुर्याविषयीं मनुष्यें विचार करूं लागतात, तेव्हां त्या मताच्या स्थापकाच्या अत्युत्तम शहाणपणानें त्या सर्व गोष्टी घडून आल्या, असा त्यांच्या मनाचा ग्रह होतो; परंतु वास्तविकरीतीनें पाहिलें असतां जेजुइट्स् आणि दुसरे संप्रदाय फार काळपर्यंत अस्तित्वांत राहिले, लोकमान्य झाले, आणि वैभवास चढले, त्यांस त्यांच्या उत्पादकांचें शहाणपण कारण नसून त्यांचा परमोत्साह मुख्य कारण आहे.

इग्नेशियो लोयोला नांवाचा एक मनुष्य धर्मखुळा असून त्याच्या बाष्कळ विचाराचा आणि वर्तनाचा सत्यधर्माशीं आणि सद्वर्तनाशीं अगदीं मेळ नव्हता. पण हा मनुष्य महत्वाकांक्षी होता. धर्मसंबंधीं एखाद्या पंथाचे आपण उत्पादक होऊन आपण नांवलौकिकास चढावें असें त्याच्या मनांत आलें. आपणांस प्रत्यक्ष ईश्वराचा प्रसाद झाला आहे, असें त्यावेळेस त्यानें लोकांस सांगितलें; आणि तन्मतानुयायी आजही लोकांस तसेंच सांगत आहेत. त्यानें आपल्या पंथाला असा मोठा आधार दाखविला असतांही पहिल्यानें तो प्रचारांत येण्यास हरकत झाली. लोयोला याच्या विनंतीवरून पोप यानें त्या पंथाविषयीं विचार करण्यासाठीं धर्मोपदेशकांची जी कमिटी नेमली होती, तिनें असा अभिप्राय दिला कीं हा पंथ घातक आहे, सबब प्रचारांत आणण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. तेव्हां अर्थात् पोप यानें त्या पंथास आपली अनुमति देण्याचें नाकारिलें. लोयोला हा मोठा धूर्त होता, त्यानें पोप यास एक लालूच दाखवून आपला अर्थ साधून घेतला. त्यानें असें बोलणें लाविलें कीं "निरपेक्षता, पवित्रता, आणि धर्मनिष्ठा, हीं तीन व्रतें सर्व संप्रदायास समानत्वेंकरून मान्य आहेत. त्यांतून एक चवथें व्रत ग्रहण करण्यास आम्ही सिद्ध आहोंत; तें हें कीं–पोप ज्या आज्ञा करील, त्यांच्या उचित अगर अनुचितपणाविषयीं कांहींएक वाटाघाट न करितां त्या आम्ही निःसीमभक्तीनें पाळूं आणि धर्मकार्यासाठीं जेथें जाण्याविषयीं पोप आज्ञा करील तेथें त्याजपासून चरितार्थासाठीं कोणत्याही अर्थाची अपेक्षा न करितां

उत्पत्ति.

आम्ही जाऊं." त्यावेळेस पोपाच्या अधिकाराविषयीं जबरदस्त वादविवाद चालला होता, व ईश्वरोपासना करण्याच्या पद्धतीवर आणि पोपप्रचारित मतानुयायी साधूंच्या दुष्टाचरणावर कडक टीका होऊन रोमन कॅथोलिक मताला ग्लानि येत चालली होती. अशा प्रसंगीं मनुष्यांचा एक मोठा समूह, विलक्षण महोत्साहानें, आणि भक्तीनें पोप याच्या सर्व आज्ञा पाळण्यास सिद्ध झाला असतां, त्याचा अंगिकार करणें, हें पोप यास पराकाष्ठेचें इष्टच होतें. त्यानें लागलींच एक आज्ञापत्र प्रसिद्ध करून त्या पंथाला आपली संमति दिली, आणि त्या पंथांतील लोकांस अतिशय प्रशस्त अधिकार देऊन लोयोला ह्यास त्याचें मुख्य केलें. रोमन कॅथोलिक धर्म ज्या देशांत चालूं होता, त्या देशांत अर्ध्या शतकाच्या आंतच ह्या संप्रदायाचा प्रसार होऊन त्याची संपत्ति, सत्ता आणि लोकसंख्या फार वाढली, आणि हे लोक आपल्या शत्रूंस परमभयजनक झाले. लोयोला याच्यामागें त्या पंथाचें आधिपत्य लेनीस Laynez याजकडे १५५६ मध्यें आलें. तो आपल्या गुरूपेक्षां कार्बाल होता. त्यानें ह्या पंथाचे नियम आणि कायदे यांजमध्यें उत्तम प्रकारची सुधारणा केली.

जेजुईट पंथाची भरभराट.

इहलोकसंबंधीं सुखाविषयीं निरिच्छ होऊन, जे लोक परमार्थसुखाकरितां ईश्वरोपासना करण्यास प्रवृत्त होतात, त्यांनीं एकांतवासांत रहावें, आणि तेथें इंद्रियदमन आणि तपश्चर्या करून ईश्वरभक्ति करावी, हें सर्व पंथांतील साधूंचें मुख्य कर्तव्यकर्म होय, असा संप्रदाय पडून गेला आहे, व धर्माची आज्ञाही तशीच आहे. गृहस्थाश्रमी यांनींही त्यांचें अनुकरण केल्यास जगास त्यांचा कोणताही उपयोग नाहीं. परंतु जेसुईटस् पंथांतील साधूंचें आचरण याहून अगदीं भिन्न होतें, व सोळाव्या व सतराव्या शतकांत पोप याच्या शत्रूंचा पराभव करण्याकरितां तो पंथ म्हणजे निवडलेल्या शिष्यांचें एक लष्करच होतें. हें काम त्याचे हातून योग्य रीतीनें बजाविलें जावें म्हणून 'धर्मसंबंधीं कर्में इतर पंथांतील साधूंनीं अवश्य केलीं पाहिजेत, तीं ह्या पंथांतील साधूंनीं मुळींच केलीं नाहींत, तरी त्याबद्दल त्यांजकडे कांहीं दोष नाहीं, अशी त्यांस मोकळीक मिळाली होती. गृहस्थाश्रमी लोकांबरोबर त्यांचें दळणवळण असावें म्हणून त्यांनीं इहलोकसंबंधीं सर्व व्यवहार करावे. आणि मोठ्या पदवीच्या लोकांचीं मनें ओळखूनपाळखून त्यांजबरोबर मैत्री करावी, अशी त्यांस ताकीद असे. त्या पंथाच्या नियमांचा झोंक असा आहे कीं, कारस्थान करणें हें जसें काय त्या पंथाचें मुख्य तत्व आहे !

इतर पंथ व हा पंथ.

इतर पंथांहून ह्या पंथाचा उद्देश अगदीं भिन्न असल्यामुळें त्याचे नियम व कायदे हीं अगदीं भिन्न आहेत. इतर पंथ हे स्वेच्छेनें एकत्र झालेल्या लोकांचे समाज असतात; यामुळें सर्वांना सारखी लागू अशी कोणतीही गोष्ट करावयाची म्हणजे ती सर्वांनुमतें करण्यांत येते. प्रत्येक मठाच्या मुख्य अधिकाऱ्याकडे त्या पंथाचे नियम अंमलांत आण-

ण्याचा अधिकार दिलेला असतो; आणि महत्वाच्या प्रश्नाचा अथवा कामाचा उलगडा मठाधिपतीची एक कमेटी नेमली असते, त्या कमेटींतील सभासदांच्या बहुमतानें होतो. पण ह्या पंथाची रचना निराळीच होती. लोयोला हा पूर्वाश्रमांत एका लष्कराचा जनरल होता. आपल्या हाताखालील लोकांस त्यानें निखालस आपल्या हुकुमाप्रमाणें वागविलें होतें, आणि तोच त्यांच्या मनावर बळकट ठसा उमटला होता. त्यानें असा ठराव केला.

ह्या पंथाची घटना.

कीं, 'आपल्या पंथाचें राज्य निखालस राज्यसत्ताक असावें. मुख्य अधिकारी मरण पावल्यावर त्याच्या जागीं दुसरा अधिकारी निवडण्याचा मात्र प्रांतांतील मठाधिपती यांजकडे अधिकार असावा. अधिकारी निवडला गेला ह्मणजे, त्या पंथांतील लोकांवर त्यानें अमर्याद सत्ता चालवावी, व त्या पंथाच्या उत्पन्नाचा पाहिजे तसा विनियोग करावा; त्याविषयीं त्यास विचारपूस करण्याचा कोणासही अधिकार नसावा. कुंभार जसा आपल्या हातांतील मातीच्या गोळ्याला आपल्यास वाटेल तसा आकार देतो, त्याप्रमाणें ह्या पंथांतील लोक केवळ कुंभाराच्या हातांतील गोळ्याप्रमाणें मुख्य अधिकाऱ्याच्या हातांत होते. कोणत्याही अधिकारावर पाहिजे त्याची नेमणूक करण्याचा त्यास अधिकार होता. त्यानें सांगितलेलें काम बिनतकार केलें पाहिजे, मग तें करण्यास उचित असो वा नसो. आपल्या सर्व वासनांचा व आपल्या अकलेप्रमाणें आपल्यास जें कांहीं वाटतें त्याचा त्याग करून केवळ त्याच्या इच्छेप्रमाणें त्या पंथांतील लोकांनीं वागलें पाहिजे. तो जें कांहीं सांगेल तें प्रत्यक्ष येशुख्रिस्त सांगत आहे, ह्या बुद्धीनें सर्वांनीं श्रवण केलें पाहिजे व त्याप्रमाणें वागलें पाहिजे. हें या नियमांचें तात्पर्य आहे. असो. अशा प्रकारची अनिर्बंधसत्ता केवळ त्या पंथांतील साधूंवरच नाहीं, पण पृथ्वीवरील राष्ट्रांत पसरलेल्या त्या पंथांतील मनुष्यावर अंमलांत आणल्याचें मनुष्याच्या इतिहासांत तर दुसरें एकही उदाहरण सांपडणार नाहीं.

ह्या पंथाच्या नियमांनीं दिलेला अमर्याद अधिकार मुख्य अधिकाऱ्यांस योग्य रीतीनें चालवितां यावा, म्हणून त्यास हर प्रकारची माहिती देण्याकरितां केलेल्या योजना फार उत्तम आहेत. ह्या पंथाची दीक्षा घेण्याची ज्याची इच्छा असेल त्यानें ह्या पंथाच्या मुख्य अधिकाऱ्यापाशीं अथवा त्यानें ज्याच्या ताब्यांत त्यास दिला असेल त्याजपाशीं आपलें अंतर्याम उकलून दाखविलें पाहिजे. आपलीं पापें, आपल्यांत ज्या उणिवा असतील त्या, आपल्या वासना, आपल्या मनाचे कल, आणि आपला स्वभाव ह्या सर्व गोष्टी जशा असतील तशा निवेदन केल्या पाहिजेत; आणि प्रत्येक सहा महिन्यांनीं त्यांची पुनरावृत्ति केली पाहिजे. इतकें झाल्यावरही त्या नव्या छात्राच्या आचरणाशीं त्यानें निवेदन केलेल्या गोष्टींचा मेळ आहे कीं नाहीं, हें समजण्याकरितां त्या पंथांतील सर्व साधूंनीं त्याजवर आपली नजर ठेवावी, अशी त्यांस अनुज्ञा आहे. वर्तन आणि निवेदन यांजमध्यें कांहीं वैगुण्य दिसलें म्हणजे तात्काल ते आपल्या

वरिष्ठास ती गोष्ट कळवीत असतात. नव्या छात्राच्या वर्तनाविषयीं चौकशी करण्यांत पुष्कळ वर्षें निघून जातात. पंथाच्या नियमाप्रमाणें कसोटीस उतरल्यावर क्रमानें त्या समाजांतील पदव्या मिळतां मिळतां तेहतीस वर्षाचें वय झालें म्हणजे, त्यास सरते-शेवटच्या शपथा घेण्याचा अधिकार प्राप्त होतो; आणि तो प्रतिज्ञापुरस्सर त्या समा-जाचा सभासद झाला असें लेखिलें जातें. प्रत्येक नव्या छात्राच्या वर्तनाविषयीं बारीक चौकशी होत असल्यामुळें पुष्कळ वर्षांच्या सहवासामुळें त्यांजवरील अधि-काऱ्यांस त्याच्या स्वभावाविषयीं व अकलेविषयीं अनुभव प्रत्ययास येतो.

पंथाधिपति यास आपल्या पंथांतील लोकांची स्थिति कशी आहे, याविषयीं पूर्ण माहिती असावी, म्हणून प्रांतांतील सर्व मठाधिप यांनीं आपल्या हाताखालच्या लोकांविषयीं नियमानें आणि वारंवार माहिती दिली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीचें आचरण, त्याची स्वाभाविक बुद्धि, त्यानें अभ्यास करून मिळविलेलें ज्ञान, त्याचा स्वभाव, काम-काजांत त्याचा अनुभव आणि कोणत्या कामावर योजना करण्यास तो पात्र झाला आहे, यांजविषयीं तपशीलवार वृत्तांत लिहून ठेविला पाहिजे. हे सर्व रिपोर्ट स्वमत, आणि लेखाभिप्राय (शेरा) त्यासाठीं मुद्दाम ठेविलेल्या रजिस्टर बुकांत दाखल केले पाहिजेत; अशाकरितां कीं, आपल्या पंथांतील लोकांची माहिती व अनुभव पूर्णपणें कळावे. ह्या पंथांतील नियमांचा नूतनपणा आणि उद्देशाचा चमत्कारिकपणा पाहून पुष्कळ लोक त्याची प्रशंसा करूं लागले आणि त्याचे पुरस्कर्ते झाले. अल्प काळांत ह्या पंथाची लोकसंख्या आणि महत्व इतकें वृद्धिंगत झालें कीं, प्रांतांतील मुलकी अधि-काऱ्यां यांस त्यांच्या आश्रयाची जरूर पडूं लागली. सोळावें शतक समाप्त होण्यापूर्वी ज्या देशांत रोमन कॅथोलिक धर्म चालत होता, त्या देशांतील विद्याभ्याससंबंधाचीं सर्व सूत्रें जेसुइटूस यांच्या हातांत होतीं. सर्व राजांचे ते दोषश्रवणगुरु असल्यामुळें प्रत्येक राजाच्या दरबारांत ह्यांचें मोठें वजन होतें; आणि राजाच्या दरबारांत तर मुख्य-प्रधानापेक्षां दोषश्रवण-गुरूच्या हातांत जास्त सत्ता होती. पोप याच्या अधिकाराचें संरक्षण करण्याकरितां ते निःसीम भक्तीनें पोप याची सेवा करीत असत. यामुळें पोप याच्या दरबारांतही त्यांचें मोठें वजन होतें. तरुण अवस्थेंत मनुष्यांचीं मनें आपल्यास हवीं तशीं तयार करून हे लोक प्रौढ अवस्थेंत त्या मनुष्यापासून हवीं तीं कामें करून घेत असतां यूरो-पांतील मोठमोठ्या दरबारचा राज्यकारभार कांहीं प्रसंगीं अगदीं त्यांच्या तंत्रानें चालत असे. दरबारांतील प्रत्येक काव्यादाव्यांत त्यांचें अंग होतेंच. मुख्य अधिकारी यास पंथाची व्यवस्था कशी चालते, आणि कोणत्या मनुष्यामध्यें कोणते गुणदोष आहेत ह्याविषयीं चांगली माहिती असल्यामुळें व अनिर्बंध सत्ता हातांत असल्यामुळें हातीं घेतलेलें काम बिनचूक मोठ्या चातुर्यानें तो शेवटास नेत असे.

सत्तातिरेक.

जशी त्या पंथाची सत्ता वाढत चालली तशी संपत्तिही वाढत चालली. निर्धन असण्याविषयीं केलेल्या शपथेपासून त्यांनीं अनेक निमित्तें सांगून आपली मोकळीक करून घेतली. इतर पंथांतील लोकांस संपत्ति मिळविण्यास जीं साधनें होतीं, त्यापेक्षां जेसुइट्स यांस एक साधन जास्त होतें. खिस्तमतप्रसाराचें काम आपल्यास चांगल्या रीतीनें करतां यावें, म्हणून त्यांनीं पोप यांजपासून व्यापारकरण्याची परवानगी घेतली होती. पूर्व आणि पश्चिम हिंदुस्थानाबरोबर व्यापार करून त्यांनीं अपार संपत्ति मिळविली असतांही, तितक्यानें त्यांच्या वासना तृप्त झाल्या नाहींत. अमेरिकेंतील दक्षिण महाद्वीपांत प्रशस्त आणि सुपीक देश संपादन करून तेथें राजाप्रमाणें लक्षावधि लोकांवर ते राज्य करूं लागले.

जेसुइटस् यांचें राजकीय चातुर्य लक्षांत ठेवण्यासारखें आहे, म्हणून त्याविषयीं संक्षिप्त वृत्तांत सांगितल्यावांचून हें प्रकरण पुरें करतां येत नाहीं. इतिहास हा मनुष्याच्या अथवा राष्ट्राच्या आयुष्यांतील कृतीचें एक चित्र आहे, किंवा ज्यापासून जनव्यवहारविषयक शहाणपणाच्या सर्वसाधारण मूळ बीजांचें ज्ञान संपादन करून घेतां येईल, अशा अनुभवजन्य ज्ञानाचा एक सांठा आहे, अशी ज्याची समजूत आहे, त्याच्यानें अशा महत्वाच्या गोष्टी इतिहासांतून वर्ज्य करतां येत नाहींत. मग कांहीं विषयांतर झालें तरी तो त्याची पर्वा करीत नाहीं.

अमेरिका खंडांतील लोकांवर जेसुइटस् यांनीं महदुपकार करून आपल्या शहाणपणानें लोकांचीं मनें अगदीं चकित करून टाकिलीं होतीं. पहिल्यानें युरोप खंडांतील लोक त्या हतभाग्य महाद्वीपांत गेले तेव्हां त्याची लूट करणें, त्या देशांतील लोकांस गुलाम करणें, आणि त्यांचा समूळ नाश करणें, याखेरीज त्यांचा दुसरा उद्देशच नव्हता. जेसुइटस् यांचा त्या द्वीपांत वसाहत करण्याचा मुख्य उद्देश त्या हतभाग्य द्वीपांतील लोकांवर करुणा करणें हा होय. पाराग्वे देशांत त्यांनीं आपली वसाहत केली, तेव्हां त्या देशांतील लोकांची स्थिति अगदीं रानटीपणाची होती. त्यांस कोणतीही कला माहीत नव्हती. पारध करणें अथवा मासे मारणें, ह्या अशाश्वत उपजीविकेवर काय तो त्यांचा गुजारा ! राजा आणि प्रजा म्हणजे काय, हें त्यांस ठाऊक नव्हतें. अशी त्यांची ती स्थिति पाहून जेसुइटस् लोकांस त्यांची दया आली, आणि ते तशा रानटी लोकांस ज्ञान शिकविण्याच्या व सुशिक्षित करण्याच्या प्रयत्नास लागले. जमिनीची लागवड कशी करावी, माणसाळलेल्या पशूंची वाढ कशी वाढवावी, आणि घरें कशीं बांधावीं, या गोष्टी त्यांनीं शिकविल्या व जंगलांतून त्यांस एके ठिकाणीं करून त्यांचीं गांवें वसविलीं; त्यांस शिल्प व दुसऱ्या कला शिकविल्या. सुव्यवस्था आणि सुरक्षितपणा, यांपासून मनुष्यांस जीं सुखें प्राप्त होतात, त्या सुखांचा अनुभव घेण्याची त्यांस संवय लाविली; ते लोक आपल्या हितकर्त्यांची प्रजा बनले, आणि बाप त्याप्रमाणें

ह्याच्या दयेचें व राजकारणचातुर्याचें उदाहरण.

लडिवाळानें आपल्या पुत्रांचें पालन करतो, त्याप्रमाणें जेसुइटस् लोक त्या लोकांचें पालन करीत होते. अमेरिकन लोकांची जेसुइटस् लोकांविषयीं इतकी पूज्यबुद्धि होती, आणि ते त्यांस इतके चहात होते कीं, लक्षावधि लोकांवर जेसुइटस् लोकांची अल्पसंख्या खुशाल राज्य करीत होती. ते आपल्या सर्व प्रजेस समान दृष्टीनें वागवीत असत. केवळ स्वतःसाठींच नाहीं, पण समाजांतील सर्व लोकांसाठीं प्रत्येकानें श्रम केले पाहिजेत, असा नियम केला होता. जमिनीचें उत्पन्न आणि त्याखेरीज त्या लोकांच्या इतर सर्व प्रकारच्या श्रमांपासून जी प्राप्ति होईल ती, यांचा एक ठिकाणीं सांठा करून त्यांतून प्रत्येक मनुष्यास त्याच्या गरजेप्रमाणें सामग्री देत असत. ह्या व्यवस्थेचा असा चांगला परिणाम झाला कीं, लोकसमाजाच्या शांततेस धोका आणणाऱ्या आणि सुखाची हानि करणाऱ्या बहुतकरून सर्व वासनांचा समूळ क्षय झाला होता. अमेरिकन लोकांनीं आपल्यामधून निवडून काढलेले थोडे मॅजिस्ट्रेट सर्व देशांत शांतता ठेवून कायदे अमलांत आणण्यास बस्स होते. रक्तपात होईल अशा शासनाचा तर कधींच प्रसंग पडला नाहीं. त्या निरुपद्रवी व संतुष्ट लोकांमध्यें सुव्यवस्था राखण्याकरितां जेसुइटस् यांनीं त्यांस एखादी कान उघडून गोष्ट सांगितली, थोडीशी त्यांची अप्रतिष्ठा केली, किंवा विशेष प्रसंगीं थोडसे फटके मारले, म्हणजे पुरे !

राज्यतृष्णा व मत्सर.

परंतु मनुष्य प्राण्याच्या कल्याणाकरितां जेसुइटस् यांनीं केलेल्या योग्य प्रयत्नांत देखील ठळक दिसून येण्याजोगे दोष होते. पाराग्वे येथें आपलें एक स्वतंत्र राज्य स्थापन करावें, असा त्यांचा मुख्य उद्देश होता. त्यांची उत्तम राज्यव्यवस्था आणि पोलिसचा बंदोबस्त या साधनांनीं त्यानीं आपलें राज्य अमेरिकेंतील सगळ्या दक्षिण महाद्वीपांत देखील पसरलें असतें. वर सांगितलेले उद्देश मनांत धरून त्यांच्या ताब्यांत जो मुलूख होता, तेथील लोकांवर यूरोप खंडांतील राष्ट्रांनीं त्या खंडांतील देशांत वसाहती केल्या. त्यांचें कांहीं वजन पडूं नये, म्हणून त्यांनीं आपल्या ताब्यांतील लोकांच्या मनांत स्पॅनिश आणि पोर्तुगीज लोकांविषयीं वैरभाव आणि तिरस्कार उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. इतर राष्ट्रांनीं वसाहत केलेल्या देशाबरोबर आपल्या ताब्यांतील लोकांचें दळणवळण त्यांनीं अगदीं बंद करून टाकलें. आपल्या देशांत परकीय राष्ट्रांतील लोकांनीं व्यापार करण्याकरितां येऊं नये, असा प्रतिबंध केला आपल्या शेजारच्या राज्यांतील एखादा मनुष्य आपल्या राज्यांत येऊं देण्याचा प्रसंग पडला, तर आपल्या प्रजेस त्यांजबरोबर भाषण करूं देत नसत; व तो ज्या घरांत राहिला असेल, तेथें आपल्यापैकीं कोणी विद्यमान असल्यावांचून आपल्या प्रजेपैकीं कोणासही त्या घरांत जाऊं देत नसत. यूरोपांतील राष्ट्रांच्या लोकांशीं आपल्या प्रजेचें दळणवळण जितकें दुर्घट करवेल तितकें करण्याकरितां आपल्या प्रजेस यूरोप खंडांतील कोणतीही भाषा येऊं नये, असा त्यांनीं दीर्घ प्रयत्न केला. लढाऊ लष्करावांचून हे सर्व प्रयत्न व्यर्थ होतील, म्हणून त्यांनीं

आपल्या प्रजेस युद्धकलेंत प्रवीण करून त्यांस शस्त्रें दिलीं, आणि युद्धोपयोगी सर्व साहित्याचा सांठा करून ठेवला. ह्याप्रमाणें हा पंथ उत्कर्षास आला असतांही कांहीं वर्षांनीं त्याचा लय झाला. असो.

धर्मसभा.

चार्लस हा इतर देशांतील राज्यकारभार आटोपून जर्मनींत आला, तेव्हां प्रॉटेस्टंटस् यांनीं फ्रांकफोर्ट येथील सभेंत ठराव झाल्याप्रमाणें दोन्ही पक्षांतील निवडक धर्माधिकारी यांची सभा भरवून वादाचा निकाल करण्याविषयीं त्यांस आग्रहपूर्वक विनंति केली. कोणत्याही वादग्रस्त गोष्टीविषयीं विचार करून निर्णय करण्याचा अधिकार माझा असतां, तुम्ही अशा प्रकारची एक सभा भरवून तिजकडून वादाचा निकाल करण्याची इच्छा करतां हें चांगलें नाहीं, असें पोप यानें चार्लस यास सांगितलें, व सभा भरवूं नये, म्हणून अनेक हरकती घेतल्या; परंतु प्रॉटेस्टंटस् यांची मर्जी ठेवणें चार्लस यास त्या समयीं जास्त हितावह होतें, म्हणून त्यानें पोप याच्या म्हणण्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. तेव्हां दोन्ही पक्षकारांनीं सभासद निवडण्याचा चार्लस यास अधिकार दिल्यावरून त्यानें रोमन क्याथोलिक धर्मांतील तीन आणि प्रॉटेस्टंटस् धर्मांतील तीन असे सहा धर्माधिकारी निवडून काढले. नेमलेले सभासद आपल्या पंथांत मोठ्या योग्यतेस आलेले होते; आणि त्यांपैकीं एक खेरीजकरून बाकीचे सर्व दोन्ही मतांमध्यें ऐक्य होऊन तंटा मिटावा अशी अपेक्षा करीत होते; पुष्कळ दिवसपर्यंत विचार झाल्यावर मानसिक विचारांच्यासंबंधानें जे मतभेद होते, आणि लोकांशीं ज्यांचा कांहीं संबंध नव्हता, त्याविषयीं फार श्रम पडल्यावांचून दोन्ही पक्षांमध्यें एकवाक्यता होऊन त्यांची व्यवस्था अमुक रीतीनें व्हावी, असा ठरावही झाला; आणि त्यासंबंधानें दोन्ही पक्षांचें समाधान झालें. परंतु ज्या गोष्टींशीं पोप याच्या अधिकाराचा आणि हिताचा संबंध होता, आणि ज्या गोष्टींत लोकांच्या हिताहिताचा संबंध होता, त्याविषयीं विचार करण्याच प्रसंग आला, तेव्हां रोमन क्याथोलिक मतानुयायी सभासद अगदीं अज्ञानवश होऊन अनावर झाले. पोप याची अब्रु आणि प्राचीनकाळापासून चालत आलेला धर्म सुरक्षित ठेवून त्यांस कांहींच सुधारणा करतां येईना. पोप याची सत्ता, आणि धर्मोपदेशकाचे अधिकार, धर्मसंबंधीं संस्कार, साधूंचें अर्चन, आणि दुसऱ्या तशा प्रकारच्या महत्वाच्या गोष्टी, याविषयीं दोघां पक्षकारांमध्यें कांहीं केल्या एकवाक्यता होईना; सरतेशेवटीं पुष्कळ प्रयत्न करूनही तंटा मिटत नाहीं, असें चार्लस यास वाटलें. तेव्हां सभासदांच्या बहुमतानें त्यानें असें ठरविलें कीं ' ज्या कलमांबद्दल दोन्ही पक्षकारांमध्यें एकवाक्यता झाली आहे, त्या कलमांचा निकाल लागून चुकला; यासाठीं तीं सर्वांनीं मान्य करावीं; आणि बाकीचीं कलमें मतभेद झाल्यामुळें तशींच राहिलीं आहेत. त्यांविषयीं सर्व सभासदांची सभा भरवून तींत त्यांचा विचार व्हावा. सर्व सभासदांची

सभा भरविण्यास पोपाचें अनुमोदन मिळालें नाहीं तर जर्मनींतील धर्माधिकारी यांची सभा भरवून त्यांजकडून त्या कलमांचा निवाडा करून घ्यावा; आणि त्या सभेंतही त्या कलमांचा निकाल लागला नाहीं, तर आठ महिन्यांचे आंत जनरल डायट सभा भरवून त्या कलमांचा निर्णय करून घ्यावा, आणि तोंपर्यंत नवा फेरफार करण्याविषयीं अथवा आपल्या धर्मांत नवे लोक घेण्याविषयीं कोणीं कांहीं प्रयत्न करूं नयेत, व धर्मोपदेशकांच्या हक्काला व उत्पन्नाला कोणत्याही प्रकारचा उपद्रव देऊं नये.

पोपचा संताप. ह्या सभेनें थापाथापी करून जे ठराव केले, त्याबद्दल पोप यास फार राग आला. जर्मनींतील धर्माध्यक्षांच्या सभेकडून वादग्रस्त गोष्टीची चौकशी करवून निकाल करण्याविषयीं जर्मन लोकांनीं आपल्या हातांत अधिकार घेतला, ही त्यांनीं आपल्या अधिकाराची अमर्यादा केली, असें त्यानें मानिलें. सर्व राष्ट्रांतील धर्माधिकारी यांची सभा भरवून त्या सभेंत त्या वादाचा निकाल करण्याविषयीं जो ठराव केला, तोही त्यास आवडला नाहीं. कारण त्याच्या पूर्वजांनीं ती गोष्ट वारंवार निक्षून नाकारिली होती. परंतु ज्या सभेंत फक्त गृहस्थाश्रमी लोक असतात, त्या सभेंत धर्मासारख्या महत्वाच्या विषयाचा विचार करण्याविषयीं केलेला ठराव त्याच्या मनास इतका लागला कीं, त्यानें प्रॉटेस्टंटस् मतानुयायी लोकांप्रमाणेंच हे लोकही पापी आणि धर्मलंड आहेत असें मानिलें. प्रॉटेस्टंटस् देखील त्या ठरावापासून कांहीं कमी असंतुष्ट झाले नाहींत. कारण ज्या स्वातंत्र्याचा आणि हक्कांचा ते अनुभव घेत होते, त्यांस त्या ठरावानें हरकत आणिली होती. परंतु चार्लस यास आपल्या राज्यांत कोठेंही असमाधान ठेवावयाचें नव्हतें, सबब त्यानें खासगी रीतीनें त्यांस असें सांगितलें कीं, ‘ सभेनें जे ठराव केले आहेत, त्यांत तुम्हांस जे जुलमी किंवा नुकसानकारक वाटतील ते तुम्हांस लागू नाहींत; आणि आजपर्यंत तुम्ही ज्या हक्कांचा उपभोग घेत आलां आहांत, त्यांत त्या ठरावानें तुम्हांस कांहीं हरकत झाली आहे, असें तुम्ही न मानतां त्या हक्कांचा खुशाल उपभोग घ्यावा. ’

चार्लस यानें न्याटीसबोनच्या डायेट सभेंत प्रॉटेस्टंटस् यांस जे हक्क दिले, त्याबद्दल पोपास फार राग आला होता; तरी ख्रिस्तीधर्मानुयायी राष्ट्रांतील धर्माध्यक्ष लोकांची साधारण सभा भरविण्याविषयीं चहूंकडून त्यास निक्षून आग्रह झाल्यामुळें ती सभा भरविण्याचें काम लांबणीवर टाकणें ही गोष्ट पोपास अशक्य झाली. तथापि, इटलींत कोणत्या तरी शहरांत ही सभा भरवावी, असा त्याचा आग्रह होता, तो त्यानें सोडला नाहीं. स्पायरस् येथील डायेट सभेंत त्यानें आपला वकील पाठविला, त्यास असा हुकूम केला होता कीं, ‘इटलींतील कोणत्या तरी शहरांत सभा भरविण्याचा आपला आग्रह सिद्धीस नच गेला तर जर्मनी आणि इटली ह्या दोन्ही देशांच्या सरहद्दीवरील ट्रेंट शहरांत ही सभा भरविण्याविषयीं बोलणें करावें. ’ डायेट सभेंतील रोमन क्याथो-

लिक मतानुयायी राजे यांनीं पोप याचें म्हणणें कबूल केलें; परंतु प्रॉटेस्टंटस् यांनीं त्या गोष्टीस अनुमोदन दिलें नाहीं.

पोपचा उपहास.

पोप यानें त्यांच्या हरकतीकडे कांहींएक लक्ष न देतां ख्रिस्तधर्मानुयायी राष्ट्रांतील धर्माधिकारी यांनीं त्या नगरांत हजर व्हावें, असा हुकूम प्रसिद्ध केला. तारीख एक नवंबर सन १५४२ रोजीं सभेच्या कामास आरंभ व्हावा, असें त्यानें ठरविलें होतें; आणि त्या सभेंत आपल्यातर्फे हजर राहण्याकरितां तीन मुख्य धर्माधिकारी यांची नेमणूक केली होती; परंतु चार्लस आणि फ्रॅन्सिस यांजमध्यें नुकतेंच भयंकर युद्ध उपस्थित झालें होतें, यामुळें धर्मोपदेशकांच्या संस्थानांतील कांहीं धर्माधिकाऱ्यांखेरीज तेथें कोणी आलें नाहीं आणि पोप याचा उपहास आणि अवहेलना मात्र झाली.

प्रॉटेस्टंटस्‌चा विजय.

पोप याच्या दुर्दैवानें ज्या वेळेस जर्मनींतील प्रॉटेस्टंटस् त्याची अवहेलना करीत होते, त्याच वेळेस प्रॉटेस्टंटस् यांचे वर्तनाकडे अलक्ष्य करून त्यांची मर्जी संपादन करण्याकरितां उलट्या त्यास आणखी नव्या देणग्या देणें चार्लस आणि फर्डिनांड यांस भाग पडलें होतें! ट्रेंट येथें जनरल सभा भरवूं नये म्हणून, ज्या स्पायरस् येथील डायेट सभेंत प्रॉटेस्टंटस् यांनीं अतिशय अपमानजनक शब्दांचा उपयोग करून हरकत घेतली होती, त्याच सभेंत फर्डिनांड यानें डायेट सभेच्या दप्तरांत पोपच्याविरुद्ध त्यांची प्रतिज्ञापूर्वक असंमति लिहून ठेवण्याविषयीं परवानगी दिली; इतकेंच नाहीं तर, ऱ्याटीसबोन येथें चार्लस यानें त्यांस जीं अभिवचनें दिलीं होतीं, त्यांची पुनः पुनः उजळणी करून त्यांच्या निर्भयपणाकरितां आणखी जें कांहीं त्यांनीं मागितलें, तें त्यांस दिलें. कारण हंगेरी प्रांताचा बचाव करण्याकरितां त्यांच्या मदतीची त्यास गरज होती. गॉसलर शहर हें प्रॉटेस्टंटस् यांच्या कटांत होतें, त्या शहराच्या अधिकारांत धर्माधिकारी यांचें जें उत्पन्न होतें, तें त्या नगरच्या अधिकाऱ्यानें जप्त केल्यामुळें बादशहाच्या कोर्टांतून तें परत देण्याविषयीं हुकूम झाला होता; तो देखील प्रॉटेस्टंटस् यांच्या मर्जीखातर फर्डिनांड यानें तहकूब ठेविला; आणि ब्रन्सइकचा ड्यूक यास असा हुकूम अमलांत आणण्याचा तुम्हीं प्रयत्न करूं नये असें कळविलें. परंतु ब्रन्सविकचा ड्यूक हा मोठा साहसी आणि एकमार्गी होता; आणि आपण पतकरलेल्या कामांत जसा अविचारी तसाच हट्टी होता. त्यानें स्वाऱ्या करून गॉसलर येथील लोकांस फार त्रास दिला, तें कांहीं प्रॉटेस्टंटस् यांस सहन झालें नाहीं. कारण आपल्या कटांत जे सामील झाले आहेत, त्यांजवर बलात्कार होऊं देणें, हें त्यांस उचित वाटलें नाहीं. त्यांनीं फौज गोळा करून हेन्री याजबरोबर लढाई करण्याचा जाहिरनामा लाविला; आणि थोडक्याच आठवड्यांत त्याचें सर्व राज्य हिसकावून घेऊन त्यास हांकून लाविलें. ह्याप्रमाणें त्याचा सूड उगवून त्यांनीं सगळ्या जर्मनींत आपला दरारा बसविला.

त्यांस अनुकूल अशा पुष्कळ गोष्टी कबूल करण्यांत आल्यामुळें व त्यांच्या मताचा दिवसानुदिवस जास्त प्रसार होत चालल्यामुळें ते फार धीट झाले. त्यांनीं बादशाही कोर्टाच्या अधिकाराविषयीं अशी हरकत घेतली कीं, ऱ्याटीसबोन येथील डायेट सभेंत ठराव झाल्याप्रमाणें त्या कोर्टामध्यें सुधारणा झाली नाहीं; म्हणून त्या कोर्टानें केलेले हुकूम कायदेशीर नाहींत, आणि त्या कोर्टामध्यें सुधारणा झाल्यावांचून व धर्माच्यासंबंधानें प्रत्येक गोष्टीबद्दल आम्हांस चांगली जामिनकी दिल्यावांचून हंगारी प्रांताचा बचाव करण्याकरितां आम्हीं सहाय करणार नाहीं, असें त्यांनीं साफ सांगितलें.

स्पायरस येथें डायेट सभा भरविण्याकरितां चार्लस हा सन १५४४ मध्यें जर्मनींत आला, तेव्हां त्यास असें दिसून आलें कीं, फ्रान्स देशाबरोबर लढाई करण्याकरितां आपल्याला जर्मनीमध्यें स्वस्थता ठेवण्याची जरूर आहे, तर प्रॉटेस्टंटस् यांचीं मनें कोणत्याही रीतीनें दुखवितां येत नाहींत. उलट्या त्यांस नव्या देणग्या देऊन व त्यांच्या धर्माचा जास्त प्रसार होईल, असे त्यांस हक्क देऊन मला त्यांचीं मनें स्वस्थ केलीं पाहिजेत. त्याप्रमाणें त्यानें प्रॉटेस्टंटस् पक्षांत जे प्रमुख होते, त्यांचे इच्छित अर्थ पुरवून व दुसऱ्यांस उदार वचनें देऊन त्यांजकडून आपल्या उद्देशास कांहीं हरकत होणार नाहीं, असें करून ठेविलें. नंतर त्यानें डायेट सभेला उद्देशून जें भाषण केलें, त्यांतील तात्पर्य असें: तो म्हणाला कीं, "माझे मनांत कायते दोन उद्देश होते. एक जनरल सभा भरवून धर्माचे संबंधानें जर्मनीमध्यें दुर्दैवानें जो मतभेद झाला आहे, त्याचा निकाल करवावा, आणि मुसलमान लोकांच्या भयजनक उत्कर्षास प्रतिबंध करण्याकरितां योग्य उपायांची योजना करावी; परंतु माझे पवित्र उद्देश फ्रान्सच्या राजानें कपटानें लढाई उपस्थित करून व्यर्थ केले. फ्रॅन्सीस आपणांस ख्रिस्तधर्मानुयायी म्हणवीत असतां त्यानें त्या धर्मनिंदक मुसलमान लोकांशीं मैत्री करून त्यांस यूरोपच्या मध्यभागीं आणून ठेविलें आहे. तेव्हां मुसलमान लोकांचा पराभव करण्याच्या भरीस न पडतां फ्रॅन्सीस याचा अगोदर पराभव केला पाहिजे; म्हणजे मुसलमान लोकांस देखील बळकट धक्का दिल्यासारखें होईल. यासाठीं फ्रॅन्सीस याचा पराभव करण्याकरितां तो माझा अथवा जर्मनीचा शत्रु समजून किंबहुना सगळ्या ख्रिस्तधर्मानुयायी लोकांचा शत्रु समजून आपण सर्वांनीं मदत दिली पाहिजे."

चार्लसच्या अडचणी.

चार्लस याच्या भाषणानें डायेट सभेंतील सभासदांच्या मनांवर चांगला ठसा उठून त्याच्या इच्छेप्रमाणें त्यास सहाय करण्यास ते तयार झाले. फ्रॅन्सीस यानें आपले उद्देश काय आहेत, हें कळविण्याकरितां वकील पाठविले होते; परंतु त्यांस जर्मनीच्या हद्दींतच येऊं दिलें नाहीं, आणि मुसलमान लोकांशीं आपल्या यजमानानें

सख्य केलें, यांत त्यानें कांहीं अशुद्ध केलें नाहीं, असें प्रतिपादन करण्याकरितां त्यांनीं लेख प्रसिद्ध केले, त्यांजकडेही कोणीं लक्ष दिलें नाहीं.

प्रॉटेस्टंटस् यांचीं मनें निर्भय व स्वस्थ करण्याकरितां, चार्लस यानें त्याच्या विरुद्ध आजपर्यंत जे कांहीं ठराव झाले होते, ते सर्व तहकूब केले, आणि जनरल अथवा राष्ट्रीय सभा भरवून वादाचा निकाल होईपर्यंत प्राटेस्टंट्स् यांनीं स्वेच्छेणानें आपल्या मताप्रमाणें धर्मसंबंधीं कृत्यें करावीं, अशी त्यांस मोकळीक दिली; आणि बादशाही कोर्टांत त्यांस कांहीं उपद्रव देऊं नये, असा हुकूम दिला; व जेव्हां निवडलेल्या जज्जाची मुदत संपेल तेव्हां, जे जज्ज निवडावयाचे त्यांत धर्मसंबंधानें कांहीं भेद न ठेवितां, जे निवडण्यास सुपात्र असतील, त्यांची निवड करावी, असा ठराव केला. चार्लस यानें आपल्यावर महत्कृपा केली, त्याजबद्दल त्याचे अभार मानून फ्रॅन्सीस याजबरोबर लढाई करण्याविषयीं प्रॉटेस्टंट्स् यांनीं अनुमति दिली; आणि वीस हजार पायदळ व चार हजार घोडेस्वार सहा महिनेपर्यंत चाकरीस ठेऊन त्याचा खर्च सर्वांनीं द्यावा, आणि तुर्क लोकांबरोबर युद्ध करण्याकरितां द्रव्य पाहिजे, त्यासाठीं सगळ्या जर्मनींत कांहीं भेदाभेद न ठेवितां डोईपट्टी घ्यावी, असा ठराव करून डायेट सभा विसर्जन झाली.

युद्धाची तयारी.

त्याकाळीं शौर्य, धैर्य, आणि राजकीय शहाणपण यांजमध्यें चार्लस आणि फ्रॅन्सीस ह्यांच्या बरोबरीस असा दुसरा पुरुष सगळ्या यूरोपांत कोणी नव्हता. त्यांनीं आपलीं लष्करें तयार करून समरांगणांत कशीं थाटानें आणिलीं, फ्रॅन्सीस याच्या सेनापतीनें युद्धोत्साहजनक आणि शिपाईबाण्याचें भाषण करून आपल्या फौजस कसा हुरूप आणिला, पराजय होण्याची वेळ आली असतां व आपल्या फौजेपेक्षां शत्रूंची फौज जास्त असतां, फ्रान्सिस याच्या सेनापतीनें समयज्ञता, आणि चातुर्य यांच्या योगानें शत्रूवर कसा जय मिळविला, फ्रान्सिस याची तारांबळ व्हावी, म्हणून चार्लस यानें त्याचे शत्रूंस चिथावून देऊन त्याची कशी धांदल केली; इंग्लंडचा राजा हेनरी, आणि चार्लसच्या विचारांत भेद पडल्यामुळें व दोघेही आपापला स्वार्थ साधून घेण्याच्या भरीस पडल्यामुळें, फ्रान्सच्यासंबधानें त्याचा मुख्य उद्देश एका बाजूस राहून दोघांमध्यें प्रथमपासूनच अविश्वास उत्पन्न होऊन शेवटीं ते एकमेकांचे वैरी कसे झाले, व फ्रॅन्सीस यास लाजवून व ख्रिस्तधर्मानुयायी राष्ट्रांमध्यें त्याची फटफजिती करून मुसलमान लोकांचा स्नेहसंबंध तोडणें त्याजला कसें भाग पाडलें, ह्या गोष्टी इतक्या मनोवेधक आहेत कीं, ग्रन्थकर्त्यानें आपणाकडे अरसिकपणाचा दोष घेतल्यावांचून त्यास त्या वगळतां येत नाहींत. परंतु धर्मसंबंधानें काय काय खटपटी झाल्या, व शेवट परिणाम काय झाला, हा प्रधान विषय असून त्याजविषयीं विचार चालला आहे, सबब विषयांतर करून तो वृत्तांत येथें निरूपण करतां येत नाहीं.

चार्लस याच्या लष्करांत सामग्रीचा तोटा पडूं लागल्यामुळें व फ्रान्स देशांतून आपलें लष्कर परत नेणें पराकाष्ठेचें कठिण व हिंवाळ्यांत तेथें छावणी करून राहणें अशक्य वाटल्यामुळें त्यानें फ्रॅन्सीस याजबरोबर तह केला. त्या तहनाम्यांत धर्मसंबंधीं एकही कलम नाहीं, म्हणून त्यांतील मुख्य कलमें कोणतीं होतीं हें सांगण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं.

चार्लस व फ्रॅन्सीस यांच्यामध्यें तह.

परंतु चार्लस यास तह करण्याची जरूर पडली, त्यास वर सांगितलेल्या कारणाखेरीज दुसरीं आणखी कारणें आहेत, आणि त्यांचा धर्मसंबंधानें उपस्थित झालेल्या वादाशीं संबंध आहे. म्हणून त्याविषयीं येथ निरूपण केलें पाहिजे.

तह व त्याचीं कारणें.

शेवटच्या डायेट सभेंत चार्लस यानें प्रॉटेस्टंटस् यांस कितीएक हक्क दिल्यामुळें त्यांच्या पंथास जी बळकटी आली होती, ती पोप यास सहन झाली नाहीं. त्यानें चार्लस यास खरमरीत पत्र लिहिलें. चार्लस यानें इंग्लंडच्या राजाबरोबर मैत्री केल्याबद्दल तर पोप यास फारच राग आला होता. कारण त्यास पोप यानें बहिष्कृत करून धर्मलंड असें ठरविलें होतें. फ्रॅन्सीस यानें मुसलमानांच्या बादशहाबरोबर स्नेहसंबंध जोडल्यामुळें चार्लस यास जसें भय वाटत होतें, तसेंच चार्लस यानें इंग्लंडच्या राजाबरोबर केल्यामुळें पोप यास वाटलें होतें. पोप यानें आपला पक्ष स्वीकारावा म्हणून फ्रॅन्सीस याचा प्रयत्न होताच; चार्लस याजवरील आपला राग छपवून पोप यानें जरी फ्रॅन्सीस याचा पक्ष स्वीकारला नव्हता, तरी त्यांजवर भरंवसा ठेवणें हें सुरक्षित वाटलें नाहीं. चार्लस यास चांगलें माहीत होतें कीं, पोप आणि फ्रॅन्सीस यांचें ऐक्य झालें असतां इटली देशांत आपलीं राज्यें आहेत, त्यांस पराकाष्ठेचा उपद्रव होईल. त्याच समयाला मुसलमान लोक एकामागून एक हंगारी प्रांतांतील शहरें घेत घेत ऑस्ट्रिया देशाच्या सरहद्दीवर येऊन पोहोंचले होते. याहून सर्वतोपरी श्रेष्ठ दुसरें कारण असें होतें. जर्मनी देशांत प्रॉटेस्टंटस् मताचा विलक्षण प्रसार होत चालला होता; व त्या मतानुयायी राजांमध्यें चार्लस यास घातक असें ऐक्य झालें होतें. बहुतकरून अर्ध्या जर्मनीनें जुन्या मताचा त्याग करून नव्या मताचा अंगिकार केला होता; आणि बाकी राहिलेल्या लोकांचीही प्राचीन धर्मावरील श्रद्धा कमी झाली होती. ऑस्ट्रियांतील बडे लोकांनीं आम्हांस आवडेल तो धर्म स्वीकारण्याची मोकळीक द्यावी, म्हणून फर्डिनांड याजपाशीं आग्रहपूर्वक मागणें मागितलें होतें. तेव्हां वेळेवर फलद्रूप उपायांची योजना करून जर त्या मताचा प्रसार बंद केला नाहीं, तर कोणत्या परिणामावर गोष्ट जाईल याची चार्लस याच्यानें कांहीं अटकळ करवेना. शेवटच्या डायेट सभेंत त्यानें स्वतः प्रॉटेस्टंट्स् यांची मगरूरीचीं भाषणें ऐकिलीं होतीं; आपली संख्या आणि ऐक्य यांच्या बळावर ते पूर्वींची विनीतपणाची रीत कशी विसरले होते आणि धिटाईनें पोप याची कशी निर्भर्त्सना करीत होते, व बादशाही अधिकारा-

विषयीं त्यांची पूज्यबुद्धि किती कमी झाली होती, हें चार्लस यानें स्वतः पाहिलें होतें. यास्तव त्यास प्राचीन धर्म आणि बादशाही अधिकार यांचें संरक्षण करण्याकरितां त्वरित फलद्रूप होतील असे कडक उपाय योजण्याची अवश्यकता प्राप्त झाली. ती आणि तें काम फ्रान्सिससारख्या प्रबळ शत्रूबरोबर लढाई चालवून करणें त्यास शक्य नव्हतें.

ह्याप्रमाणें आपल्या अंतःकरणांतील उद्देश सिद्धीस नेण्याकरितां चार्लस यानें फ्रान्सिस याजबरोबर तह केला होता.

प्रॉटेस्टंट्स्चा कसा पाडाव करावा.

टर्की याजबरोबर लढाई करण्याचा संकेत करून चार्लस यानें सुलतान सुलेमान यास बलाढ्य मित्रांपासून नुसतें नागविलें एवढेंच नाहीं, पण त्या मित्रांचें बळ त्याच्या नाशाकडे योजिलें. अकालीं भय उत्पन्न होईल म्हणून तहनाम्यांत तें दाखल केलें नव्हतें; याशिवाय खासगी रीतीनें त्यानें फ्रान्सिस यांजबरोबर एकमत होऊन असा ठराव केला होता कीं, दोघांनीं आपलें वजन आणि सामर्थ्य खर्च करून जनरल सभा भरविण्याचा प्रयत्न करावा; आणि त्या सभेच्या अधिकाराचें प्रतिपादन करून प्रॉटेस्टंटस् मताचा त्यांनीं आपल्या राज्यांतून समूळ नाश करून टाकावा. हा संकेत करून फ्रेंच राजापासून आपल्यास साहाय्य मिळेल अशी प्रॉटेस्टंटस् यांस जी आशा होती, ती अगदीं भग्न करून टाकिली. कदाचित् त्यांच्याच विनंतीवरून अथवा आपल्याबरोबरीचें पूर्वींचें वैर स्मरून फ्रान्सिस यास कांहीं गडबड करतां येऊं नये, म्हणून इंग्लंडच्या राजाबरोबर त्याची लढाई लावून देऊन जर्मनीच्या कारभारांत विशेष ढवळाढवळ करणें त्यास अशक्य करून टाकिलें होतें.

अडचणी.

चार्लस हा कांहीं महिनेपर्यंत त्यास नेहमीं एक रोग होत असे त्यानें आजारी होता; यामुळें जर्मनींतील प्रॉटेस्टंटस् यांस विनीत करण्याचें काम लांबणीवर टाकणें त्यास भाग पडलें, असें एक कारण उघड दिसतें; परंतु त्याखेरीज त्या विलंबास दुसरीं कारणें होतीं. हें साहसकर्म करण्याविषयीं त्याचा किती जरी दृढनिश्चय झाला होता, तरी ज्यावर त्यास हल्ला करावयाचा होता, त्या मोठ्या समुदायाच्या बलाबलाविषयीं आणि आपल्या स्थितीविषयीं त्यास फार वेळपर्यंत विचार करून मोठ्या सावधगिरीनें पुढें पाऊल टाकणें जरूर होतें. आजपर्यंत त्यानें आपले विचार आणि युक्त्या ज्या पडद्याखालीं छपवून ठेविल्या होत्या, तो पडदा एकीकडे सारून आपण प्रॉटेस्टंटस् यांचे कट्टे वैरी आहोंत, असें दाखविण्याचा समय प्राप्त झाला नव्हता. त्यास माहीत होतें कीं, प्रॉटेस्टंटस् हे नेहमीं आपल्या मनसुब्याविषयीं साशंक असल्यामुळें फार सावध आहेत, व त्यांस आपल्या बलाची खातरजमा आहे. संकटाचें दर्शन झाल्याबरोबर त्याचा परिहार करण्याविषयीं ते जसे हातांत शस्त्र घेऊन तयार आहेत तसेच ते सूक्ष्मदृष्टि व तारतम्यज्ञ

आहेत. टर्क लोकांबरोबर लढाई करण्यांत तो गुंतला होताच आणि त्या घोंटाळ्यांतून आपली सुटका करून घ्यावी, म्हणून आपणास अहितकारक आणि टर्कींच्या सुलतानास हितकारक अशा शर्ती करून तडजोड करण्याकरितां आपल्या वकिलास पाठविण्याचा त्यानें निश्चय केला होता; तरी त्या दरबारचे संकल्प इतके अनिश्चित होते कीं, ते पूर्वी कळल्यावांचून जर त्यानें आपल्या राज्यांत आपसांमध्यें लढाई सुरू केली असती तर त्याचें कर्म अतिशय अविचाराचें झालें असतें.

धर्मसभा.

फ्रान्सिस याजबरोबर तह झाल्याबरोबर लागलीच ट्रेन्ट येथें जनरल सभा भरली नाहीं. परंतु आपले मनसुबे गुप्त ठेवण्याकरितां त्यानें त्याविषयीं पोप याची थोडीशी स्तुति करून त्या सभेस आपलें पाठबळ देण्याचा निश्चय केला; आणि आपल्या तर्फे त्या सभेंत हजर राहण्याकरितां वकील पाठवून आपल्या राज्यांतील सर्व धर्माधिकारी यांनीं त्या सभेस हजर व्हावें, असा हुकूम फर्माविला.

तारीख २८ मार्च सन १५४५ रोजीं वर्मस् येथें डायेट सभा भरली तेव्हां बादशहा चार्लस याचे विचार वर लिहिल्याप्रमाणें होते. प्रॉटेस्टंटस् यास आपल्या मताप्रमाणें ईश्वरोपासना आणि धर्मसंबंधीं संस्कार करण्याची मोकळीक फक्त जनरल सभा भरेपर्यंत मिळाली होती. यामुळें तो महत्वाचा हक्क ते जास्त बळकट व चिरस्थायी करून घेण्याविषयीं पराकाष्ठेचे उत्सुक होते. परंतु त्याविषयीं त्यांची अधिक खातरजमा न करतां फार्डीनांड यानें सभेच्या कामास सुरुवात करतांना भाषण केलें त्यांत दोन गोष्टींविषयीं सभेस विचार करण्याविषयीं सूचना केली !—टर्क लोकांबरोबर लढाई करणें, आणि धर्माच्या स्थितीविषयीं विचार करणें. पहिली गोष्ट दुसरीपेक्षां विशेष महत्वाची आहे, असें सभेस सांगून त्याविषयीं अगोदर विचार करावा, आणि विलंब न करितां युद्ध चालविण्यास मदत करावी, अशी त्यानें विनंति केली. दुसऱ्या विषयाविषयीं त्यानें असें बोलून दाखविलें कीं, हा विषय इतका गुंतागुंतीचा आहे कीं, त्याचा शेवट निकाल याच बैठकींत करतां येईल, अशी कांहीं आशा करतां येत नाहीं. यासाठीं पोप यानें जनरल सभा भरविण्याचा हुकूम केला आहे; आणि सभा भरविण्यासाठीं जो दिवस नेमला आहे, तोही जवळ आला आहे. यासाठीं दोन्ही पक्षकारांनीं सभा काय करिते याची वाट पहावी, आणि ते ठराव सगळ्या जगांतील खिस्तधर्मानुयायी धर्माधिकारी यांचे म्हणून मान्य करावेत.

धर्म किंवा व्यवहार ?

त्या सभेंतील पोपमतानुयायी सभासदांनीं फार्डीनांड याच्या भाषणाची स्तुति करून त्या भाषणांतील प्रत्येक गोष्टीविषयीं आपली अनुकूलता आहे, असें प्रदर्शित केलें. पण प्रॉटेस्टंटस् अशी अट धरून बसले कीं, 'धर्मसंबंधीं प्रश्न हा फार महत्वाचा आहे, यासाठीं त्याबद्दल अगोदर विचार झाला पाहिजे. मुसलमान लोकांचा उत्कर्ष सर्व जर्मनीला

भयजनक आहे, परंतु त्यापेक्षांही धर्मसंबंधानें आमची काळजी जास्त मोठी आहे. यासाठीं ती दूर होऊन आम्हीं आमच्या मताचा शाश्वत उपभोग घ्यावा, असें ठरलें म्हणजे, आम्ही मोठ्या उत्साहानें व निरलसपणानें आमच्या देशबांधवांशीं मिळून टर्कीबरोबर लढाई करण्यास अगदीं सिद्ध आहोंत.' स्पॉयरस येथील डायेट सभेंत असा ठराव झाला होता कीं, कायदेशीर रीतीनें सभा भरेपर्यंत प्रॉटेस्टंटस् यांनीं आपल्या मताप्रमाणें धर्मसंबंधीं विधि करीत असतांना त्यांस कांहींएक हरकत होऊं नये. परंतु पोप यानें आतां सभा भरविण्याचा ठराव करून त्यांबद्दल आमंत्रणें केलीं; आणि त्या सभेच्या ठरावास प्रॅाटेस्टंटस् यांनीं मान्य व्हावें, असें फार्डि-नांड यानें बोलून दाखविलें. यावरून प्राटेस्टंटस् यांस असा संशय उत्पन्न झाला, कीं पूर्वीं जो संकेत झाला आहे, त्याच्या दुटप्पी-पणाचा फायदा घेऊन आमचे प्रतिपक्षी अशी तक्रार करतील कीं, 'ज्यापेक्षां जनरल सभा भरली आहे, त्यापेक्षां आतां आम्हांस आमच्या मताप्रमाणें वागण्याचा अधिकार राहिला नाहीं; असा त्या संकेताचा अर्थ होऊं नये, म्हणून त्यांनीं त्या सभेच्या कायदे-शीरपणाविषयीं हरकती घेतल्या. ती सभा जर्मनीच्या हद्दींत भरविण्यांत येत नसून पोप यानें आपल्या अधिकारानें त्या सभेस आमंत्रणें केलीं आहेत, तो त्या सभेच्या अध्यक्षपणाचा अधिकार आपला आहे, असा हक्क सांगत आहे. यासाठीं ती गैर-कायदेशीर सभा आम्हांस मान्य नसून गेल्या डायेट सभेंत जे ठराव झाले आहेत, ते पूर्णपणें अस्तित्वांत आहेत, असें आम्ही समजतों; असें प्रॉटेस्टंटस् यांनीं स्पष्ट सांगितलें.

प्रॅाटेस्टंट्स्च्या अड-चणी.

या वेळेस चार्लस याचे विचार अगदीं बदलले होते. त्याच्या हुकमाप्रमाणें फार्डि-नांड हा आपल्या पहिल्या प्रतिज्ञात अर्थाला अगदीं बळकट धरून राहिला होता. निरर्थक प्रयत्नांत आणि वादविवादांत पुष्कळ वेळ जाऊनही दोन्ही पक्षांमध्यें एक-वाक्यता झाली नाहीं. चार्लस बरा झाल्यावर तो स्वतः वरमूस् येथें आला होता; परंतु त्याची विद्यमानता देखील प्रॉटेस्टंटस् यांस जास्त विनीत करण्यास समर्थ झाली नाहीं. चार्लस याची अशी खातरजमा झाली कीं, त्यांस सत्य आणि ईश्वर या दोन्ही गोष्टी प्रिय आहेत. इहलोकसंबंधीं कोणत्याही अर्थाची ते लोक अपेक्षा करीत नाहींत; व कोण-तेंही संकट त्यांस भय घालूं शकत नाहीं; उलटा त्यांचा धीटपणा मात्र जास्त वाढत चालला आहे. सरतेशेवटीं प्रॉटेस्टंटस् यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, 'जी सभा चौकशी करण्याकरितां नाहीं, पण केवळ आह्मांस अपराधी ठरविण्याकरितां जमली आहे, त्या सभेंत आमचीं मतें खरीं आहेत, असें सिद्ध करून देण्याकरितां आह्मीं तेथें जाण्याचें देखील पत्करणार नाहीं; आणि पोप यांच्या वजनानें जी सभा भरली आहे, तिला आह्मी कांहीं मान देणार नाहीं. कारण आमच्या मताला त्यानें पाखंडमताचा कलंक लावून व अपहार केलेल्या अधिकाराच्या

सभेचा प्रतिषेध.

बळावर आम्हांस जितके त्यास देतां आले तितके अतिशय उग्र शाप देऊन त्यानें आपला न्याय करण्याचा अधिकार अगोदरच गमाविला आहे.

चार्लस याची पक्की खातरी झाली कीं टर्क लोकांचा पराजय करण्याकरितां आपण प्रॉटेस्टंटस् यांजकडून कांहीं मदत मिळवूं शकत नाहीं; व धर्मसंबधानें त्यांस जीं भयें वाटत आहेत, तीं व रोमनक्याथोलिक धर्माविषयीं त्यांस जो तिटकारा आला आहे, तो आपण कमीही करूं शकत नाहीं. परंतु प्रॉटेस्टंटस् यांजवर बलात्कार करून त्यांस विनीत करण्याची किंवा त्यांच्या हक्कावद्दल त्यांस शासन करण्याची अद्यापपर्यंत पूर्ण तयारी झाली नव्हती; सबब त्यानें आपले विचार मोठ्या काव्यानें गुप्त ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याच्या ओंठांत एक आणि पोटांत एक होतें, तें प्रॉटेस्टंटस् यांना समजल्यावांचून राहिलें नाहीं. एका प्रांताच्या धर्माध्यक्षानें नव्या मताचा अंगिकार करून तें मत आपल्या अधिकाराखालील प्रदेशांत चालूं करण्याचा प्रयत्न केला होता. त्यावद्दल त्याचा निषेध करून तीस दिवसांचे आंत त्यानें आपल्यावरील आरोपाचा जबाब देण्यासाठीं अमुक एक कोर्टापुढें हजर व्हावें, असा चार्लस यानें हुकूम फर्माविला होता. प्रॉटेस्टंट लोकांविषयीं त्याचा शत्रुभाव आहे, असें त्याच्या दुसऱ्या अनेक कृत्यांवरून तर अगदींच स्पष्ट झालें. आपल्या वंशपरंपरागत राज्यांतील ज्या लोकांनीं ल्यूथर याच्या मताचा स्वीकार केला असा त्यास संशय आला, त्या सर्वांचा त्यानें फार छळ केला. वरमस् येथें आल्यावर त्यानें प्राटेस्टंटस् यांच्या धर्माध्यक्षांस उपदेश करण्याची मनाई केली; आणि इटली देशांतील एका साधूकडून प्रॉटेस्टंटस् यांची निर्भर्त्सना करवून त्यांच्या अनिष्टकारक मतांचा उच्छेद करण्याकरितां आपल्यावर ईश्वराची कृपा झाली आहे, असें त्या साधूकडून म्हणवून घेतलें. टर्कींच्या सुलतानाकडून आपल्या उद्देशास कांहीं हरकत होऊं नये, म्हणून पूर्वीं सांगितल्याप्रमाणें तहाचें बोलणें करण्याकरितां आपले वकील टर्कीच्या दरबारांत पाठविले. चार्लस याचीं हीं सर्व कारस्थानें प्राटेस्टंटस् यांच्या लक्षांत येऊन त्यांस आपल्या मताच्या सुरक्षितपणाविषयीं भय व चिंता उत्पन्न झाली.

चार्लसचीं कारस्थानें.

पोप याच्या संकेताप्रमाणें ट्रेन्टस् येथें जनरल सभा भरून कामास सुरुवात झाली. ही सभा योग्य उपायांची योजना करून रोमनक्याथोलिक मतावरील संकटें दूर करण्यास समर्थ आहे, असें मानून तन्मतानुयायी संस्थानिकांस मोठी आशा उत्पन्न झाली होती; परंतु त्यांतील कांहीं लोकांचा अभिप्राय असा होता, कीं ‘ हा रोग उत्पन्न झाल्यापासून त्याचा परिहार करण्याविषयीं एकसारखी अठ्ठावीस वर्षें उपेक्षा केल्यामुळें तो आतां इतका बद्धमूल आणि प्राणघातक झाला आहे कीं, तो अगदीं बरा करणें आतां शक्य म्हणणें अप्रासंगिक आहे. ’ चार्लस यानें अशी सूचना केली होती कीं ह्या सभेनें प्रार्थनामंदिरांतील अव्यवस्था दूर करण्याचें काम

अगोदर हाती घ्यावें आणि मग धर्मसंबंधीं मतांचा विचार करावा. रोमच्या दरबाराचें प्राणघातक मर्मस्थान काय तें हेंच होतें; आणि त्याजवर आघात होऊं नये म्हणूनच ही घातक न्यायसभा त्यास नको होती. पोप पॉल ही सभा भरण्याविषयीं आपल्या पूर्वजांप्रमाणें अतिशय अनुत्सुक नव्हता, तरी तिच्या अधिकाराविषयीं याचा हेवा त्यांच्यापेक्षां किंचितूही कमी नव्हता. चार्लस यानें सूचना केल्याप्रमाणें सभेनें कामास सुरुवात केली म्हणजे प्रतिपक्षीय लोकांच्या उद्देशांस किती बळकटी येईल, हें त्यास उघड दिसून आलें. धर्माधिकारी ह्यांजमध्यें दुष्टाचरणें किती व कोणतीं आहेत, याची चौकशी करणें हेंच आपलें मुख्य काम आहे, असें जर सभेच्या लोकांस वाटलें, किंवा त्या सभेंत जमलेल्या कनिष्ठप्रतीच्या धर्मोपदेशकांकडून, उच्च पदवी आणि अधिकार यांच्यायोगानें प्रतिष्ठेस पांवलेल्या धर्माधिकारी यांस त्यांच्याविषयीं त्यांचा जो स्वाभाविक मत्सर तो तृप्त करून देण्याकरितां जर धर्मसंबंधीं नियम घालून देऊन प्रतिष्ठित धर्माधिकाऱ्यांचा उपमर्द केला, तर पोप याच्या गादीची अब्रु जाईल, इतकेंच नव्हे, पण त्याच्या अधिकारालाही धक्का बसेल, असें पोप यास भय वाटून त्यानें चार्लस् याच्या छद्मी सूचनेकडे लक्ष न ठेवितां सभेच्या कामास सुरुवात करविली.

पोपचा कावा.

पहिलें अधिवेशन किरकोळ कामांत आणि शिष्टाचारांतच गेलें. दुसऱ्या बैठकींत असें ठरलें कीं, 'ईश्वराची उपासना आणि धर्मसंबंधीं विधानें कोणत्या रीतीनें करावीं, याविषयीं नियम घालून देणें, हें ह्या सभेचें पहिलें कर्तव्यकर्म आहे; परंतु त्याच वेळीं धर्माधिकारी यांच्या रीतीभातींत आणि वर्तनांत काय सुधारणा केली पाहिजे याचाही विचार केला पाहिजे.' ह्या पहिल्याच लक्षणावरून व पोप याच्या वकिलांनीं त्या सभेंत पोप याच्या अधिकाराच्यासंबंधानें जीं भाषणें केलीं, त्यांवरून आणि त्याच्या अनुरोधानें सभेंतील सभासदांच्या वर्तनावरून त्या सभेंतून काय ठराव होईल, याचें प्रॉटेस्टंटस् यांस सहज अनुमान झालें. त्या सभेंत जमलेल्या फक्त चाळीस धर्माधिकाऱ्यांनीं आपण सगळ्या जगाचे प्रतिनिधि आहोंत, असा अधिकार गृहीत धरून अतिशय महत्त्वाच्या कामाचा निकाल करण्यास प्रवृत्त झाल्याबद्दल प्रॉटेस्टंटस् यांस मोठा अचंबा वाटला. आपल्या अशिष्टाचाराविषयीं आणि त्यापासून जो आपला उपहास होईल, त्याविषयीं ते सभासदही लुप्तबोध होते. त्यांनीं आपलें काम अगदीं ढिलाईवर टाकिलें. सभेच्या कामास सुरुवात झाली, असें समजल्याबरोबर प्रॉटेस्टंटस् यांनीं सभेविषयीं आपली असंमति दर्शविण्याकरितां, एक लांब जाहीरनामा प्रसिद्ध करून त्यांत आपणांस त्या सभेचा अधिकार कां मान्य नाहीं, याचीं कारणें सांगितलीं. पोप आणि बादशहा चार्लस यांचेंही त्या सभेविषयीं अनौत्सुक्य पाहून त्यांचे मनांत दुसरे महत्वाचे विचार घोळत आहेत, असें स्पष्ट कळून आलें.

अनौत्सुक्य.

पोप आणि चार्लस यांच्या वर्तनाकडे प्रॉटेस्टंटस् यांचें पूर्ण लक्ष होतें. त्यांस चहूंकडून ज्या बातम्या मिळाल्या होत्या, त्यांवरून आपल्या नाशाकरित चहूंकडे कडेकोट तयारी चालली आहे अशी त्यांची खातरजमा झाली होती. परंतु त्यांच्या स्थितीला अनुरूप आणि त्यांच्या शत्रूंच्या तयारीला टक्कर देण्याइतकें त्यांजमध्यें ऐक्य नव्हतें. यांच्यामध्यें ऐक्य होऊन दहाच वर्षें झालीं होतीं. त्यांचे मुलूख एकमेकांच्या मुलुखांत मिश्र झाल्यामुळें मध्यें साट्यालोट्यांचीं लग्नें झाल्यामुळें, व परस्परांमध्यें अनेक प्रकारचे करार झाल्यामुळें त्यांजमध्यें मत्सर आणि बेबनाव होऊन अनेक वाद उत्पन्न झाले होते. **ब्रन्सवुईकचा** ड्यूक ल्यान्डग्रेव्ह यानें निर्दयपणानें वागविल्यामुळें प्रॉटेस्टंट कटांत त्याचे जे आप्त होते, ते फार असंतुष्ट झाले होते. या कटाचे पुढारी **साक्सनी** आणि ल्यांडग्रेव्हचे इलेक्टर यांनीं अव्यवस्थित खर्च करून आम्हांस संकटांत पाडिलें, अशी कित्येकांची कुरकुर होती. या कटाचे मुख्य सूत्रधार वर सांगितलेले दोन सरदार यांचे विचार आणि स्वभाव अगदीं भिन्न होते. ल्यान्डग्रेव्ह याचा स्वभाव फार तापट आणि साहसी होता. त्यानें असा आग्रह धरिला कीं, आपल्यावर आलेलें संकट मोठें जबर आहे. यासाठीं आपण फ्रान्स आणि इंग्लंडच्या राजांस आपलें संरक्षण करण्याविषयीं विनंति करावी, किंवा स्वित्झरलंडच्या प्रॉटेस्टंटस्‌बरोबर मैत्री करावी, म्हणजे आपल्या सांप्रतच्या स्थितीला योग्य साहाय्य त्यांजकडून मिळेल. साक्सनीचा राजा पराकाष्ठेचा धर्मभोळा होता. त्याची ल्यूथर याच्या मतांतील प्रत्येक गोष्टीवर इतकी श्रद्धा होती कीं, तीं मतें सर्वांशीं ज्यांस मान्य नाहींत, त्यांजबरोबर मैत्री करणें हें एक पाप आहे, असें तो मानीत असे. त्यानें फ्रान्सीस याजबरोबर सख्य करणें स्पष्ट नाकबूल केलें; कारण कीं तो सत्याचा लोप करणारा आहे व इंग्लंडचा हेन्री याजबरोबर मैत्री करणें हेंही तसेंच अप्रशस्त आहे, असें त्यास वाटे. कारण कीं, पोप याजपेक्षां तो कांहीं कमी अपवित्र आणि कमी कुमार्गी नाहीं. स्विस लोक यांचे धर्मसंबंधानें कांहीं विचार आपल्याहून भिन्न आहेत, यासाठीं तेही सख्य करण्यास पात्र नाहींत. ह्या भिन्न विचारांचा परिणाम जो व्हावयाचा तो झाला. दोघेही परस्परांची गुप्तपणें निंदा करूं लागले. ल्यान्डग्रेव्ह यानें साक्सनीच्या राजास असा दोष दिला कीं, ' त्याच्या पायांत धर्मभोळेपणाच्या बिड्या पडल्यामुळें तो अशा महत्वाच्या कामांत पुढारीपणा करण्यास पात्र नाहीं. ' साक्सनीच्या राजास ल्यूथर याच्या मतावर ल्यान्डग्रेव्ह याची पूर्ण श्रद्धा आहे किंवा नाहीं याविषयीं संशय उत्पन्न झाला; कारण त्याच्या समजुतीप्रमाणें ल्यान्डग्रेव्हचे विचाराचा सत्याशीं पूर्णपणें मेळ नव्हता. याप्रमाणें दोन पुढाऱ्यांमध्यें जरी मतभेद होता, व दुसरे राजे तो आपला कट तसाच चालविण्यास संतुष्ट

प्रॉटेस्टंटस्‌च्या अडचणी.

नव्हते, तरी त्यांजवर आलेल्या संकटानें त्यांस आपल्यामध्यें ऐक्य ठेवणें भाग पाडलें.

एकी.

ट्रेन्टस् येथें भरलेली सभा कायदेशीर आहे, असें कबूल करावयाचें नाहीं, व कोलोन येथील धर्माध्यक्षानें आपल्या प्रांतांत धर्मांतर करण्याविषयीं प्रयत्न केल्याबद्दल त्यास चार्लस याजकडून शिक्षा होऊं द्यावयाची नाहीं, यांविषयीं त्यांचा दृढ निश्चय झाला.

चार्लस याचा खरोखर उद्देश काय आहे, याचा पक्का शोध लावण्याकरितां ल्यान्डग्रेव्ह यानें चार्लस याच्या एका प्रधानास पत्र लिहून विचारलें होतें कीं, 'प्रॉटेस्टंटस् यांजविषयीं चार्लस याचे मनांत खरें काय आहे'! त्याबद्दल त्यानें जें उत्तर पाठविलें, त्यांत असा मजकूर होता कीं, 'चार्लस यानें फौजेची मोठी तयारी चालविली आहे, अशी जी तुम्हांस बातमी कळली आहे, तींत अतिशयोक्ति फार आहे. त्यानें आपल्या राज्याच्या सरहद्दीवर फ्रेंच अथवा इंग्लिश यांजकडून कांहीं उपद्रव होऊं नये, यासाठीं कांहीं थोडीशी फौज वाढविली आहे; परंतु जर्मनी देशांत स्वस्थता राखण्याविषयीं तो पराकाष्ठेचा उत्सुक आहे.'

परंतु चार्लस याच्या वर्तनाचा त्याच्या प्रधानाच्या उत्तराशीं कांहीं मेळ नव्हता. मागें सांगण्यांत आलें आहे कीं, दोन्ही पक्षांतील निवडक धर्माधिकाऱ्यांची सभा भरवून तंटा मिटवावा असा ठराव झाला होता. ह्या सभेंत क्याथोलिक मताचा बचाव करण्याकरितां शांत स्वभावाचे आणि अतिक्रम न करणारे असे लोक पाठविणें होते,

सभा विसकटली.

तसे न पाठवितां मोठे हट्टी, पराकाष्ठेचे स्वमताभिमानी, आणि पंडितमन्य असे लोक पाठविल्यामुळें समेट होण्याची आशाच उरली नाहीं. त्यांनीं जो वाद चालविला, त्यांत छक्केपंजे, लपंडाव, आणि वाक्छल यांशिवाय दुसरें कांहीं नव्हतें. जिकडून तिकडून आपल्या प्रतिपक्षास घोंटाळ्यांत पाडून आपले दोष छपवावेत हाच त्यांचा मुख्य उद्देश असल्यामुळें प्रॉटेस्टंटस् यांस पराकाष्ठेचा राग आला. चार्लस हा आपली पूर्ण तयारी होईपर्यंत वेळ घालविण्याकरितां आपणांस उगीच खेळवीत आहे, ह्याखेरीज त्याचे मनांत दुसरें कांहीं नाहीं, अशी त्यांची खातरजमा झाल्यावरून ते सभा सोडून चालते झाले.

नंतर नित्य नवीं अरिष्टें दिसूं लागलीं; आणि पुष्कळ काळपर्यंत जमलेलें वादळ

ल्यूथरचा मृत्यु.

आतां प्रॉटेस्टंटस् यांजवर कोसळून पडण्याच्या तयारींत आहे, अशीं लक्षणें दिसून येऊं लागलीं. इतक्यांत समयोचित मृत्यूनें ल्यूथर यास तत्संबंधीं संकटें सोसण्यापासून अथवा आपल्या अनुयायांस तीं सोसतांना अवलोकन करण्यापासून सोडविलें. त्रेसष्टावे वर्षी त्या सत्पुरुषाच्या आयुष्याचा अंत झाला. ईश्वरी प्रसादानें ईश्वराविषयीं येशुख्रिस्ताचे विचार काय होते ते समजून घेऊन आणि ईश्वरभक्ति करण्याची शुद्ध पद्धत कोणती, याविषयीं लोकांस ज्ञान देऊन

पोप याच्या जुलमापासून त्यांस ज्यानें मुक्त केलें त्या सत्पुरुषाविषयीं लोकांच्या मनां० दुष्ट भाव उत्पन्न होणें, ही एक जगाच्या इतिहासांतील आश्चर्यजनक गोष्ट आहे. ज्या जुन्या मतांवर लोकांची पूर्ण श्रद्धा बसली होती, त्याचीं पाळेंमुळें खणून टाकण्याविषयीं ल्यूथर याचा दीर्घ प्रयत्न पाहून त्यांचीं मनें अतिशय क्रुद्ध झालीं, व त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. त्या भरांत मनुष्याच्या अंगीं वसणाऱ्या सर्व दुर्गुणांचें आणि उणिवांचें ल्यूथर हा एक वसतिस्थान आहे, असा त्याजवर दोषारोप करून त्यास त्यांनीं तो एक मानवरूपी दैत्य आहे, असें ठरविलें. दुसऱ्या पक्षाच्या लोकांनीं त्याचें सदाचरण पाहून कृतज्ञतेनें त्यास हा कोणी मनुष्यरूपी देव आहे, असें मानिलें. एका पक्षानें त्यास अत्युग्र शाप देऊन तो अति दुष्ट मनुष्य आहे, अशी निंदा केली, दुसऱ्या पक्षानें त्याची अतिशय प्रशंसा करून तो अति पुण्यकर्मा साधु आहे असें लेखिलें. अशा परस्परविरुद्ध मतांवरून गुणदोषांविषयीं आपल्यास निवाडा करावयाचा नाहीं. त्याच्या वर्तनावरून आपल्यास काय वाटतें, तें येथें निरूपण करावयाचें आहे.

ल्यूथर यानें एकदां जें कांहीं सत्य म्हणून मानलें त्याजवरील त्याची श्रद्धा, आपलें मत प्रतिपादन करण्याविषयीं स्वाभाविक आणि अभ्याससिद्ध बुद्धि, शक्ति, शुद्धमार्गाचें अवलंबन आणि आपल्या मताचा प्रसार करण्याविषयीं अश्रांत श्रम ह्या त्याच्या अंगच्या लोकोत्तर गुणांनीं तो आपल्या शत्रूच्या प्रशंसेस देखील पात्र होता.

ह्या सद्गुणांखेरीज त्याच्या अंगचे दुसरे गुण तसेच स्तवनीय होते. त्याचें तपोयुक्त पवित्राचरण त्याच्या अंगीकृत व्रताला शोभेल असें होतें. स्वहित ह्मणजे काय, व ऐषआरामाचा उपभोग कसा घ्यावा, हें तर त्या पुण्यपुरुषास कळत देखील नव्हतें. प्रार्थनामंदिरांसंबंधीं सर्व उत्पन्न आणि सन्मान यांचे उपभोक्ते काय ते त्याचे शिष्य होते. वुइटेनबर्गच्या विद्यालयांतून त्यास जी कांहीं नियमित नेमणूक मिळत होती, त्याजवरच कायतो तो आपला चरितार्थ चालवीत होता. मनुष्यप्राण्याचें स्वाभाविक मनोदौर्बल्य, आणि विषयवासना ह्यांची झांक त्याच्या लोकोत्तर गुणांनीं कमी केली होती. तथापि त्यांचें उत्पत्तिस्थान अंतःकरणाचा दुष्टपणा हें नसून शरीरधर्म असल्यामुळें त्या वासना त्यास अनावर नव्हत्या. त्याचा स्वभाव पराकाष्ठेचा धीट व तापट होता. समयविशेषीं तो इतका भांबावत असे कीं, असा अविचार त्याच्याकडून होतो तरी कसा, याबद्दल शांत विचाराच्या मनुष्याला नवल वाटत असे. आपल्या मताला चांगला आधार आहे असा त्याचा दृढविश्वास, आपलें मतप्रतिपादन करण्याविषयीं त्याचा उत्साह आणि धैर्य, आपल्या मताला धरून राहण्याविषयीं त्याचा दृढनिश्चय आणि आपल्या प्रतिपक्षाच्या मताचें खंडण करण्याविषयीं त्याचा कोटिक्रम या त्याच्या स्तवनीय गुणांचा तापट स्वभावानें लोप करून त्यास त्यानें दुरभिमानी, उद्धट, दुराग्रही, क्रोधविक्षिप्त, आणि फटकळ, ह्या विशेषणांस पात्र केलें

होतें. सत्याविषयीं सर्वांनीं निःस्सीम अनुरक्त असावें, अशी तो अपेक्षा करीत असे. सत्यापलाप त्यास इतका असह्य होता कीं, दुसऱ्यांच्या समजुतीबद्दल आदर न ठेवितां, त्यांची तो फार निर्भर्त्सना करीत असे. त्याच्या मताला कोणी दोष लावला म्हणजे मग काय विचारतां ! तो राजा असो, किंवा रंक असो, साधु असो, किंवा दुष्ट असो, विद्वान् असो, किंवा मूर्ख असो, श्रीमान् असो किंवा गरीब असो, त्याची कांहीं एक पर्वा न करतां त्याचा तो पराकाष्ठेचा उपमर्द करीत असे.

परंतु हे त्याचे असभ्य गुण केवळ त्याच्या नैसर्गिक स्वभावाचे दोष होते, असें नाहीं. तत्कालीन लोकांच्या रीतीभातीमध्येंच ते दोष होते. सद्‌गुण आणि दुर्गुण हे सर्व काळांत तेज असतात; परंतु लोकांच्या चाली आणि रीतीभाती यांजमध्यें नेहमीं अंतर पडत असतें. ल्यूथर याच्या वर्तनांत जे दोष आज आपल्यास दिसतात, ते तत्कालीन लोकांस मुळींच दिसले नाहींत. त्याचे जे गुण आज आपणांस दोषास्पद दिसतात, ते त्याच्या अंगीकृत कार्याच्या सिद्धीस अगदीं अवश्य होते. अनंत काला-पासून अज्ञानतिमिरांत आणि मूढ श्रद्धेंत निमग्न झालेल्या मानवी प्राण्यास जागृत करणें, आणि ज्याच्या हातांत सत्ता होती, अशा मताभिमानी लोकांशीं सामना करणें हें काम कांहीं सामान्य मनुष्याच्या हातून घडण्यासारखें नव्हतें. ल्यूथरासारखा साहस-कर्मी आणि स्वाभिमानी पुरुषच त्या कर्मास योग्य होता. त्याचें भाषण सौम्य असतें, तर लोकांच्या कानांपर्यंत देखील जाऊन पोहोंचलें नसतें !

यूरोपखंडांतील पुष्कळ लोकांनीं आपल्या मताची दीक्षा घेतली, हें पाहून व ज्यापुढें मोठे बलाढ्य राजे थरथर कांपत होते, त्या पोपाच्या अधिकारास आलेली ग्लानि अवलोकन करून, ल्यूथर यास कांहींसा अभिमान झाला, अशीं चिन्हें दिसून आलीं यांत नवल नाहीं. कारण तो मनुष्यच होता. महत्कृत्यें करूनही त्यास किं-चित्‌ही गर्व झाला नसता, तर आपण देखील त्यास देव लेखिलें असतें.

ल्यूथर याच्या मृत्यूचें वर्तमान ऐकून पोप याच्या पक्षाच्या लोकांस पराकाष्ठेचा हर्ष झाला; आणि प्रॉटेस्टंटस् हे तर अगदीं भग्नोत्साह झाले; परंतु त्या कालीं ल्यूथर याचें मत इतकें बद्धमूल झालें होतें कीं, त्याचा समूळ उच्छेद करणें तर काय, पण त्याची वाढ खुंटविणें हें आतां शक्य राहिलें नाहीं, हें त्या दोन पक्षांपैकीं कोणाच्याही लक्षांत आलें नाहीं.

उपसंहार.

ल्यूथर हा धर्मक्रांति घडवून आणण्याचें एक निमित्तकारण मात्र होता. ह्या क्रांतीनें धर्माच्या राज्यांतच फेरफार केला असें नाही. मानवी उलाढालीच्या प्रत्येक खात्यावर या क्रांतीनें संस्कार उत्पन्न करून 'अर्वाचीनत्वाचा' ठसा उमटविला. मुख्य गोष्ट ही कीं, श्रद्धेचें दास्य हतबल होऊन जर्मन मानवी मनाचें बंधविमोचन झालें. शुद्ध श्रद्धेनें मोक्ष मिळतो, नुसत्या विहित कर्मांनीं किंवा कर्मतंत्रानें मोक्षसिद्धि होत नाहीं, हें ठरलें. शास्त्रशुद्ध कर्माला श्रद्धेची जोड हवी, पोप किंवा त्याचे हस्तक धर्मप्रवर्तकांचा पोषाख घालितात म्हणून मात्र पवित्र नव्हेत, प्रतिवर्षी पापोच्चार करून पापावरही दुर्वर्तनानें मात्रा चालविणाऱ्या पोपाकडून प्रायश्चित्त विकत घेणें म्हणजे पापविमुक्त होणें नव्हे, पोपचें महत्व वाढविण्याप्रीत्यर्थ निर्धौत झालेल्या स्मृति किंवा संप्रदाय म्हणजे वेद्वाणी नव्हे, मोक्ष ही वस्तु स्वशुद्धीनें मात्र प्राप्त व्हावयाची आहे, प्रत्येकाला व प्रत्येक राष्ट्राला स्वतंत्र धर्म असावा, धर्मरहस्य समजून घ्यावें आणि फोलाचा त्याग करावा, इत्यादि धार्मिक मतें जारीनें प्रचलित झालीं; मनुष्याची ज्ञानशक्ति व कर्तव्यशक्ति वाढली, स्वाभिमान व देशाभिमान जागृत झाला, धर्मेतर शास्त्रांचें व विश्वाचें अध्ययन जोरावलें, सारांश मनुष्यप्राणी देवाजवळ जाऊं लागला हा परिणाम अर्वाचीन संस्कृतीचा होय. स्वित्सर्लंड, हॉलंड, इंग्लंड, स्कॉटलंड येथेंही धार्मिक घडामोडी होऊन रोमच्या पोपांची सत्ता नामशेष केली आणि या सर्व परिणामास बादशाही सभेनें धिक्कारिलें नाहीं. सारांश, मानवी मन स्वतंत्र करणारा प्रॉटेस्टंट धर्म जर्मन लोकांत पूर्ण स्वरूपानें प्रकट झाला.

समाप्त.